ग्रं सं. ठाणें.
विषय मुं-प्रवास

# अजिंठा

: लेखक :

द. वा. जोशी, वकील
संपादक, प्रागतिक साप्ताहिक, जळगांव

REFBK-0011423
REFBK-0011423

संग्र १९६० 
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २६७६० वि: [illegible]
क्रमांक २७७ नों: दि: [illegible]

मराठी ...
अनुक्रमांक २७६७०: दि. ३१-५-५७
क्रमांक २७५: नों: दि: २९-७-५८

# इंद्र व शची



# अजिंठा

लेखक व प्रकाशक

**द. वा. जोशी**

जळगांव, पूर्व खानदेश

REFBK-0011423

REFBK-0011423

**किंमत २ रु. ५० नवे पैसे**

[ सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन ]

आवृत्ति पहिली

चैत्र शुद्ध प्रतिपदा
१८८२

-: मुद्रक :-
ग. म. नलावडे
नारायण छापखाना,
१६ बुधवार, पुणें २.

# — अल्प निवेदन —

अजिंठा लेण्यांविषयीं पहिलीं पुस्तकें इंग्रज लेखकांनी—लेणीं, त्यांतील शिल्प व रंगीत चित्रकलेचें काम पाहून—लिहिली, व त्यांची प्रसिद्धी पहि- त्यानें त्यांनीं विलायतेंत केली. त्यावेळच्या कंपनी सरकारनें लेण्यांच्या अभ्यासास सर्वतोपरी उत्तेजन दिलें. कित्येक अभ्यासकांनीं महिनेच्या महिने लेण्यांत वसती करून कांहीं चित्रें कापूनही नेली व एकानें तर त्यांतील एक चित्र कित्येक पौंडाला विलायतेंत विकलें ! याप्रमाणें लेण्यांची प्रसिद्धी झाल्यानंतर मुंबई सरकारच्या प्रसिद्धी खात्यानें जीं गॅझेटियर्स प्रसिद्ध केली, त्यांतील खानदेश-गॅझेटियरमध्यें लेण्यांचें सविस्तर व यथातथ्य वर्णन अत्यंत परिश्रमपूर्वक केलें आहे. नंतर एक दोन लेखकांनीं इंग्रजींत पुस्तकें लिहिली, पण तीं आतां उपलब्ध नाहीत. निजाम सरकारनें एक सविस्तर पुस्तक प्रसिद्ध करण्याचे ठरविले व त्याची किंमत ३० गिनी म्हणजे त्यावेळच्या किंमतीप्रमाणें रु. १५० ठेवली. हें पुस्तक आम्हास पहावयास मिळाले नाही. यानंतर आमच्या माहितीप्रमाणें लेण्यांचे वर्णन चित्रकलेच्या व शिल्पकलेच्या मार्मिक अवलोकनानें लिहिलेले, औंधचे श्रीमंत पंत प्रतिनिधि भवानराव श्रीनिवासराव यांनीं इंग्रजींत व मराठींत अशा दोन्ही भाषेंत प्रसिद्ध केले. पुस्तकांची किंमत अनुक्रमें रु. २० व १० ठेवली. परिश्रमाच्या व मार्मिक वर्णनाच्या योग्यतेकडे पाहिल्यास किंमत कमीच होय. तथापि मराठी वाचक व महाराष्ट्रांतील इतर वाङ्मयप्रेमी वर्गाच्या सांपत्तिक स्थितीच्या मानानें ही किंमत योग्य ठेवण्यांत आली असें म्हटले पाहिजे. परंतु या पुस्तकांच्या अगदी थोड्या प्रति काढल्या व त्या खपल्यामुळें ही पुस्तके दुर्मिळ झाली आहेत !!

अशा स्थितींत व अजिंठा लेण्याकडे जाणाऱ्या शिल्पकला व चित्रकला अभ्यासकांची व कुतुहलानें लेणी पहाण्यास येणारांची संख्या दिवसें- दिवस वाढतही चालल्यामुळें, त्यांची अजिंठ्याविषयींची जिज्ञासा अंशतः

तरी पुरी व्हावी म्हणून हें पुस्तक प्रसिद्ध करण्याचे धाडस केले आहे. पुस्तकाच्या वाचनानें अजिंठ्याविषयीं पुष्कळच चांगली कल्पना वाचकां होईल. चित्रकलेच्या व शिल्पकलेच्या अभ्यासकांस तर त्या त्या कलांच्या बहुमोल रत्नभांडाराची कल्पना येऊन अशा कलाभिज्ञांचा ओघच्या ओ भविष्यकालांत अजिंठ्याकडे वाहत राहील अशी आमची निश्चिती आहे.

या पुस्तकांस मुख्यतः खानदेश गॅझेटियटरचा व श्रीमंत औंधक यांनीं प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांचा आधार घेतला आहे हे आम्ही निःसंको पणें नमूद करतों. पुस्तकांत अजिंठ्यांतील चित्रांचे व शिल्पाचे थोडेत दर्शन घडावे म्हणून चित्रांचे व शिल्पकामाचे ठसे ( ब्लॉक्स ) शक्य तित घातले आहेत. हे ठसे करविण्याचा खर्च बराच येतो; व त्यामुळें पुस्तकाच किंमतीतही बरीच वाढ होते. याकरितां या आवृत्तींत अगदीं थोडे ठ घातले आहेत आणि चित्रांचे रंगीत ठसे घालणें बऱ्याच खर्चाचे असल्य मुळें ते टाळले आहे.

अजिंठ्यांतील शिल्पकामाचें किंवा तेथील प्रत्येक चित्राचें कलेच दृष्टीनें तपशिलासह विवेचन करणें हा या पुस्तकाचा उद्देश नाही; कारण अनंत व अशक्य आहे. त्या त्या कलेच्या उभ्यासकांनीं व कलाभि रसिकानीं स्वतः पाहून व अभ्यास करून अजिंठ्यांतील कलाकृतींचें मार्मि ज्ञान संपादन करावे हेंच योग्य होय.

या पुस्तकाची हस्तलिखित प्रत तयार करण्या करितां माझ्या किते विद्यार्थी मित्रांनीं सहाय्य केलें त्या सर्वांचा नामनिर्देश करणें शक्य ना तथापि माझा नातू चि. वसंत कृष्णाजी कुलकर्णी बी. ए. व रमाकां भीमराव कुलकर्णी, तसेंच कृष्णराव नारायण जगताप यांची नांवें वि उल्लेखनीय आहेत. त्या सर्वांचा मी आभारी आहे. तसेच अजिंठा लेण्यां छायाचित्रे घेण्यासाठीं जळगांव येथील जोत्स्ना फोटो स्टोअर्सचे मा श्री. श्रीराम वासुदेव परकी यांनीं परिश्रमपूर्वक सहाय्य केले याबद्दल त्यांचाही आभारी आहे.

द. वा. जोशी.
जळगांव

खुद्द बुद्ध हा बापाकडून कैकतवंशीय होता आणि बुद्धानें व जैनांनीं धर्मप्रसाराच्या कामांत नागजातांना वश करून आपले धमप्रसाराचें कार्य सुलभ केलें असावें. असा तर्क आहे. इजिप्त देशांतील राजे मस्तकावर नागभूषण धारण करीत. मेक्सिकोमध्यें नवीन उकरून काढलेल्या मय सस्कृतींत नाग भूषणें सांपडलीं आहेत. नागवेश व नागांची संस्कृति नामशेष झाली असली तरी त्यांची स्मृति नागपूजेच्या रूपानें अद्याप कायम आहे. असा मजकूर श्रीमंत औंधकर यांनीं आपल्या अजिंठा वर्णनाच्या पुस्तकांत लिहिला आहे.

## तत्कालीन समाजस्थितीचा बोध

अजिंठा लेण्यांतील चित्रकला, रंगकाम आणि कोरीवशिल्प यावरून तत्कालीन कारागिरांच्या कौशल्याचें आणि समाज स्थितीचेंही चित्र त्यांमधून पहावयास सांपडतें. समुद्र, टेकड्या, अरण्यें, निरनिराळया प्रान्तातील फळझाडांचे व फुलझाडांचें व फुलझाडांचें नमुने, स्त्री-पुरुषांचे पोषाख, राजे लोक, त्यांच्या राण्या, दरबारी महाल, सामान्य घरांची ठरीव बांधणी, सैन्य, सैनिक इतर लवाजमा अशीं नेहमीच्या मिरवणुकांचे देखावे, युद्धांतील हाणामारीचें प्रसंग इत्यादिकांची चित्रें तर अत्यंत प्रेक्षणीय आढळतात!

## राजे-राण्या

बहुतेक चित्रांतून राजा, त्याचे दरबार, राण्या चितारल्या आहेत. राजा रेखीव सुंदर आकृतीचा, लांब रेखीव डोळे, क्वचित थोडी मिशी असलेला चेहरा, शेंडीचा डोक्यावरील झुपका उजवे बाजूस बांधलेला एकंदर शरीर सौष्ठव मृदु. गोठूळ दाखविलें आहे. गळयांत मोठमोठीं मोत्यांची पेंडी तशीच दंडभूषणें वगैरे दाखविलीं आहेत. हे राजे लोक निरनिराळया जातीचे असावेत. कांहीं गौरवर्ण, कांहीं फिकट म र्तीच्या रंगाचें, कांहीं तांबूस तर कांहीं हिरव्या रंगाचे, असें काढले आहेत. त कधीं दरबारांत बसून कांहींतरी राजकारणी गोष्टी करीत आहेत किंवा

आपल्या राणीवंशांत बसून गप्पागोष्टी करीत आहे. कधीं कधीं युद्धांत, पारधींत गुंतलेले किंवा समुद्रांतील अथवा खुष्कीवरील लढायांत गुंतलेले असें दाखविलें आहेत. दरबारांत गाद्यांवरून लोडाशीं टेकून बसलेले किंवा आपल्या सिंहासनावरही विराजमान झालेलें राजे चितारले आहेत. बहुशः त्यांच्या राण्या व दासदासी पुष्कळच जवळ असतात. दरबारांत गोष्टी करीत असतांना प्रजेच्या फिर्यादी ऐकणें, परदेशच्या राजांचे वकील बोलावून त्यांचेशीं संभाषण करणें, आपल्या प्रधानांशीं सल्लामसलत करणें, गवय्ये, बजवय्ये आल्यास त्यांचा परामर्ष घेणें, राण्यांशी हास्यविनोद किंवा आपल्या नोकरांकडून अंग रगडून घेणें हेंही तेथेंच करतात. राजाची स्वारी बाहेर निघाली म्हणजे डोक्यावर राजमुगुट, अंगांत बंडी, पायांत विजार, डोक्यावर छत्र, असें बाहेर पडत. राजा कधीं घोड्यावर तर कधीं हत्तीवर बसून निघे. राजे शिकारीला निघाले म्हणजे लांब तरवारी, धनुष्य बाण. मोठमोठे शिकारी साथिदार बरोबर घेऊन निघत. हरणाच्या किंवा सिंहाच्या शिकारीस निघाल्याची चित्रें आहेत.

## घरें व राजवाडे

अजिंठ्याच्या चित्रांतील घरांची व राजवाड्यांची तऱ्हा एकसारखी आढळते. घरांचीं लांकडी बांधणी, २।२ मजले वर धाबे किंवा शिखरवजा छप्पर करण्याची पद्धत असे) घरांतील मुख्य दिवाणखान्यांत उंच बसण्याकरितां सिंहासन किंवा उच्चासन, त्यावर गादी अथवा निळया रंगाचे लोड, असें वर घातलेल्या उशा वगैरे ठेवलेली बैठक केलेली दिसते. खालीं दुसऱ्या बसण्याच्या जागा. टेकावयास मागें आधार, पाय ठेवण्याकरितां पादपीठें आणि पिकदाण्याही दाखविल्या आहेत. जमिनींवर फुलांचे, पानांचे अथवा फुलें काढलेल्या गालिच्यांचे आस्तरण काढलेलें आढळतें. स्त्रियांच्या महालांतून पलंग बिछानें ठेवलेले व स्वयंपाक गृहांतून ताटें, तांबे आणि पिण्याचीं भांडीही दाखविली आहेत. वरच्या मजल्यावर जाण्याकरितां जिने किंवा शिड्या अस्तित्वांत असून वरच्या मजल्याच्या खिडक्यावर उन्हा-पावसापासून निवारण करण्याकरितां झडपा काढल्या आहेत.

घरांच्या शिखरांवर मोठमोठ्या गच्च्या दाखविल्या असून त्यांतील उंच ठिकाणीं नगरशोभा पाहण्याकरितां बैठकीचीही ठिकाणें केली असून त्यावर निशाणें लावल्याचेंही दिसतें.

## भरपूर दागिने पण वस्त्रांचा तुटवडा !

राजांच्या अंगावरील दागिन्यांचा वर उल्लेख केला, पण त्यांच्या राण्यांचे वर्णन अधिक विस्तरानें करण्याची आवश्यकता आहे. राण्या निरनिराळ्या जातीच्या व वंशाच्याहीं आढळतात. राण्यांचें स्वरूप पुष्कळदां सौंदर्यपूर्ण तर कधीं कधीं बेढबही आढळते. त्या कधीं राजाजवळ गादीवर बसलेल्या तर कधीं राजास खेटून सिंहासनावरच बसलेल्या अशा काढल्या आहेत. मंचकावर बसलेली किंवा झोके घेत असलेली राणीही आढळते, राणीच्या व स्त्रीवर्गाच्या वेणी घातण्याच्या अनेक तऱ्हा चित्रांमधून आढळतात. कांहींच्या वेण्यांपुढे कपाळपट्टी किंवा भरपूर मोत्यांचा बिजवरा मोठ्या खुबीनें बांधलेला असून मागच्या वेणींत हरतऱ्हेचें अलंकार बुचड्यावर घातलेलेले दिसतात. फुलांच्या वेण्या तर जागोजाग केसांमधून लटकविल्या आहेत. पण सोन्यामोत्याचे, रत्नाचे, पाचूचे किंवा इन्द्रनील मणी गुंफलेले विविध प्रकारचे हार आणि दागिने शरीरयष्टींवर इतके अनंत दाखविलें तरी वस्त्र व पोषाख वापरण्याच्या पद्धतीवरून मात्र वस्त्रांचा तुटवडा असावा असें दिसतें. कमरेच्यावर विविध दागिन्यांनीं मढविलेली अंगयष्टि केवळ वस्त्र विरहित दाखविलेली असतें. क्वचित अपवादभूत राजाराणीखेरीज बाकीच्यांचे वस्त्रांचे पोषाख जणुं काय अंगभर वस्त्र वापरण्याची आवश्यकताच तत्कालीन पुरुषवर्गास वाटत नसावी, अशा पद्धतींचें दिसतात. स्त्रीपुरुषांची नेसण्याची व पांघरण्याची वस्त्रें कांहीं ठिकाणीं इतकीं पातळ व झिरझिरीत आहेत कीं, चित्रकाराचा कुंचला जरा अधिक हलक्या हाताचा असता तर बहुतेक शरीरयष्टी नग्नच दिसली असती ! दरबारी लोकांत मात्र कांहीं नखशिखान्त पोषाख केलेले आणि स्त्रिया निरनिराळ्या रंगाच्या चिटाच्या वस्त्रांचें पोषाख केलेल्या आणि कांहीं झिरझिरीत वस्त्रें नेसलेल्या अशा काढल्या आहेत. राजवाड्यांतून

दासदासींचे घोळके चोहोकडे चितारले आहेत. पुरुष चाकर नोकर तांबड्या व नीलवर्णाचें, काळ्या कुळकुळीत केसांचे आढळतात. त्यांच्यापैकीं कित्येक खुजे आहेत. अर्थात्‌च नोकरांना अलंकार थोडें पण कपडे अधिक घातलेले, कांहींतर नखशिखान्त पोषाख केलेले आणि डोक्यांस पांढरे पटके बांधलेले आढळतात. चाकरांचा पोषाख म्हणजे बाह्य असलेल्या बंड्या, गुढग्यापर्यंत पांढऱ्या ठिपक्यांच्या व पट्ट्यांच्या तुमानी अथवा अंगास फिट बसणारें निळे कोट व मोठे पागोटे असा कांहीं असतो. हे चाकर राजाराणीच्या डोक्यावर छत्र्या धरतात. कांहींचे हातांत निशाणें असतात, कांहीं घोडे धरून चालत आहेत, कांहींचें डोक्यावर गवताच्या मोळ्या, पानांचीं ओझीं दिसतात. राजसेवा म्हणजे त्यांचे अंग रगडणें, तेल चोपडणें हेंही करतात. कावडींतून पाणी आणावयाचे, डोक्यावरून अन्न वहावयाचें, देवडिवर पहारा करावयाचा अशीं कामें करीत असलेलें पुरुष नोकर चित्रित केले आहेत. तथापि,

## राजवाड्याच्या आंत दासीच !

कामास जास्त उपयोगी पडत दासी कांहीं गौरवर्णी, कांहीं पिवळ्या तांबड्या, कांहीं उदी रंगाच्या अगर काळ्या आणि त्यापैकीं कांहीं खुजाही आहेत. केस विंचरून वेणी घातलेली किंवा डोक्यावरून फडकें बांधलेली, अशाही दिसतात. कांहीं दासींनीं चोळ्या घातल्या असून कांहींनीं कशीदा काढलेली ठिपक्याचा रंगाची जाकीटें घातली आहेत. एव्हढेच नव्हें तर कांहींच्या अवयवांवर गोंदलेलेही आढळतें. खाजगी ठिकाणच्या या पोषाखाखेरीज सार्वजनिक ठिकाणीं चवऱ्या किंवा छत्र्या धरण्याचें काम या दासी करतात. मेवामिठाई फुलांचींताटें, खाद्यपेयांचें पदार्थ आणणें, राणीची वेषभूषा करणें, रत्नाचे करंडक, दंडभूषणें वगैरे आणणें, आपल्या धनिणीस—म्हणजे राणीस—अभ्यंगस्नान घालणें आणि पूर्ण पोषखांत एखादी काडी किंवा दंडा हातांत घेऊन अंतःपुरावर पहारा करणें हेंही या दासी करतात.

## सैन्य व सैनिक

अजिंठा लेण्यांत जीं चित्रें काढली आहेत त्यावरून लढाईच्यावेळीं राजे हत्तीवर बसून, सभोंवती घोडेस्वार व पायदळ घेऊन सैन्याच्या अग्र-भागीं चालत, असें दिसतें; डोक्यावर राजमुकुट व राजछत्र, जवळ धनुष्य-बाण तलवार अशीं कांहीं हत्यारें असत. पहिल्या चित्रांमधून असें दाखविलें आहे कीं, राजाजवळच्या पायदळ सैन्यांतील सैनिक धिप्पाड शरिराचे, लांब कानाचे असत व त्यांचें कमरेच्या वरचे भाग उघडेच असत हातांत परशू भाले आणि मोठमोठाले सोटे असवेत. इ. स. ४०० ते ६०० च्या दरम्यान जीं चित्रें काढलीं आहेत त्यांत कांहीं शिपाई हजामत केलेले तर कांहीं दाढ्या वाढविलेले असें काढलें आहेत. घोड्यावर स्वार झालेले सैनिक हातीं धनुष्यबाण किंवा भाले घेतलेले असें असून शरीर संरक्षणाची तजवीज म्हणजे एक ढाल व डोक्यावर शिरस्त्राण हें होय; आणि हल्ला करण्याची साधनें लांब पण वांकडी नेपाळी तलवार, पल्लेदार भाले, धनुष्यबाण, लाठ्या व जंबिये अशीं दाखविलीं आहेत. सैनिकांपैकीं कांहींनीं निशाणें घेतलेलीं असत.

## अजिंठा कालीन कारागिरी

अजिंठा कालीन शिल्पकार, खोदकाम करणारे आणि चितारी ह्यांचे परमावधीचें कौशल्य तर दृष्टोत्पत्तीस येतेंच. पण चित्रांतील विविध आणि अनंत प्रकारच्या दागदागिन्यांच्या देखाव्यावरून सोन्यामोत्यांची अशीं मनोहर भूषणें व दागदागिनें बनविणारे सोनार, तसेंच झिरझिरीत बहुतेक पारदर्शक वस्त्रें विणणारे साळी-कोष्टी, विविध तऱ्हेचें गालिचे व चिटाचे कापड करणारे व कशिदा काढणारे शिंपी इतके कुशल अस्तित्वांत असल्याखेरींज कितीही कुशल चितारी झाला तरी एखादा मनोहर नमुना दृष्टिपथांत आल्याखेरीज तो चित्र तरी कसें काढणार? अर्थात हे सर्व कारागीर आपापल्या धंद्यांत पूर्ण वाकबगार होते असें म्हणावें लागते.

गाड्यांच्या व गलबतांच्या चित्रांवरून समुद्रावरून व जमिनीवरून त्यावेळीं व्यापार चाले. अर्थात घर बांधणीच्या, गाड्यांच्या, रथांच्या बांधणीवरून तत्कालीन सुतारकाम मजबूत गलबतें बांधणीच्या पायरीपर्यंत पोचलें होतें असें दिसते. शेतकऱ्यांची स्थितीही सुखाची होती. घोडे, गाई, बैल मेंढ्या यांची चित्रें अजिंठ्यांत आहेत. आंबे, द्राक्षें, सिताफळी, इत्यादिकांची तसेंच केळीं, सुपारी अशांची झाडेंही अजिंठ्यांत चितारली आहेत आणि फुलांची तर त्यावेळीं फारच मागणी असावी. राजे राण्याना फुलांचे हार, साधुसंतांना अर्पण करावयाची विविध जातींची फुलें, स्त्रियांच्या वेण्याकरितां आणि शूर शिपायांच्या बक्षिसी करतां फुलांची आवड सर्वांसच होती. अर्थात ही सर्व शेतकरी वर्गाच्या परिश्रमाची फळें चिताऱ्यांच्या दृष्टीसमोर असल्यामुळें तशीं चित्रें त्यांनीं आपल्या कल्पनाशक्तीनें मनोहर काढली आहेत.

डोंगरी जातींपैकीं तत्कालीन किरात, भिल्ल अशा वनवासी जातींचे लोकही अजिंठ्यांत चितारलेले दिसतात.

## करमणुकीचे प्रकार

राजे लोकांची करमणूक शिकार हीच प्रमुख होती. शिकारीचीं प्रेक्षणीय चित्रें अजिंठ्यांत आहेत. तांबूस कातडीच्या शिकारी जातींबरोबर घोड्यावर बसून राजे व त्यांचे प्रधान शिकारीस जात. बरोबर पुष्कळ कुत्रे, रान उठविणारे शिकारी, हत्ती, तसेंच शिकार गमतीनें पाहण्याकरितां आलेल्या स्त्रिया असेंही चितारले आहे. हत्ती, सिंह, वाघ, रानटी बैल किंवा हरीण अशांची शिकार नेहमीं चाले, गवयांची तर वर्णी नेहमीच लागावयाची. स्त्री गायिका सारंगी अथवा दिलरुबा वाजवीत आहेत; सर्व उघडा पोशाख करून नर्तकी नाचत आहेत; तसेंच सनया, तबलें, मृदुंग, शंख तुताऱ्या हीं वाद्यें पुरुष वाजवींत आहेत, गारुडी लोक लहान लहान करंड्यांतून साप आणीत व नाचवीत आहेत आणि आपल्या फणा पसरून ढोलकीच्या आवाजावर साप नाचत आहे असें देखावे चितारलेले दिसतात.

उघडच आहे कीं, अजिंठा लेणी ख्रिस्तपूर्व तिसऱ्या शतकापासून खोदण्यास, रंगविण्यास व चितारण्यास सुरुवात होऊन ख्रिस्ती सनाच्या सातव्या शतकापर्यंत म्हणजे भारतांतील बुद्ध धर्माचा उदय, मध्य व अस्त काळापर्यंत जागतीं व बुद्धभिक्षूंच्या व कारागिरांच्या रहिवासाचीं ठिकाणें होती. संपूर्ण बुद्धचरित्र कोरलेलें अथवा रंगविलेलें या लेण्यांत दृगोचर होत असून बुद्धधर्माच्या महायान पंथाच्या सर्व खुणा अजिंठ्यांत आढळतात. अगदीं जुन्या विहार लेण्यांमध्यें बुद्धमूर्तीं किंवा बुद्धावशेष पूजास्थानीं ठेवलेले दिसत नाहीं. बोधिसत्व किंवा बुद्ध मूर्तींच्या तसेंच हिंदू देव-देवतांच्याही पूजा चवथ्या शतकापासून सुरूं झाल्यासारखें अनुमान होतें. इ. स. ३०० ते ५०० पर्यंत जीं लेणी कोरलीं आहेत त्यांत म्हणजे लेणें क्रमांक १९ अथवा २६ मध्यें बुद्धावशेषांची पेटी एक प्रार्थना विषय म्हणून मध्यभागीं ठेवलेली आढळते; त्या पेटीच्या भोंवतालच्या बाजूवर प्रेक्षणीय शिल्पकाम आणि दर्शनी भागांत शाक्यमुनींची कोरलेली मूर्ति अशी योजना आहे. आंतील गर्भागारांमध्यें शाक्यमुनींचे पुतळे बसविले आहेत. एक निळ्या रंगाचा पुतळा असून बाकी सर्व दगडाच्या रंगाचेच आहेत. सर्व पुतळे आसनस्थ आहेत. चेहऱ्याची ठेवण सर्व सारखी, डोकें मुंडन केलेलें, ओठ जाड, मुद्रा प्रशान्त, गंभीर व निरीच्छ अशी काढली आहे. कित्येक ठिकाणीं बुद्धमूर्तींच्या चेहऱ्यावर स्मितहास्य उमटून दिसतें. कान फारच लोंबते व लांब काढलेले दिसतात. कांहीं ठिकाणीं शिकवीत आहेत अगर प्रवचन देत आहेत असा भास होतो. एका हातांत कमळ घेतलें असून दुसऱ्या हातानें आशिर्वाद देत आहेत, असाही देखावा आहे. एकंदर उघडे पण कांहीं पुतळ्यांवरून अंगावर उपरणें घेतलेलें व तें डाव्या खांद्यावरून खालीं सोडलेले दिसतें. एकंदर देखाव्यावरून शाक्यमुनींच्या मूर्तींची पूजा बुद्धाच्या अनुयायांत पसरली होती, असें स्पष्ट दिसत आहे.

लेण्यांतून जागोजाग बुद्धमूर्तीं खोदलेल्या व रंगविलेल्या आढळतात. क्र. १७ च्या लेण्यात आठ बुद्धमूर्तीं पृथ्वीच्या पोटीं जन्मलेल्या दाखविल्या आहेत. क्र. २२ च्या लेण्यांत सात मूर्तीं पुन्हां अशा आहेतच शाक्यमुनींचे कोरीव पुतळे किंवा चित्रांतील मूर्तीं अगणित आहेत. बुद्धची.

आई त्याला पाळण्यांत घालून त्याची शुश्रूषा करीत आहे. बुद्धाचें गुरु आसित हें बुद्धांस कांहीं वाद्य वाजवावयास शिकवीत आहेत किंवा बंदुकीचा नेम धरण्यास शिकवीत आहेत इत्यादि देखाव्यांवरून बुद्धधर्मीयांनीं बुद्ध चरित्राचें कोड-कौतुक किती प्रमाणांत चालविलें होतें, त्याचा प्रत्यय येतो. माराच्या हल्ल्यांतून बुद्ध विजयी होऊन बाहेर पडले आणि क्र २६ च्या लेण्यामध्यें त्यांचा निर्वाण प्रवेश हे प्रसंग तर परमावधीची श्रद्धा व कौशल्य दर्शवितात.

गौतमबुद्धाखेरीज इतर बुद्धदेवाचे अवतार पद्मपाणी, अवलोकितेश्वर मंजुघोष आणि लोकेश्वर यांचेंही लेण्यांत चित्रदर्शन होतें. याखेरीज पूजार्ह मानलेले इंद्र, कुबेर, इन्द्रपत्नी शची आणि मानवीकोटीच्या वरच्या म्हणजे यक्ष, किन्नर, गंधर्व व अप्सरा, विद्याधर अशा कोटी तसेच राक्षसयोनींपैकीं मार, कली आणि इतर राक्षस यांचेही अजिंठावर्णनांत स्थान आहे. याखेरीज कांहीं विचित्र तऱ्हेचीं काल्पित मिश्रमानव सृष्टीही चितारली आहे. चित्रांतून भिक्षूंची व साधूंची चित्रें अत्युच्च दर्जाचीं काढलीं आहेत बुद्धभिक्षुखेरीज ब्राह्मण व जैन संन्यासींसुद्धां दाखविलेले दिसतात. बुद्धभिक्षु आकाशांत मेघमंडळाचेंवर संचार करीत आहेत. नग्या जैन साधूंचा घोळका, त्यांतील कांहीं उघडेबंब केशविरहित असेंही काढले आहेत कुणी राजा भिक्षूंचा आशिर्वाद घेण्यांस येत आहे. एखादा राजपुत्र नुकताच घोड्यावरून उतरून पूजा करतों असें दाखविलें आहे. एक सरदार स्त्री भिक्षूला वायन अर्पण करीत आहे. एका भिक्षुपुढें एका मोठ्या ताटांत चार मनुष्यांची मुंडकीं भेट म्हणून ठेवली आहेत व तो नको म्हणून म्हणत आहे, असें कांहीं देखावे काढलें आहेत.

## परदेशचे लोक व त्यांचेशीं व्यवहार

लेण्यांतील चित्रांमध्यें कांहीं चित्रें परकीयांचे चेहरे दाखविलेलीं दिसत आहेत. त्यांचा सारखवटपणा हाजिस, जपानी, युरोपियन किंवा चिनी लोकांच्या चेहऱ्यासारखा दिसतो, कांहीं इराणी लोकांसारखे इर

उघडच आहेत. पहिल्या लेण्यांतील एका चित्रांत एक हिन्दू राजा इराणी सरकारच्या वकिलाची भेट घेत आहे आणि इराणी वकिलाच्या पांढऱ्याशुभ्र कातडीवरून त्याची छोटी दाढी व उंच टोपी, अंगांतली बंडी त्या चिन्हा-वरून त्याचा इराणीपणा उमटून पडतो. क्र. १० च्या लेण्यांत इराणी जातीचीं तीन जोडपीं मद्यपान करीत असलेलीं चितारली आहेत.

## अजिंठा चित्रकलेचे कांहीं विशेष

अजिंठ्यांतील चित्रांचे बाह्यरेषालेखन इतकें सुंदर आहे कीं, तसें एका झटक्यांत कलम न उचलतां काढणें केवळ अशक्य आहे अजिंठ्यांतील रंग इतकें टिकाऊ असें कीं, जे २००० वर्षांनंतरही नुकतेच वापरलेले दिसतात ? हल्लीं बाजारांत मिळणारे नकली रंग अर्थातच त्यांनीं वापरले नाहीं. चित्रांतील पिवळा रंग बेळगांव धारवाडकडे मुलतानी माती म्हणून जिला म्हणतात त्या मातीचा केला आहे. हा पिवळा रंग अजिंठा डोंगराच्या. आसपास सांपडत असल्याकारणानें चितारयांची फारच सोय झाली. या पिवळ्या मातीशीं मिश्रणानें नारिंगी गौरवर्ण इत्यादि प्रकार केले असावे तांबडा रंग तर तांबड्या मातीच्याच अथवा कावेच्या मातींतून काढलेला दिसतो. हिरवा रंग अजिंठ्याच्या डोंगरांतच पुष्कळ सांपडतो निरनिराळ्या रंगांचे सान्निध्य मार्मिकपणानें साधून त्यांना चित्ताकर्षकता आणणें, हें रंग तयार करण्यांत व ब्रश ( कुंचले ) हलक्या हातानें वापरण्यांत योजिलेल्या कुशलतेवर अवलंबून आहे सर्व चित्रें काढतांना शरीराच्या निरनिराळ्य अवयवांचे आकार, त्यांचीं प्रमाणें व ठेवण पूर्ण अभ्यास केलेल्या चितारयांनींच ती काढली असलीं पाहिजेत, अशी खात्री वाटते. स्त्रियांचें पोषाख त्यांच्या वेण्या घालण्याच्या तऱ्हा, तसेंच मस्तकांवर घातलेलीं फुलें व अलंकार यांचें शेकडों नमुने अजिंठ्यांत सांपडतात. स्त्रियांच्या वस्त्रांमध्यें फक्त कमरेभोंवतीं वस्त्र गुंडाळलेला, पायघोळ वस्त्रें नेसलेल्या, अंगावर नुसतेंच उत्तरीय घेतलेल्या तसेंच. इतर विविध तऱ्हांनीं शरीरावयव झांकण्याची पद्धत असलेल्या अशा अनेक स्त्रियांचीं चित्रें नयनमनोहर काढलीं आहेत. पुरुषांचीं वस्त्रेंही अशीच विविधप्रकारचीं आहेत. एकंदर चित्रकलेचें सर्वांत

उत्कृष्ट रूप म्हणजे त्यांतील सृष्टिसादृश्य होय. ह्या बाबतींत आणि चित्रांच्या भावना निरनिराळ्या प्रसंगांत ते ते आविर्भाव चेहऱ्यावर व अंगविक्षेपांनीं दाखविण्यांत आजिंठ्यांतील चित्रकारांचा हात कोणी धरूं शकणार नाहीं, असें आजच्या प्रथितशश चित्रकारांनाही म्हणावें लागेल.

## चित्रांविषयीं कांहीं गैरसमज

अजिंठ्यांतील जागतिक प्रसिद्धिचें शिल्प व रंगकाम ज्या कालांत अस्तित्वांत आले व चितारले त्या काळची समाजस्थिति, तत्कालिन शिल्पकारांच्या व कलाकारांच्या धर्मभावना, त्यांचे त्या त्या कलेविषयींचे शास्त्रीय परिज्ञान या विषयींचा साधार व संपूर्ण इतिहास कालाच्या उदरांत गडप झाल्यामुळे आजिंठा पाहणारांना तदविषयक कल्पनांवरच अवलंबुन रहावें लागते. अर्थात् सर्व ठिकाणीं कल्पना खऱ्याच ठरतात असें नाहीं. अजिंठ्यांतील रंगकामाविषयीं बहुतेक ठिकाणीं कल्पनावरच अवलंबून रहावें लागत आहे. बुद्धचरित्रांतील निरनिराळ्या घटना, बुद्धाच्या अनेक मागील जन्माविषयींच्या जातक कथा व बुद्धधर्म ग्रंथामधून सापडणारे त्रोटक उल्लेख ह्यावरच सर्व कल्पनांची भिस्त ठेवावी लागते. यामुळें या लेण्यांतील चित्राविषयीं ज्या कांहीं कल्पना उपलब्ध ग्रंथांतून केलेल्या दिसतात त्यापैकीं कांही चुकीच्या असाव्यांत असा संशय येऊ लागतों. अशी २-३ संशयस्थलें आम्हीं आमच्या अल्पमतीप्रमाणें नमूद करीत आहोत.

अजिंठ्यांतील क्रमांक १ च्या लेण्यांत पदमपाणी बुद्ध व वज्रपाणी बुद्ध अशीं दोन प्रत्यक्ष गौतम बुद्धाची चित्रें आहेत असें सर्वत्र प्रसिद्ध आहे. लेण्याविषयींच्या प्रसिद्ध असलेल्या इंग्रजी-मराठी वाङ्मयांत व तदनुरोधाने शालेय पुस्तकांत सुद्धां पद्मपाणी बुद्धाची म्हणून जीं चित्रें दाखविली जातात ती चित्रें पद्मपाणी अथवा वज्रपाणी बुद्धाची नसून इंद्र व शची अथवा इंद्र व इंद्राणी यांची होत असें अधिक विचारांतीं म्हणता येते.

कारणें—

( १ ) क्रमांक १ च्या लेण्यांत पद्मपाणी बुद्धाचे म्हणून जें चित्र

आहे त्याठिकाणचे व्यक्तीचें हातांत् कमलपुष्प आहे. येवढ्यावरून ती व्यक्ति पद्मपाणी बुद्ध असावी असा व ज्या ठिकाणीं वज्रपाणी बुद्ध म्हणून व्यक्ति चित्रित केली आहे त्याठिकाणचे व्यक्तिचें हातांतचें हिऱ्याचे कमल-पुष्प सदृश एक अलंकार हातीं घेतल्यामुळें त्यामुळें त्या व्यक्तीस वज्रपाणी असें नांव गैरसमाजामुळें देण्यांत आले असावे. वज्र याचा संस्कृतांत हिरा असा अर्थ असल्यानें हिऱ्याचे पुष्प हातीं घेतल्यामुळें त्या व्यक्तीस वज्रपाणी असे सहज म्हणता आलें. पण हे दोन्हीही गैरसमज होत. कारण त्यागी, विरागी, सन्यस्त अशा गौतम बुद्धास अनुलक्षून ही चित्रें चितारली आहेत असें दिसत नाही.

असा गैरसमज होण्याचें आणखी एक कारण कीं, बुद्धाच्या निर्वाणा-नंतर त्याचे पुढे ५ अवतार झाले. त्यापैकीं एका अवतारांत बुद्ध वज्रपाणी नामाभिधान पावला व दुसऱ्यांत त्याचे नांव पदमपाणी असे होते. या बुद्धावतारांच्या नांवांचा संबंध क्रमांक १ मधील दोन्ही मूर्तींच्या हातीं कमळ, पुष्प व वज्रपुष्प पाहून त्यांचेशी जोडण्यांत आला व त्यांना साह-जिकच पद्मपाणी व वज्रपाणी म्हणण्यांची कल्पना सादृश्यावरून झाली, परंतु अधिक विचारांती ही कल्पना चुकीची असावी असें दिसते, मुंबई गॅझेटियरमध्यें आजिंठा लेण्यांचे वर्णन अतिशय विस्तारानें केले आहे. त्यांत या दोन्हीही ठिकाणच्या चित्रित मूर्तीला इंद्र व त्याचेच जवळच्या स्त्री-मूर्तीला इंद्राणी किंवा शची असें म्हटळे आहे. आणि हे म्हणणेंच बरोबर आहे. गॅझेटियर कारांच्या म्हणण्यास पहिला पुरावा अजिंठा लेण्यांतच भगवान बुद्धाच्या लहान-मोठ्या, विशाल–विशालतर, बैठ्या, उभ्या, आडव्या अशा ज्या हजारों मूर्ति शिल्पकारांनीं कोरल्या आहेत त्यावरून मिळतो. या सर्व मूर्ति विरागी बुद्धाच्याच केवळ कोरल्या असून संन्यासी बुद्धाचा पेहराव, केसांचा जटा–जूट (Top-Knot) व सन्यस्त वृत्तीला अनुसरूनच भगव्या रंगाचीच कफनी वगैरे वस्त्रप्रावरणें घेतलेलो असा आहे. सर्व ठिकाणीं बुद्ध ध्यानस्थ उपदेश देत असलेला, शेवटच्या निर्वाण प्रवेशांतसुद्धां चेहेऱ्यावर शांत वृत्तीचा प्रभाव पडलेला असा कोरीव शिल्पांत दाखविला आहे. कोणत्याहि ठिकाणीं अंगावर हिऱ्या-मोत्यांचे

अलंकार शिरोभागीं रत्नांचे दिव्य मुगुट व ऐहिक वैभवाची सजावट, अंगयष्टी व चेहरेपट्टी यांचे सभोवती कोरीव कामांत केलेली दिसत नाहीं. शिल्पकामांत तर याप्रमाणें भगवान् बुद्ध सन्यस्त, शांत वृत्तीचा अलंकार विरहित असा स्पष्ट दिसतो. आतां रंगकामातील बुद्धाच्या अनेक चित्र-कामाकडें पाहिले तर—स्त्रिया बुद्धाची पूजा करीत असतांना, समोरच्या शिष्यगणाशीं भावभक्तीनें बोलत असतांना, औदुंबर वृक्षाखालीं ध्यानस्थ बसले असतांना, अशोक वृक्षाखालच्या समाधींत तसेंच लेणें क्रमांक १७ मध्ये सारी पुत्ताच्या प्रश्नाला उत्तरें देत असतांना, एका लहान मुलाकडून भिक्षा घेत असतांना, फुला-वेलींच्या कुंजांवर यौगिक स्थितींत अधांतरी उभे अथवा बैठे असतांना आणि फार काय, मारानें केलेल्या प्रचंड हल्ल्यांत व सोडलेल्या स्त्रियांच्या मोहनास्त्रांत देखील अत्यंक निश्चल बसला असतांना अशा सर्व ठिकाणीं भगवान बुद्ध केवळ ज्ञानी, योगी, संत, साधू अशा स्वरुपानेंच चित्रित केले आहेत. त्यांच्या चेहऱ्यावरचे शांतस्वरूपी तेज व गांभीर्य किंचीतही ढळले नाहीं. अशा सर्व चित्रमय निश्चलावस्थेंतील बुद्ध हेंच क्रमांक १ च्या लेण्यांतील पद्मपाणी व वज्रपाणी होत काय असा मोठा संशय पडतो. विशेष काय, तर वैराग्य प्राप्त झाल्यानंतर त्यांची परित्यक्ता पत्नी किंवा त्यांचें मूल केव्हांही त्यांच्या सहवासांत नव्हते. असते तर कोणत्याहि प्रसंगीं अजिंठा चित्रकारांना ते सहज दाखविता आले असते. याचे उलट क्रमांक १ च्या लेण्यांत पद्मपाणी व वज्रपाणी जे दाखविले आहेत त्यांचे शेजारी त्यांच्या रत्नखचित मुगुट घातलेल्या राण्या व इतर स्त्रिया दाखविल्या असून भोंवतालील सर्व चित्रांत रत्नांचे, मोत्यांचे अलंकार, रत्नखचित मुगुट, आकाशांत किन्नर जोडपी उडत असलेली, मनोहर पर्वताचा देखावा अशी सर्व ऐहिक व शृंगारिक वैभवाची रेलचेल केलेली दिसते. ज्या चित्रास वज्रपाणी बुद्ध म्हणून म्हणतात त्यानें एका स्त्रीचे खांद्यावर हात ठेऊन कांहींतरी संभाषण चालविले असावे असें दिसते. अर्थात अशी सर्व विसंगती लक्षांत घेता पद्मपाणी अथवा वज्रपाणी म्हणून जी चित्रें प्रसिद्ध आहेत तीं भगवान बुद्धांची चित्रदर्शने नसून इंद्र व इन्द्राणीच होत असे स्पष्ट दिसते.

याच कारणास्तव प्रस्तुत दोनही चित्रें बोधितत्व पद्मपाणी किंवा बोधिसत्व अवलोकिरेश्वराची नव्हेत असे म्हणावे लागते. बोधिसत्व म्हणजे बुद्धाचे शिष्य, बुद्धधर्म प्रचारक होत असे मानले तर त्यांच्या स्वप्नदर्शन हिऱ्यामोत्याची असंख्य भूषणें, स्त्री-पुरुषाच्या डोक्यावरील रत्नाखचित मुगुट, स्त्रियांचे सांनिध्य अशी सामग्री असणें साहजिकच नाही तर अत्यंत विसंगत आहे एका चित्रांत इंद्राचे हातच्या कमस पुण्याप्रमाणें त्याचे शेजारीच कोणी राजपुत्र अथवा तदसदृश व्यक्ति चितारली आहे. तिन्याही हातांत पूर्ण फुललेलें कमलापुष्प चितारले आहे.

या कारणास्तव गॅझेटियरमधील लेखकांनीं या चित्रांचे वर्णन इंद्र व इन्द्राणी असें सुयोग्य व आदरणीय केले आहे. याकरितां त्यांना धन्यवाद देणें इष्ट आहे अजिंठा लेण्यांत जाणारांनीं दोन्ही चित्रें लक्षपूर्वक पाहून आपली मतें बनवावींत अशी विनंती आहे.

या कारणास्तव वज्रपाणी इंद्राच्या हातांत त्याचें 'वज्र' म्हणजे Thunderbolt असल्याची कल्पनाही चुकीची आहे. कारण त्यानें हातांत कमलपुष्पच घेतलें आहे.

## अजिंठा नांव कसें पडलें ?

आतां शेवटीं अजिंठा नांव कसें पडलें असावें या विषयी एक सुप्रतिष्ठित तर्क वाचकापुढें मांडावयाचा आहे.

अजिंक्यांतील शिल्पकार, व चित्रकार परिणतावस्थेस पोहोंचलेल्या आपल्या कलाज्ञानाचें प्रात्यक्षिक चिरकालीन टिकेल असें घडवित असतांना त्या संबंधीचा यथार्थ अभिमान त्याला वाटत होता. शिल्प चित्र कलांचें अजिंक्यस्थानच हे होय असें त्यांनीं म्हणणें सहाजीक होय. या त्यांच्या म्हणण्याचा प्रचार होत असतां तें आजिं ( क्य ) स्था ( न ), शेवटचें दोन वर्ण वाक् प्रचारात गळून फक्त आजिंठा एवढेंच राहिलें, 'स्था' या शब्दाचा अपभ्रंश 'ठा' शब्दांत झाला.

बुद्धधर्मीय भिक्षू व शिल्प चित्रकार अजिंठ्यातून गेल्यानंतरच्या अंधारयुगांत कलांच्या अजिंक्यतेचा अर्थ विसरला व अजिंठा एवढाच शब्द शिल्लक राहिला ! अर्थात् अजंठा हें नांव चूक होय.


घाट माथ्यावरील लेणापूर व अजिंठा ही खेडी मागाहून अस्थिवांत आली आहेत.

अजिंठा लेण्याचें महत्व कितीही भाषा फुलवून शब्दांनीं वर्णावयाचें म्हटलें तरी कोणाही लेखकाचें समाधान होणार नाहीं. अभ्यासानें या विविध कलांतील मार्मिकज्ञान ज्यांना झालें असेल अशांनीं आपल्या समाधानाकरितां अजिंठा लेण्यांतच एकवार स्वतः जाऊन शक्य तितका वेळ एकंदर सर्व लेण्यांचें वैभव अवलोकन करण्यांतच घालवावा, असें म्हणणें भाग आहे.

पुढील भागांत प्रत्येक लेण्याचें वर्णन देण्याचा आम्हीं यथाशक्ति प्रयत्न केला आहे.

# अ जिं ठा

इराणी वकीलात



लेणें १, पान १७

वेलबुटी



लेणे२, पान२७

उभीदासी [ चित्रकला विलास ]



लेणें २, पान ३१

वेलबुट्टी



लेणे २, पान ४४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ........................
क्रमांक ........................

# " अजिंठा लेणीं वर्णन "

ग्रंथ संग्रहालय ठाणे 77823 सं. ... स्थलप्रत

लेणें १

(क्रमांक १ चें हें लेणें या गुंफेतील सर्वोत्कृष्ट लेण्यांपैकीं एक होय. पुढच्या पडवीचा दर्शनी भाग हाच प्रथम चित्रकलाभिज्ञाचे चित्त वेधून टाकतो. पडवीसमोर एक द्वारमंडप ( पोर्च ) पूर्वी होता. त्याचे दोहों-बाजूस दोन कोठड्या आहेत.) पूर्वेकडील कोठडींतून आंतील दिवाणखान्यांत जाण्याचा मार्ग आहे. दिवाणखाना चौरस घेतला असून तो अंधारमय आहे. डावीकडील खोलींतून दुसऱ्या दोन खोल्यांत जाता येते. (दर्शनी पडवीच्या सहा खांबांना व दोन अर्धस्तंभांना तळाशीं चौकोनी बैठक व माथ्यावर तिरवे धीर दिले आहेत. प्रत्येक खांब पहिल्यानें अष्टकोनी दाखविला असून त्याचेवर खांबाचा घेर षोडष कोनी करून बदामी खुंटीचा आकार त्यांतील प्रत्येक भागांस दिला आहे. अर्धस्तंभहि याच धर्तीचे आहेत. या सर्व खांबांवरून गंधर्व, अप्सरा, शाक्यमुनि, त्यांचे भक्तगण अशीं चित्रें खोदलीं आहेत. सहाव्या खांबावर)

## माराचे प्रलोभनाची कथा कोरली

आहे. (माराचे डावे बाजूस दोन स्त्रिया असून माराच्या उजवे बाजूस कोणी व्यक्ति शाक्यमुनीवर आपल्या धनुष्याचा बाण सोडीत आहे. आणि एक उभ्या टोपीचा कोणी माणूस शाक्यमुनीवर दगड फेकीत आहे. शाक्य-मुनींचा नातेवाईक देवदत्त यानें शाक्यमुनींचा जीव घेण्याचा दोनदां प्रयत्न केला त्याची या कोरीव चित्रावरून आठवण दिली आहे. एकंदर

विहार लेण्यामध्यें उत्कृष्ट शिल्पकाम असलेलें असें हें एकच लेणें होय. द्वारमंडपावरील खोदकाम व शिल्पकाम बहुतेक सर्वच पडलें आहे, तथापि जें अवशिष्ट आहे त्यावरून त्याची भव्यता व कलावैशिष्टय दिसून येतें. दर्शनी बाजूचे सर्व खांब शिल्पकामानें खचून भरलेले आहेत. प्रत्येक दोन खांबांच्या मधल्या शिरोभागांवर पुतळे बसविले असून कोपऱ्यावर सिंह, मेंढें, वाघ, हत्तीचे कळप कोरून ते भरून काढले आहेत. बुद्ध चरित्रांतील निरनिळया प्रसंगांचे देखावे दाखविले असून डावे बाजूस

## हत्तींची झुंज व सिंहावरील स्वार

कोरले आहेत. दर्शनी भाग सर्वच कोरीव कामानें भरून टाकला असून जागोजाग हत्तींच्या विविध हावभावांचे नमुने कोरले आहेत. नंतर पुढे एका सैन्याच्या तुकडीची चाल (मार्च) कोरली आहे! तिच्यांत सिंहावरील स्वार दोन ढोल बडवीत पुढें जात आहेत, त्यापैकीं एकाचे हातीं बांसरी असून ती तो वाजवीत आहे. सर्व सैनिकांचें हातांत नेपाळी तलवारी व चौकोनी ढाली दिसत आहेत, पुढें तीन हत्तीवरील एक घोडे-स्वार अशी सर्व, कांहीं कामाकरितां मिरवणूक जात असावी असा देखावा दिसतो. जरा पलीकडे एका अंतःपुरांत एक राजा व राणी तीन सेवकां-बरोबर महत्त्वाच्या संभाषणांत गुंतलें आहेत. बाहेरचे बाजूस एक जीन घातलेला घोडा झाडाकडे बांधण्याकरितां नेण्यांत येत आहे. दुसरा एक, पाठीवर गोणी घेऊन राजा राणीकडे चालत येत आहे. तसेंच इतस्ततः पक्षी उडत असलेल्या लताकुंजांत खुद्द राजाराणी बसलीं आहेत. आणखी एका उत्कृष्ट देखाव्यांत एक स्त्री आपल्या पतीचे गळयाभोंवती हात टाकीत आहे. बाहेर चार हत्ती निरनिराळ्या चेष्टा करीत आहेत. त्यांचे पुढें दोन रेड्यांची झुंज चालली आहे व एक एक मनुष्य रेड्यामागें उभा राहून त्यांना चिथावीत आहे! कोपऱ्यावरील सिंहाचे समोर चार व्यक्ति काढल्या असून त्यांत एक स्त्री, हातीं तलवार घेतलेला मनुष्य, तिसऱ्याच्या हातांत एक ढाल, चौथा मोठा मनुष्य जमिनीवर बसलेला असें असून त्या चौघांकडे दोन घोड्यांच्या रथांत बसून शाक्यमुनी येत आहेत.

पलीकडच्या चित्रखंडांत एका बागेंतील झाडाखालीं राजा बसला असून त्याच्या करमणुकीसाठीं एक स्त्री कांहीं वाद्य वाजवीत आहे. दुसरा एक चाकर मागें उभा आहे. मध्येंच एक ताडाचें उंच झाड दिसत आहे. इतक्यांत मागील चित्रांत दाखविलेला रथारूढ शाक्यमुनी इकडून आपला रथ वळवीत असून जवळच एक केळीचें झाड व काठी टेकीत टेकीत चाललेला म्हातारा असें चित्र आहे !

या चित्रामागें शाक्यमुनी आपले गाडींत बसून चालला असतां कांहीं लोक एक प्रेत नेत आहेत. आणि त्या प्रेताबरोबर एक स्त्री रडत आक्रोश करीत चालली आहे असे देखावे कोरले आहेत. हे देखावे बुद्धास वैराग्य प्राप्त होत असतांना जे प्रसंग घडले त्या विषयीचे होत.

## रान बैलांची व हरणांची शिकार

उजवे बाजूस रानबैलांची शिकार चालली असून दर्शनी भागावरील एक घोडेस्वार हरिणावर भालाफेक करीत आहे. जवळूनच एक शिकारी कुत्रा किंवा बिब्या वाघ धावत आहे. आणि त्याचेमागे तिघां हत्तींवर स्वार झालेले दाखविले असून एक लठ्ठ व ओबडधोबड आकृतीचा माणूस खांद्यावर एका बांबूच्या दोन टोकांस बोचकी बांधलेली घेऊन चालला आहे.

## दारू पिणारे जोडपें

जवळच्या दालनांत एक मजबूत असा तरुण हातांत दारूचा पेला घेऊन बसला असून जवळच एक सेवक दारूचे भांडेंही घेऊन उभा आहे. आणि त्या तरुणाची स्त्री त्याला अधिक दारू पिण्याविषयीं आग्रह करीत आहे असा देखावा काढला आहे.

## हत्ती व महात

वरील देखाव्याचे उजवे बाजूस एक हत्ती चारा खात आहे. आणि त्याचा संरक्षक महात त्याला आळवून आळवून चारा खाऊं घालीत आहे असा एक देखावा, त्याचे पलीकडे एक स्त्री एका पुरुषाकडे जात असून

दुसरी एक स्त्री गुडघे टेकून त्या पुरुषापुढे फारच विनवण्या करीत आहे. तिचे पाठीमागे तिचे कांहीं सेवक म्हणजे एक घोडेस्वार, दुसरा एक खुजा पाठीवर गोणी घेतलेला आणि एकानें हातीं छत्री धरली आहे असे, दोन दासी जवळ आहेत. (त्याचे पलीकडे ६ रानटी हत्ती दाखविले असून एक हत्ती आपल्या सोंडेनें

## एक भयंकर अजगर ओढीत आहे)

(या शेवटच्या देखाव्यामधून कांहीं दाढीवाले व जटाजूट धारण केलेले तपस्वी एकाचे हातांत बाटली व दुसऱ्याचे हातांत वळणावळणांची एक काठी असून त्याचेसमोर एक मनुष्य येत असून त्यानें आपली तरवार उपसून आतां तुझे डोकें फोडतो असा आविर्भाव आणला आहे!)

या सर्व कोरीव कामाचे वरचे बाजूस मोहोटीसारखा पुढें काढलेला व अनेक खिडक्यांनीं भरलेला असा एक भाग आहे. प्रत्येक खिडकींतून एकेक माणसाने डोकें वर काढलें आहे. पुढील एका स्वतंत्र दालनांत कित्येक स्त्री-पुरुष आपल्या चाकर-नोकरांसह बसलीं असून मधून मधून पानफुलांच्या व झुडुपवेलींच्या वेलबुट्या काढल्या असून जागोजाग हंसी कोरल्या आहेत. या कोरीव कामाचे दालनाचे वर वाघांची डोकीं, धांवतीं वेलबुट्टी, शाक्यमुनी व त्यांचे सेवकगण मधून मधून कोरले आहेत.

या पडवीच्या दालनाचा आकार ६४′ लांबीचा व ९′ रुंदीचा व १४ फूट उंचीचा आहे. आंत जाण्याचा भला रुंद दरवाजा व त्याचे भोंवतालची वेलबुट्टी अत्यंत प्रेक्षणीय आहे.

## आंतलें मोठें दालन

६४ फूट चौरस असून त्यास मधल्या खांबानें उचलून धरलें आहे कीं काय असें भासविलें आहे. मोठ्या दालनास शाला किंवा सभामंडप म्हणावेत. याला सभोंवतीं ओऱ्या आहेत. आंतील खांबाच्या शिल्पकामांचें वर्णन तर केवळ अशक्यच म्हटलें पाहिजे. आणि असें भरपूर शिल्पकाम केलें आहे कीं,

या शिल्पकारांच्या अविश्रांत मेहनतीचें चीज अजिंठा गुंफेंत जाणाऱ्या प्रेक्षकांनीं निदान लक्षपूर्वक पाहून तरी केलें पाहिजे.

खांबावर शिंगें असलेले सिंह स्वारांसह, दोन खांबावर हत्ती व त्यांचेवरील स्वार, दोन दोन खांबावर यक्ष गंधर्वांचीं पोरें, कांहीं ठिकाणीं देवदूत, मधल्या दोन खांबांवर चैत्याची पूजा करीत असलेल्या कांहीं मानवाकृति व

## कोरलेलीं अशीं चार हरणें पण एक डोकें !

हें चित्र दोन बाजूस हत्तींच्या झुंजीमध्ये अशा खुबीनें काढलें आहे कीं, त्यांचेकडे पहातच रहावें ! पलिकडचे डावे बाजूस एका कोरीव दालनांत एक राजा, त्याची राणी व एक लहान मूल व दोन चामरधारी, दुसरा एक सेवक, असें चित्र आहे. हें बुद्धाच्या लहानपणाचें असावें. बुद्धाची आई राणी मायावती व राजा शुद्धोधन आणि लहानगे बुद्ध असेंच त्यांत कोरले आहेत असा तर्क आहे. या पुढचा देखावा दोन राजे आपल्या सेवक गणांसह एका खांबावर कोरले आहेत. त्यांपैकी एक नागराजा असून ते दोघे चैत्याची पूजा करतांना एकमेकांशीं कांहीं महत्त्वाच्या गोष्टी करीत आहेत असें दिसतें. या दालनांतील कोरीव कामाचे आणि मागच्या खांबांच्या रांगेवरील जी विशाल भालपट्टी आहे तिचें वर्णन कितीहि बारकाईनें केलें तरी त्या सर्व कामाची केवळ अस्पष्ट कल्पनाच येईल. सर्व वर्णन करणें केवळ अशक्यच होय. खांबांच्या पायांवर पुराणांतल्या वर्णनाप्रमाणें राक्षस व मगर यांच्या आकृति कोरल्या असून वरच्या भागांत मनुष्याकृति सिंह आणि सिंहाकृति मनुष्य कोरले आहेत. आणि कोपऱ्यावर खुजे बसलेले आहेत. त्यांत ८ हातांचा एक लठ्ठ खुजा व डावे बाजूस राक्षस व खुजे एकत्र काढले आहेत. आणि काळवीटांची, मागच्या पायांवर उभीं असलेलीं – जोडपी प्रत्येकाच्या मुखांतून लगामासारख्या पुष्पमाला घातल्या आहेत ! याच कोरीव कामांत मागील बाजूस भिक्षूंकरितां ५ कोठड्या कोरल्या असून त्यांचे मागे आणखी एक अंतर्गृह कोरलें आहे, आणि त्याचेहि पुढें वीस फूट चौरसाच्या एका कोठडींत शाक्यमुनींचा एक

विशाल व भव्य पुतळा कोरला असून त्याचें दोहों बाजूस रत्नखचित मुकुट असलेल्या इंद्राचे हातांत त्याचें वज्र दिलें असून सिंहासनापुढें एक चक्र धावेवर उभे करून ठेवलें आहे. शिवाय दोन हरणें आणि तीन सेवक डाव्या बाजूला आणि उजव्या बाजूला ५ सेवक एका हरणाचे मागें असा देखावा दाखविला आहे. हे सर्व लेणेंच पूर्वी रंगविलेले होते. परंतु आतां त्यांतील अनेक देखावे व रंग नष्ट झाले आहेत. तथापि आहे तेच आतिशय चित्तवेधक आहेत. त्यांतील कांहीं देखाव्यांचें वर्णन पुढें करीत आहों.

## नागराजा परिवारासह

**दरवाज्यावरील देखाव्यांत** एका राजवाड्यांत नागराजा बसला असून जणूं काय त्याच्या मांडीवरच बसलेला एक पांच फणांचा सर्प डोक्यावर छत्र धरून आहे ! त्याचे हातांत डाळिंबासारखे हिरवें फळ दिसतें. डावा हात आपल्या स्त्रीच्या खांद्यावर ठेवला आहे. निळ्या रंगाचा पोशाख केलेली एक दासी राणीचे पाय चेपीत आहे. एक ताम्रमुखी दासी राणीस पंख्यानें वारा घालीत आहे. गौरवर्णाची एक दासी चिटाचा घट्ट पोशाख करून एका हातानें एक खाण्याचे पदार्थ असलेले ताट आणि डाव्या हाताने पाण्याचे भांडे असें राजाराणी समोर ठेवत आहे. आणखी एक दोन दासी, इतक्यांत राजाच्या भेटीकरितां येणाऱ्या चित्रविचित्र रंगांतील पोशाखाच्या एका सरदाराकडे निरखून पहात आहेत. या सरदाराचा पोशाख निळ्या जरतारी शालीचा, त्या शालीवर विविध प्रकारच्या वेलबुट्टया व ज्या जरतारी देखाव्यांत नक्षत्रें, बदकें व क्वचित बैलही दाखविले आहेत, अशा अत्यंत अनुपमेय शालीच्या पोशाखाकडे कोणीहि आश्चर्यस्तब्ध मुद्रेनें अजूनही या देखाव्यांत पाहूं शकेल. भेटीस आलेल्या या गृहस्थाचे मागें भिंतीस टेकून उभी असलेली एक स्त्री हातांत टाळ घेऊन वाजवीत आहे. एक मनुष्य वर बघून हातानें एकीकडे एक तंतुवाद्य वाजवीत आहे. असा एक प्रेक्षणीय देखावा या चित्रांत दिसतो. या चित्रांतील स्त्रियांच्या केशकलापांच्या तऱ्हा वेगवेगळया व आकर्षक असून ( एकीनें आपल्या केसांवरून एक पांढरा शुभ्र चौकोनी रुमाल बांधून ठेवला आहे. ) कांहीं स्त्रियांनीं आपले

कुरळे केस हातांत घेतले आहेत असें दिसतें. राजाचे उजवे बाजूस एक दासी चौरी ढाळीत आहे. डावे बाजूकडून एक म्हातारा आंत शिरतो. त्याचे डोक्यास टक्कल पडले असावे किंवा त्यानें गुळगुळीत हजामत केली असावी. मागच्या इमारतींत एक शिडीसारखे वर जाण्याचे साधन दिसत असून यावरून एक मनुष्य वर चढत आहे.

वरील राजवाड्याबाहेर उजवे बाजूस एक सुंदर चेहऱ्याचा मनुष्य भोंवताली बघत असून एक रत्नखचित पोशाख केलेली, मोठ्या कुलांतील कुणीतरी स्त्री एक कोपर उशीवर ठेऊन डावीकडे बघत आहे. या ठिकाणचे कौशल्य फारच उठावदार दिसते. भिंतीचा हिरवा रंग वरच्या निरनिराळ्या वेलबुट्ट्यामुळें खुलून दिसत असलेला, या बैठकीच्या दिवाणखान्याचे छत निळ्या रंगाचें, खालची जमीन मधून मधून रत्नखचित, संगमरवरी दगडांची असा सौंदर्याचा परमावधीचा देखावा दिसत आहे. या देखाव्यावरून नेपाळी किंवा ब्रह्मी लोक जसे लांबच लांब झगे घालतात तसे त्यावेळीं घालत असत असेंही अनुमान होतें. तयार कपडे व त्यावर तऱ्हतऱ्हेचे कशिदेही काढण्याची प्रथा तेव्हां अस्तित्वांत होती.

## बुद्धदेव पर्वतावरील गुहेंत

शाक्यमुनि बुद्धाला पर्वतावरील एकांतवासाची फार आवड होती. तसेंच ध्यानस्थ बसण्याकरितां पर्वतांत गुंफा अथवा गुहा कोरून त्यामधून एकांतवासी बसण्याचा त्यांचा परिपाठ होता. त्यामुळें ही लेणीं खोदली गेली. अशा एका पर्वतामधील गुहेंत बुद्धदेव बसले आहेत. त्यांचेसमोर एक राजा गादीवर बसला असून तो बुद्धदेवास नमस्कार करीत आहे. राजाची बायको व एक ताम्रवर्णी चाकर पाठीमागे उभे आहेत. बुद्धदेव आणि राजा यांच्यामध्यें एक स्त्री बसली असून तिनें आपले केश वेणी घालण्याकरितां हातांत घेतले आहेत असा देखावा चित्रित केला आहे.

## राजासमोर नृत्य गायन

वरच्या देखाव्याच्या पुढेंच एका भव्य देखाव्यांत एक राजवाडा दाखविला असून राजाराणी बसली आहेत. राणीचे मागें एक दासी चवरी

ढाळीत आहे. राजाचे मागें एक ताम्रवर्णी दासी असून दुसरी फुलांची परडी घेऊन आंत येत आहे. उजवे बाजूकडील पडवींत तीन स्त्रिया उभ्या असून त्यांच्यापैकीं एक कांहीं बातमी घेऊन आली आहे. अशा वेळीं उजवे बाजूस एका नर्तिकेचे नृत्यगायन सुरू असून ती आपले हावभाव पद्धतशीर-पणें करीत आहे. तिची साथ म्हणजे डावे बाजूस दोन मुरलीवाले, दुसरे बाजूस एकजण तबला वाजवीत आहे. पाठीमागें दोघेजण झांज वाजवीत असून ताल धरीत आहेत असा नाच चालला आहे असा देखावा चितारला आहे.

ह्याचेंच उजवे बाजूस एका दिंडी दरवाजांतून राजाची स्वारी हत्ती-वर बसून बाहेर निघत आहे. त्याचेपुढे राजपुत्र घोड्यावर बसून चालला असून जवळ प्रधानजी आहेत. तसेंच एक हिरवा उमदा घोडा पुढल्या घोळक्यांतून प्रमुखपणें चालविला आहे. ह्या लवाजम्यांत सैनिकांच्या हातीं लांब लांब नेपाळी तलवारी असून ढाल, भाले व निशाणें ही कांहींच्या हातीं आहेत. ही राजपुत्राची मिरवणूक जाता जाता एका ठिकाणीं थांबली असें दाखविले असून त्या ठिकाणीं बसलेल्या एका साधूसमोर राजा आपल्या हत्तीवरून व राजपुत्र आपल्या घोड्यावरून खाली उतरले आणि त्यांनीं त्या साधूस मोठ्या भक्तिभावानें नमस्कार केलेला दिसत आहे. साधूचे डावे बाजूस दोन निळया रंगाची हरिणें एक पवित्र हंसी व शुभ्र पोशाखाचा एक शिष्य मागें उभा असून दोन पोरें हात जोडून समोर उभी आहेत. उजवे बाजूस एक व्यक्ति हात वर करून जणुं कांहीं ऐकत आहे. एका दासीच्या हातांत कांहीं भांडें असून पुढे तीन सैनिक एकाचे हातीं नेपाळी तरवार, दुसऱ्याचे हातीं धनुष्यबाण आणि तिसऱ्याचे हातीं भाला असे चितारले आहेत.

## राजवाड्यांत घबराट

तिसऱ्या कोठडीच्या दरवाजावर सुरवात होऊन पाठीमागच्या अर्ध-स्तंभापर्यंत एक मोठा देखावा चितारला आहे. त्यात एक राजा आपल्या राजवाड्यांत बसला असून त्याची राणी समोरच्या दुसऱ्या एका आसनावर

वसली आहे. उत्तमोत्तम जडजवाहिराचे दागिने घालून कमरेखालीं उंची मोलाचें वस्त्र नेसून राजाशीं कांहीं महत्त्वाचें संभाषण ती करीत आहे असें दिसतें. राजाचे पाठीमागें दोन दासी असून त्यांचे हातांत चौऱ्या आहेत. आणखी एक स्त्री दुसऱ्या एकीशीं बोलत आहे. तशाच प्रकारें आणखी कांहीं स्त्रिया व पुरुष आश्चर्यानें व भीतीनें थक्क होऊन तें संभाषण ऐकत आहेत व आपले

## लिंबाएवढे गरगरीत डोळे

फिरवीत आहेत, आणि एकीनें तर आपले मागचा तक्याच भीतीनें धरून ठेविला आहे. इतक्यांत दरवाजाजवळ एक बाई आली असून कांहीं-तरी भयंकर बातमी घाबऱ्या घाबऱ्या सांगत आहे. नंतर दरवाजाबाहेर डोक्यावर छत्र घेतलेला राजा घोड्यावर बसून बाहेर निघाला आहे. भयप्रद बातमीमुळें झालेला घबराट ह्यांत सुंदर चितारला आहे.)

## (समुद्रकिनारा व फुटकें जहाज

ह्या देखाव्याचे उजवे बाजूस समुद्राकिनाऱ्याचा देखावा चितारला असून समुद्रावर दोन गलबतें दाखविली आहेत. एकींत लोक मजेंत बसले असून राजा सुकाणूजवळ डोक्यावर छत्र घेऊन बसला आहे. दुसरें जहाज फुटलें असून त्यांत पाणी शिरलें आहे, तें इतकें कीं समुद्रांतील मासे जहाजांत पोहोतांना दिसत आहेत. एक मनुष्य या जहाजांत सांपडला आहे आणि समुद्रांतील मगर किंवा इतर भयप्रद जलचर आपणांला खातील म्हणून भलताच घाबरलेला चेहरा करून वर बघत आहे. दुसऱ्या एकानें निराशेनें हात वर केले असून "बुडतो! बुडतो!!" असें ओरडत आहे.

## केळींचें वन!

(या देखाव्याचे उजवे कोपऱ्यांत केळीच्या वनांतून दोन पुरुष चालत आहेत. त्यांचे जरा खालीं एक मनुष्य दुसऱ्यापासून कांहीं भेट घेत आहे.) आणि या देखाव्याखालीं एक नागराजा चार सेवकांबरोबर

बसला असून बाहेर एक मनुष्य मोठ्या दुःखानें दुसऱ्याची विनवणी करीत आहे. आणि त्याचेच मागे एक राक्षस एका मनुष्यास फाडून खात असून खातां खातां त्या मनुष्याचा फक्त एक पायच शिल्लक राहिला आहे.

तिसऱ्या व चौथ्या दरवाजाचे मध्यें ह्याच भिंतीवर एका रथाचा फक्त शिरोभाग दिसत असून त्या रथांत फक्त चौघेच बसले आहेत. एकाचा मुकुट रत्नांचा आहे आणि त्याचेवर कोणीतरी चौऱ्या ढाळीत आहे.

मागचे भिंतीवर आणखी एक महत्त्वाचा देखावा चितारला आहे. त्यांत एका चौकोनी सिंहासनावर राजा बसला असून त्याचे अंगास उटी लावीत आहेत. एक हिरवी दासी फुलांचें तबक त्याचेसमोर ठेवीत आहे, एक दासी चौरी ढाळीत आहे. त्याचे मागे दोन पुरुष उभे असून ते मोठ्या वाटोळ्या घागरीमधून राजाचे डोक्यावर तेल ओतीत आहेत. मागचे बाजूस एक कांचा मारलेला मनुष्य पांढरा कबजा घालून खांद्यावरून एक मोठा पाण्याचा घडा आणीत आहे, आणि दुसरा एक म्हातारा एका काठीवर आपल्या अंगाचा भार टाकून राजाकडे बघत आहे. वर पाहिलें असतां माडीवरून एक मुलगा डोक्यावर एक मोठें वाटोळे ताट घेऊन जात आहे आणि त्या ताटांतून एक तरुण मुलगी हलकेंच कांहींतरी उचलून घेत आहे! दुसऱ्या दालनाचे बाहेर चार भिक्षेकरी आपले हात पसरून भिक्षा मागत आहेत. आणखी एका दालनामध्यें एक साधु बसला असून त्याचे मांडीवर भिक्षापात्र आहे. समोरचेच कोठडींत झिरझिरीत वस्त्रें नेसलेल्या व जवाहिराचे दागिने अंगावर घातलेल्या चार स्त्रिया आल्या आहेत. त्या साधूस भेट वगैरे देऊन पूजा करीत असाव्या.

## (एक बीभत्स देखावा

तिसऱ्या दालनांत कांहीं चाकर-नोकरांसह राजा बसला आहे. तेथील चित्रकाम थोडें नष्ट झालें आहे. परंतु खालचे बाजूस एक मनुष्य आणि त्याची स्त्री चार माणसांची मुंडकीं एका ताटांत घालून एका साधुपुढे ठेवीत आहेत व तो साधु तीं मुंडकीं घेण्याचे नाकारीत आहे. साधु दुसरीकडे निघून जात आहे व लोक त्याचेकडे बघत आहेत.)

## पर्वताचा देखावा, इंद्र व शची

या देखाव्यांत एक मोठा पर्वत चित्रित केला असून त्यांत बुद्धाची आवडती देवता इंद्र हिची मोठी भव्य आकृति चितारली आहे, हा इंद्र किंवा शुक्र मोठा मुगुटधारी, सौंदर्यवान, हातीं नीलकमल घेतलेला आणि गळयांत मोत्यांच्या सराचें जानवें घातलेला असा आहे. इंद्रानें कमरेखाली वस्त्र परिधान केले आहे. इंद्राचे दक्षिणेस त्याची राणी शची ही काढली असून ती इंद्रापेक्षां बरीच काळी आहे. तिचेही डोक्यावर मुगुट व हातांत फूल आहे. या दोघांचे मध्यें त्यांचा चामरधारी सेवक असून इंद्राचे डावे खांद्यावर मागील कड्यावरूनच एक माकड चढत आहे. त्याचे मागें एक पक्षी आणि दुसरीं दोन माकडे दर्शविली असून मागच्या वनश्रींत कोणा-तरी गंधर्वाचे मूल दिसतें. दुसरे बाजूस एक माकड धांवत येत असून त्याचे मागें कांहीं किन्नर, त्यांचेमागे आणखी वानरें व देवदूत हातात तलवारी व ढाली घेऊन मेघमण्डलांतून धांवत आहेत. डावे टोंकास एक सुंदर सिंहाचें चित्रही रंगविले आहे.

## माराचें प्रलोभन

अंतर्गृहाच्या डाव्या टोंकास शाक्यमुनींना त्रस्त करण्याकरितां मार राक्षसानें पाठविलेले दूत आल्याची चित्रें आहेत. हा चित्रखंड मूळचा १२॥ फूट लांब व ८॥ फूट रुंदीचा असावा. परंतु त्याच्या वरचा व खालचा कांहीं भाग नष्ट झाला आहे. तथापि या चित्राच्या मध्यभागीं एका हिरव्या उच्चासनावर शाक्यमुनि आसनस्थ बसले असून त्यांनीं आपला उजवा हात ताठ पसरला आहे. अंगांत कफनी व शिरोभागीं वर्तुळ दिसत असून वरील झाडाच्या फांद्यांवरून बोधिवृक्षाची कल्पना येते. उजवे बाजूस माराची एक मुलगी शाक्यमुनीच्या सिंहासनावर एक हात ठेऊन त्यांचेशीं कांहीं विनवणी करीत आहे. तिचे पाठीमागें वर आकाशांत कांहीं उंचीवर एक राक्षसवर्णी भयंकर योद्धा सर्व शस्त्रास्त्रें घेऊन शाक्यमुनीस दरडावीत आहे. एक राक्षस भयप्रद अक्राळ विक्राळ चेहरे करून भयानक देखावा उत्पन्न करीत आहे. या राक्षसाचे मागे एक वाघ काढल्यासारखा दिसतो.

पण त्याचा वरचा भाग नष्ट झाला आहे. पलीकडे घोड्याचे तोंड असलेली एक मानवाकृति असून तिचे हातांत सोटा दिसत आहे. त्याचेच पाठीमागे

## करालकालीचें चित्र

काढले आहे. ही काली शाक्यमुनींस आव्हान देत आहे. आणि एका हातांत परशु व कुऱ्हाड घेऊन शाक्यमुनींपुढे मृत्यूचा नाच करीत आहे. त्याचेचजवळ एक अतिशय लहान चेहरा व डुकराचे तोंड असलेली माणसे हातीं सोटा घेऊन उभीं आहेत. एकानें तर आपल्या हातांतील धनुष्यांतून एक बाण शाक्यमुनींचे अंगावर सोडला आहे. अशा तऱ्हेनें शाक्यमुनींवर चहुंकडून हल्ला करणारे सर्व राक्षस एकत्र गोळा झाले असून त्यांचेच मध्यें निळे साप अंगावर सोडले आहेत आणि उलट मार ज्या ठिकाणीं बसला आहे तिकडचा देखावा सुंदर असून इतका छळ केला असूनही कांहीं उपयोग नाहीं असें पाहून मार हा निघून जाण्याच्या तयारींत आहे. शाक्यमुनीजवळ दागदागिन्यांनीं सजविलेल्या सुंदर स्त्रियाहि पाठविल्या होत्या; शाक्यमुनींची तपःश्चर्या भंग पावेल असे त्यांस वाटले होते. त्या सर्व स्त्रिया शाक्यमुनींस भुलविण्याकरितां बोधिद्रुमाखाली गेल्या व त्यांनीं दुरप्रयत्न केले परंतु शाक्यमुनी आपल्या व्रतापासून ढळला नाहीं.

## इन्द्र व इन्द्राणी

मंदिराचे दोन्ही बाजूस दोन सुंदर वनश्रीयुक्त पर्वतांचे देखावे असून मध्यभागीं इंद्राचें चित्र काढलें आहे. उजव्या बाजूच्या देखाव्यांत इंद्राचे हातीं वज्र असून त्याची प्रिय पत्नी शची शेजारी आहे. घारापुरीच्या लेण्यांत ज्याप्रमाणें इंद्राची कोरीव आकृति आहे त्याप्रमाणेंच ह्या देखाव्यांतील चित्र हुबेहूब वठविलें आहे. मोठा रत्नखचित मुगुट, गळ्यांतील मोठा हार, कर्णभूषणें, मनगटावरील पोंचा, बाहुभूषणें हीं सर्व तेथल्याप्रमाणेंच येथें चित्रित केलीं आहेत. मोत्यांचे अनेक सर एकत्र गुंफून केलेलें जानवें यज्ञोपवीताचे ठिकाणी डाव्या खांद्यावरून खालीं सोडलें आहे, उजव्या हातांत एक फुलांची माळ घेतली आहे. चेहरा ध्यानमग्न दाखविला असून

डावे बाजूस शचीनें फुलांची परडी हातीं घेतलेली, जवळ दोन खुजांचीं चित्रें दाखविलीं आहेत. डाव्या कोपऱ्यांत

## झिरझिरित वस्त्रांचें अनुपम चित्रण

एका आसनावर एक स्त्री-पुरुष बसविले आहेत आणि त्यांचे अंगावरील वस्त्रें इतकीं झिरझिरित व तलम सुताचीं दाखविलीं आहेत कीं, डाक्याची मलमल त्याच्यापुढें फिकी पडावी. त्याचेच पुढें दोन पक्ष्यांचीं चित्रें आणखी अर्धवट अवशिष्ट राहिलेलीं कांहीं स्त्री-पुरुषांचीं चित्रेंहि आहेत. खालीं एका कोनाड्यांत दोन निळे पक्षी बसल्याचें दिसतें. उजव्या बाजूचें चित्रकाम यासारखेंच आहे. मात्र या बाजूकडे काढलेलें शचीचें चित्र पहिल्या चित्रापेक्षां फारच उत्कृष्ट निघालें आहे. शचीची अंगकांति, तिच्या अवयवांची ठेवण, दोन्ही हातांतून घेतलेली फुलांची परडी, कमळें वगैरे आणि तिचीं तीं एकदम पारदर्शक परिधान केलेलीं तलम वस्त्रें पाहून चित्रकाराच्या कलेविषयीं कोणीहि थक्क होऊन जातो. तिच्याजवळ एक खुजी दासी असून तिचें डावें हातीं एक सुगंधी सामानाचा करंडा आणि अर्थातच या सगळ्या चित्रखंडाची पार्श्वभूमिका म्हणून अत्यंत रम्य वनश्रीनें युक्त अशा पर्वताचें चित्र ह्यांत आहेच. उजव्या कोपऱ्यांत थोडी जागा राहिली त्यांत एक मनुष्य कांहीं तंतुवाद्य वाजवीत ठेवला असून जवळच एक स्त्री झांज वाजवीत बसली आहे.

## शाक्यमुनींचीं बैठीं चित्रें

अंतर्गृहांतील उजव्या हाताकडील भिंतीवर शाक्यमुनींचीं बैठीं चित्रें काढलीं असून कमळांचें फुलावर कांहीं उभीहि काढलीं आहेत. शाक्यमुनींच्या प्रत्येक चेहऱ्याभोंवतीं प्रकाशवर्तुळ स्पष्ट दाखविलें असून प्रत्येक दोन चित्रांमध्यें वनस्पतींचे मधुर देखावे व वेलबुट्ट्या काढल्या आहेत. ह्यावरून या प्राचीन चित्रकारांचे ( कलाकारांचें ) चित्रण-कौशल्य, त्यांची कल्पनाशक्ति, वनस्पती जीवनाविषयींचें त्यांचे मार्मिक ज्ञान व्यक्त होते.

## अंतर्गृहाचा दर्शनी भाग

आणि उजवीकडील पहिल्या कोठडीचा दरवाजा ह्यांचे मध्यें नेहमी-प्रमाणें पर्वताचा देखावा असून त्याचे मध्यभागीं एका राजाची धिप्पाड आकृति काढली आहे. त्याचें सर्वच चित्रण भव्य व प्रेक्षणीय आहे. या आकृतीचे गळ्याभोंवती साखळी दाखविली असून उजवे बाजूस त्या राजाचा कदाचित् मुलगा असावा असें त्याच्या मुगुटावरून व फुलें वगैरे राजास देण्याच्या हावभावांवरून दिसतें. या चित्राचें महत्त्व विशेष असें कीं, त्यांतील स्त्री-पुरुषांनीं जे दागदागिने आपल्या अंगावर घातले आहेत ते सर्व जसेच्या तसेच किंचित्हि खपलें न गळतां पहावयास सापडतात. दागिन्यांची ढब प्रेक्षणीय आहे.

## सव्वीस आकृतींचा देखावा

पाठीमागच्या भिंतींतील दोन कोठड्यांचे डोक्यावर एका मोठ्या देखाव्यांत २६ एकसारख्या आकृति काढलेल्या दिसतात. आणि त्याचे पलीकडे एका राजवाड्यांत एक राजा आपल्या गादीवर बसला आहे आणि एक गारूडी एका करंड्यांत साप घेऊन आला आहे.

## गारुडी व सापाचा करंडा

ह्या गारुड्याकडे राजा पुढें वांकून पहात आहे. राजा व गारुडी यांचेमध्यें प्रधान उभा आहे. राजाची वारा घालणारी दासी तसेंच राणीहि आपलें केंस मोकळे सोडून बसली असून ती राजास कांहींतरी विचारीत आहे. राणीचे मागें तीन पुरुष बसले असून एकाजवळ तरवार आहे. उजव्या कोंपऱ्यांत तो गारुडी आपल्या सापाचा करंडा उघडीत आहे. त्यांतून साप सळकन बाहेर पडतो आणि त्याच्याशीं गारुडी खेळत आहे. त्याच्या पाठीमागें झाडीनें आच्छादलेल्या टेंकडीचें चित्रण आहे. या चित्र-खंडाची उंची ७ फूट १० इंच आहे.

## नागराजा व द्रविडराजा यांची भेट

या देखाव्यांत एक नागराजा व द्रविड राजा यांची भेट चितारली असून ते परस्परांशीं कांहीं महत्त्वाचें संभाषण करीत आहेत असा अविर्भाव आहे. नागराजाचे डोक्यावर एक पांच नागफणांचें छत्र असून त्याचे उजवे बाजूस एक दासी चौरी ढाळीत आहे. नागराजाचे पाठीमागें एक काळाकभिन्न सेवक हातीं तलवार घेऊन उभा आहे आणि जवळच एक स्त्री आपल्या डाव्या हातांत करंडा घेऊन उभी असून तिचेजवळ हातांत तलवार व डोक्यांत इराणी पगडी घातलेला सेवक आला आहे. नागराजाजवळ बसलेल्या स्त्रीशीं त्याचें संभाषण चाललें असून, सुरकुत्या पडलेला व रुपेरी केसांचा एक म्हातारा मनुष्य जवळ उभा आहे. समोरच दोन स्त्रिया बसलेल्या असून त्या कांहीं हकीगत लक्षपूर्वक ऐकत आहेत. हा सर्वच देखावा चित्रकलेच्या अभ्यासकांस आदर्श नमुना म्हणून पुढें ठेवण्यासारखा आहे,

दुसऱ्या कोठडीचे उजवे बाजूस जें चित्रखंड आहे त्याचा वरील चित्राशीं संबंध असलेला दिसतो. या चित्रांतील पोषाख वगैरे सर्व माणसेंहि तीच असल्यामुळें वरच्या सारखीच आहेत. यांतील नागराजाची आकृति मात्र निराळी असून तिचे डोक्यावर सर्पाच्या फणींचें एक चित्र आहे आणि तिचे केंस मोकळे आहेत. या नागराजापुढें एक स्त्री गुडघे टेकून कांहींतरी विनवणी आग्रहानें करीत आहे.

## आठ हत्तींचीं चित्रें

उजव्या भिंतीवरील बहुतेक चित्रें पाकोळ्यांनीं भोंकें पाडल्यामुळें नष्ट झालीं आहेत. तथापि त्याचेवर ८ हत्तींचीं चित्रें दिसतात. पुढें कित्येक सैनिक व नेपाळी तलवार घेतलेला एक हिरव्या कातडीचा घोडेस्वार दिसतो. त्याचेसमोर ४–५ रानटी हत्ती असून एका टेकडीचे देखाव्यांत शाक्यमुनी बसले आहेत, पाय खालीं सोडले आहेत, दोन भिक्षेकरी कांहीं मागत आहेत. आणि शाक्यमुनींचा एक शिष्य, एक साधू व शुभ्र वस्त्र परिधान केलेली एक स्त्री असें चित्र आहे.

पहिल्या कोठडीच्या दरवाजावर उजवे बाजूचा देखावा प्रेक्षणीय आहे. त्यांत एक गोऱ्या कातडीचा राजा आपल्या राणीसहवर्तमान सिंहासनावर बसला आहे. समोरून एक स्त्री येत असून तिच्या पाठीमागें दासी आहे. डावे बाजूस एक मोठा देखावा अवशिष्ट राहिला आहे. त्यांत पुष्कळ तोकड्या केंसाचे लोक असून एकाचे गळ्यांत हार व कानांत कुंडलें आहेत. एकानें पांढरी शाल वापरली आहे.

पुढच्या ओरीचे उजवे टोंकाला एक मोठा चित्रखंड रंगविलेला आहे. ह्यांत राजाचें आसन हिरव्या कपड्यानें आच्छादिलें असून त्यावर नागफणायुक्त असा राजा बसला आहे. त्यानें आपला एक हात जणुं काय पुढच्या लोकांशीं बोलत आहे अशा आविर्भावानें वर केला आहे. पुढें एक उंच स्त्री खांबास टेकून उभी असून तिनें गुजराथ रेशमाचें लुगडें पेहरलें आहे. तिच्या डाव्या हातास एक तांबूस वर्णाचा खुजा किंवा दासी असावी. दुसरी एक स्त्री चौरी धरून उभी आहे. तिने आपल्या हाताची तर्जनी आपल्या हनुवटीस लावली असून चेहरा समाधान दर्शवीत आहे. राजानें पाय ठेवलेल्या स्टुलाखालीं त्याची पिकदाणी आहे व उजव्या बाजूस दिवाण बसला आहे व राजाशीं कांहीं बोलत आहे. वरचे बाजूस हिरव्या गादीवरच राणी बसली असून तिचा पोषाख तलम पारदर्शक कपड्याचा आहे. गळ्यांत एकेरी आणि अनेक पदरी सरांचें हार पुष्कळच घातले असून तिचे कमरे सभोंवतीं रत्नखचित कमरपट्टा आहे. तिचेंहि मागें एक स्त्री चौरी धरून उभी असून तिनें उभ्या पट्टयांचे एक पातळ परिधान केले आहे. पाठीमागचे बाजूस एक गौरवर्णाची स्त्री साध्या पोषाखांत उभी आहे, ती गौळीण असावी. राणीचे पलीकडे एक स्त्री बसली आहे आणि प्रधानाचे डोक्यावरचे भागांत आणखी एक स्त्री बसवली असून तिचे डाव्या हातांत फुलें व एक पंखा किंवा आरसा उजव्या हातांत दिसतो. राणीचे समोर एक लहान स्त्री-पुरुष दांपत्य दिसते; स्त्रीचे खांद्यावर एक टोपली किंवा पोतें असून उजव्या बाजूस नेहमींच्या पद्धतीचा दिंडी दरवाजा व जाळीच्या खिडक्या आहेत. एका खिडकींत पाण्याचा घडा दिसत असून त्यावर एक पेला उपडे तोंड करून ठेवला आहे.

## गांवठणाचा देखावा

या देखाव्यांत निरनिराळ्या रंगाच्या गाईंचा कळप दाखविला आहे. दोन गाई व एक वासरूं हिरव्या रंगाचें काढले असून कांहीं गाई उभ्या तर कांहीं गाई बसलेल्या आहेत. बहुतेक गाईंच्या गळ्यांत घंटा बांधली असून त्यांची अंगलट व ठेवण हुबेहुब गाईसारखी आहे. या गाईंच्या कळपामागें दोन राक्षसाकृति आणि तिसरी एक व्यक्ति काढली असून त्या व्यक्ति गाईंना हाकलून देण्याच्या विचारांत आहेत असे दिसते. खालील जमिनीपासून हें चित्र ६ फूट १० इंचावर आहे.

## इराणी वकिलात

पुढच्या भिंतीवरील रंगकाम पुष्कळच नष्ट झालें आहे. तथापि उजवे बाजूकडील खिडकी आणि दरवाजा यांचेमध्यें एक मोठा देखावा रंगविला आहे. परंतु तो सर्वच बाबतींत निकृष्ट प्रतीचा दिसतो. एक फिक्या कात॰ डीचा राजपुत्र एका गादीवर बसला असून त्याचे उच्चासनावर कांहीं विशेष महत्त्वाचे चित्रकाम नाहीं. फक्त कोपऱ्या कोपऱ्यांतून राक्षसांचे मुखवटे काढलें आहेत. उजवीकडे इराणी पोषाखांत असलेले ३ भव्य व सुंदर दाढीवाले आलेले असून त्यांच्या त्या उंच उच टोप्या, पायघोळ कफन्या प्रेक्षणीय आहेत. या राजपुत्राकडे ते मोठ्या नम्रतेनें वाकून वाकून येत आहेत. एकाचे हातांत मोत्याचा हार आहे. दुसऱ्यानें हातात एक दारुची बाटली घेतली आहे आणि तिसरा एका मोठ्या परडीत कांहीं भेटी घालून पुढे आणीत आहे. तिसऱ्याचें मागे पांढऱ्या पोषाखांत एक आकृति दिसत असून एका हातांत काठी व कमरेला कट्यार लावून दरवाजांत उभ्या असलेल्या एका इराण्यापाशीं कांही बोलत आहे. हा इराणी आंतमध्यें कांहीं भेट आणीत आहे आणि या इराणी पोर्टरचे मागे आणखी कांहीं परदेशी असून त्यांचा पोषांख पूर्णपणें विदेशी असून कमरेस सरळ, लांब तलवारी लटकावलेल्या आहेत. राजसिंहासनामागे एक चामरधारी स्त्री उभी असून तिचे उजवे बाजूस निळे पोषाखांत उभा असलेला एक उमदा पुरुष दिसतो.

यांचे समोर उजवे बाजूस एक सुंदर पुरुष असून त्यानें आपले दोन्ही हात छातीवर घेऊन तो राजास कांहीं हकीगत निवेदन करीत आहे असें दिसतें. बहुतकरून तो दुभाषी असावा. त्याचे पाठीमागे उजवे बाजूस दोन आकृति असून एकीचे हातांत ताट आहे आणि त्यांत कांहीं फळें आहेत. तसेच एक भाला आणि त्याचे फळास निशाण लटकावलें आहे असा देखावा काढला आहे. समोरची इराणी माणसें राजघराण्यांतील असावीत असें पोषाखावरून ओळखतां येते. त्यांचेमध्यें एक युवराज असेल. डावें बाजूस सिंहासना-समोर दुसरी एक स्त्री मौल्यवान पोषाखाची अंगांत चोळी घातलेली अशी बसली आहे. तिचेही पाठीमागे एक ठेंगणी स्त्री आकर्षक पण हलक्या पोषाखाची बसली असून या दोघींचे मागें तिसरी जी स्त्री आहे, तिनें चोळी घातली आहे व राजपुत्राकडे बघत आहे. हा देखावा प्रत्येकानें पहाण्या-सारखा आहे.

राजवाड्याबाहेर उजवे बाजूसही एक इराणी काढलेला दिसतो व तो आपल्या समोरच्याशीं कांहीं बोलत आहे. जवळच दोन घोडे असून त्यांचेसमोर एक शिपाई तलवार घेऊन उभा आहे. जमिनीवर जिकडे तिकडे फुलेंच फुलें पसरली असून इराणी बादशाहचा वकील, महाराष्ट्राचा राजा दुसरा पुलकेशी याचेकडे आल्या वेळचा हा देखावा चितारला आहे. हें चित्र जमिनीपासून ८ फूट ५ इंचावर चितारलें आहे. या चित्रांतील भेटीच्या प्रसंगाचा काळ इ. स. ६२५ च्या सुमाराचा असावा.

दरवाजाचे दुसरे बाजूस तितक्याच उंचीवर सुमारें त्याच काळांतले एक रंगकाम चितारलें आहे. त्यांतील चित्राच्या मध्यभागीं एक राजा आपले मांडीवर एक निळा पांढरा पक्षी घेऊन बसला आहे. त्याचे पाठीमागे टकल्यांची प्रभावळ बरीच उंच अशी दिसते. मागें दोन सेवकांचे चेहरे व एक चामरधारी स्त्री उभी दिसते. खालीं एक काळ्या कातडीचा, केस पिंजारलेला पोरगा घागर आणीत आहे. डावें बाजूस राजासमोरच्या उभ्या दोन स्त्रियांपैकीं एकीचे हातीं एक करंडा असून तिनें आपल्या केसाची बुचडी घातली आहे. आणि राजा आपल्या समोरच्या त्या लहान मुलांशी बोलतो आहे असें दाखविले आहे. समोरच एक मनुष्य शिरोभूषणांत मौल्यवान

रत्नें असलेला राजाशीं बोलत आहे. बाहेर उजवे बाजूस एक पिंपळाचे झाड आहे. राजाचे डावे बाजूस ५ स्त्रिया आहेत. पुढचे भागास एक स्त्री मूल घेऊन उभी आहे. तें मूल घेण्यास राजा आपले हात पुढें करीत आहे. ती स्त्री मुलास घेण्यास हरकत करीत आहे. जवळच्या दोन स्त्रिया आपलें उर बडवून शोक दर्शवीत आहेत. एक मनुष्य पट्टया पट्टयाचा पोषाख केलेला असा आहे. एक स्त्री राजाकडे विनवणीदर्शक चेहऱ्यानें पाहत आहे. लहान मूल ओरडत असून त्यामुळें त्याच्या आईचें लक्ष एकदम त्याचेकडे वेधलें आहे. या चित्रांतील एकंदर करुणाजनक देखावा मोठा स्वाभाविक व परिणामकारक झाला आहे. जवळच आणखी एक स्त्री आपले मांडीवर मुलास ठेवून त्यास मिठी मारीत आहे. या चित्राचे मागें एक सुपारीचें झाड काढलें असून जवळच मोठमोठ्या पानांची झुडुपें आहेत.

राजपुत्रासमोर एक मनुष्य येऊन त्यास अभिवादन करीत आहे. या पलीकडील भिंतीवरून दोन साधू राजपुत्राशीं कांहीं तरी बोलत आहेत.

या देखाव्याचे वरचे बाजूस दोन उभ्या आकृति काढल्या असून त्याचेसमोर एक आसन घालून बसलेला साधु आहे. हा देखावा कांहीं तरी दिव्य करून एखाद्या गुन्ह्याचा निकाल करण्याचा प्रसंगाचा असावा.

ह्यु-एन्-त्संग म्हणतो की, या प्रकारच्या दिव्यामध्यें एक मोठा तराजू आणतात. त्यापैकीं एका पारड्यांत गुन्हेगार आरोपीस बसवितात आणि दुसऱ्यांत एक दगड ठेवतात. जर मनुष्य दगडापेक्षां अधिक वजनाचा भरला तर तो निर्दोष समजला जात असे. याप्रमाणें दिव्य करण्याची रीत परंपरागत चालत आलेली आहे.

वरील देखाव्याचे खालीं एक राजा कांहीं साधूंच्या झोपड्यासमोर गेला असून त्यास डोक्याचे संपूर्ण मुंडन केलेला एक साधु भेटत आहे. या साधूचे मागें ५ शिष्य उभे असून प्रत्येकानें आपल्या खांद्यावरून उत्तरीय घेतलें आहे. पहिल्या शिष्याचें हातांत पाण्याचें भांडें असून दुसऱ्या हातानें तो राजास थांबण्याविषयीं खुणावीत आहे. उजवे बाजूस दोन तांबडी दाढी असलेले साधू असून एकाचें हातीं फुलें, दुसऱ्याचें हातीं गवत किंवा दर्भ आहेत.

डाव्या खिडकीचे माथ्यावर देखाव्यांची एक मालिका अशी आहे कीं, त्यांचा परस्पर संबंध असावा पण ते कशाबद्दल आहे तें स्पष्ट दिसत नाहीं.

## मायादेवीचें स्नान

या खिडकीच्यावर एका पलंगावर एक स्त्री बसली असून ती आपले दासीकडे खाली बघत आहे व ती दासी त्या स्त्रीच्या गळ्यांतील हार काढीत आहे. ही स्त्री बहुतकरून शाक्यमुनींची आई मायादेवी असावी. आणि तिच्या स्नानाचा देखावा चितारण्याचें हें चित्र असावें. तिचे पाठीमागे अंगांत चिटाची चोळी घातलेली एक दासी चवरी घेऊन उभी आहे. पलंगाचे उशाशीं एक स्त्री पाण्याचे मोठें भांडे घेऊन आपल्या धनीणींचे डोक्यावर पाणी ओतीत आहे. तसेंच उजवे बाजूलाही एक दासी उभी असून पाणी ओतीत आहे. पलंगाचे पलीकडे एका स्त्रीचे हातांत काठी असून ती जणू काय पहाऱ्याकरितां बसली असावी. उजवे बाजूस एक चाकर एक मोठा घडा घेऊन बसला असून त्यांतील पाणी एका तोटीनें बाहेर येऊन गळत आहे. उजवे बाजूस राजवाड्यांत दुसरी एक स्त्री बसली असून पलीकडे एक मनुष्यही बसला आहे. आणि त्यानेही आपल्या अंगावरून बुरखा घेतला असून तो राणीशी बोलत आहे. तो ज्योतिषी असावा. त्याचे मागें एक सुंदर स्त्री हातांतील ताटांत कांहीं पदार्थ घेऊन त्या माणसास देण्याचे तयारीत आहे असें दिसतें. यांचे पाठीमागें एक शुभ्र पोषाखाचा मनुष्य दरवाजांतून आंत येत आहे.

खालचे बाजूस एका चित्रखंडांत दोन आकृति दिसत आहेत. प्रसंग असा दिसतो कीं, एक स्त्री व तिचा प्रियकर एकत्र बसले आहेत. आणि त्या स्त्रीचे मागें दुसरी एक स्त्री बसली असून हात पसरीत आहे. तिनें आपले डोळे आश्चर्यानें ताठ करून तोंडाचा 'आ' वासला आहे. या चित्रानंतर वाड्याचा एक खांब आहे. आणि नंतर दुसरा भाग लागतो.

या दुसऱ्या भागांत एक अर्धनग्न चवरीवाली दासी एका आकृतीकडे बघत असून त्या आकृतीचे मोत्यांच्या सराचे जानवें अवशिष्ट दिसते.

या दासीचे पाठीमागें एक काळी चोळी घातलेली व पांढरी फुलें घेतलेली बाई पहिल्या दोघांकडे बघत आहे. एक केळीचें झाड उजवे बाजूस असून तिकडून खुली हवा येत आहे असें वाटते. या चित्राचें पलीकडे कांहीं स्त्रियांची अस्पष्ट चित्रें आणि पलीकडे दीड फुटाचाच भिंतीचा भाग चित्र काढलेला दिसतो, यांत फळा-फुलांचीच चित्रें विशेष असून एका भागांत इराणी पोषाखांत दोन आकृति दिसत आहेत.

## छतावरील चित्रण कौशल्य

या लेण्याचा छताचा पुष्कळसा भाग आतां नष्ट झाला आहे, तथापि जो आहे त्यावरून एकंदर छत रंगविण्याचा प्लॅन कसा अप्रतिम आंखला आहे तें दिसून येते. ज्या चित्रकारानें हीं चित्रें काढली व रंगविली त्यानें प्रत्येक चित्रखंडाचे लाकडी नमुने तयार करून हुबेहुब तशींच चित्रें छतावर व भिंतीवर वठविली असली पाहिजेत अशी कल्पना येते. छताच्या एकंदर प्लॅनपैकीं एक एक तुकडा स्वतंत्र घेऊन त्याचा साधा आराखडा प्रथम काढून घेतला असावा आणि बाकीच्या गोष्टी मागाहून भरण्याचे ठरविले असावें. छताचा प्लॅन ज्या स्वरूपाचा ह्या लेण्यात घेतला आहे तसाच बहुतेक सर्व लेण्यांत असून क्रमांक १७ चे लेण्यांत मात्र प्रत्येक तुकडा वर्तुलाकार घेऊन त्यांची चित्रें रंगविली आहेत. प्रत्येक वर्तुलांत व वर्तुलखंडांत निर-निराळ्या प्रकारचे देखावे व चित्रण खच्चून भरले आहेत. आश्चर्य असे कीं, एवढ्या विशाल, विविध आणि चित्ताकर्षक चित्रणाच्या किंवा रंगकामाच्या देखाव्यांत एकही हात गैरसफाईनें मारलेला नाहीं !

## इराणी जोडप्याचें मद्यपान

या छतावरील महत्त्वाच्या तीन चित्रखंडांपैकीं एकांत एका इराणी जोडप्याचा दारू पिण्याचा देखावा आहे. एका पलंगावर कोणी एक इराणी बसला आहे. लोड तक्के पडले आहेत. तो स्वतः धष्टपुष्ट धटिंगण दिसतो. दारू पिऊन तो मस्त झालेला आहे. दाढी व मिशा दोन्हीही दाखविल्या

असून लांबसडक केस व उंच लांब टोपी डोक्यावर घातली आहे. अंगांत एक बंडी गुडघ्यापर्यंत घातलेली, गुडघ्यापर्यंत पायमोजे व पट्टया-पट्टयाच्या विजारी असा त्याचा पोषाख चितारला आहे. त्याच्या हातांत एक मद्याचा पेला असून दुसरा भरलेला पण झाकलेला, एका तबकांत खाली ठेवला आहे, त्याचे जवळच्या स्त्रीचा झगा गुडघ्यापर्यंत झाकलेला दिसतो. फक्त तिच्या बुटाचे पाठीमागचा भाग किंचित् दर्शविला आहे. तिनें आपल्या हातांत एक मोठें मद्यपात्र घेतलें असून त्याची आकृति सोडावॉटरच्या बाटली-सारखी दाखविली असून तिच्या अरुंद तोंडांतून नवऱ्याचे हातीं असलेल्या दारुच्या पेल्यांत आणखी मद्य ओतण्याकरितां तिनें आपला हात तयार ठेवला आहे. या स्त्रीचे मागें तिची एक दासी मोठ्या रुंद तोंडाची झाकलेली घागर घेऊन उभी आहे.

या चित्रखंडाचे शेजारीच याचाच जणुं काय दुसरा प्रवेश म्हणून वरचाच दारुडा आपल्या उजवे हातांत मद्याचा पेला धरून डावे हातांत एखादी काठी अथवा लांब तलवार घेऊन बसला आहे. त्याचे कमरेंत असलेला कमरपट्टा परिश्रमपूर्वक काढलेल्या नक्षीचा दिसतो.

ह्या नायकाचा कोट आणि त्याचा झगा हे वेगवेगळ्या तऱ्हेचे दिसतात. त्याची स्त्री नायकाच्या खांद्यावर आपला उजवा हात टाकून आधार घेऊन बसली आहे. आणि तिच्या आविर्भावावरून ती कांहीं तरी बोलणार किंवा सांगणार आणि आपले प्रियकरास खूष करणार असें दिसते. या खेरीज आणखी एक तिसरी दासी जवळ बसली आहे आणि तिचेजवळ असलेल्या एका झाकलेल्या तबकांतून कांही खाण्याच्या वस्तू वाढण्याच्या विचारांत आहे असा देखावा चितारला आहे. याच मद्यपानप्रसंगाच्या तिसऱ्या प्रवेशांत आधिक स्पष्ट देखावे दिसतात.

या नायकाच्या पलंगामागें एक पडदा असून त्या पडद्यावर फुलांचे व वेलबुट्टीचे कित्येक नमुने आहेत. यांतील नायकाचा कोट व स्त्रीचा झगा उत्कृष्ट चितारला आहे. स्त्रीचे चित्र अगदीं हुबेहुब काढलें असून तिचे चेहऱ्यावरील नायकाविषयीच्या प्रेमाचा आविर्भाव अत्यंत प्रशंसनीय आहे. या चित्रांतील दुसऱ्या दासीजवळ मद्याच्या घागरीऐवजी एक मोठें मद्यपात्र-

किंवा मोठा पेला दिसतो. आणि तिसऱ्या दार्साऐवजी या चित्रांत दोन बाबरओठे दाढीवाले निग्रो लोक चितारले आहेत. या दोन्ही चित्रांतील पायमोजे पांढऱ्या रंगाचे आहेत.

चवथा देखावा असाच पान प्रसंगाचा काढला आहे. त्यांतील दोन पुरुष बॅक्ट्रीयांतील रहिवासी असावेत. ते एकमेकांशी आणाशपथा घेत असून एकीकडे दारू पीत आहेत असें दाखविलें आहे. इराणचा बादशहा दुसरा खुश्रू आणि त्याची राणी शिरीन ह्यांच्या वकीलांतीतील महाराष्ट्राच्या राजास भेट दिल्यावेळचे जे प्रसंग घडले त्यांत ही परदेशी इराणी मंडळी कशी दिसली त्याचें चित्रण या ठिकाणीं केलें आहे असें वाटतें.

# लेणें क्रमांक दोन

✤✤✤ लेणें २

( या लेण्यांतील खालीं लिहिलेले वर्णन
लाईटचे सहाय्यानें व बारकाईनें पहावें. )

क्रमांक १ च्या लेण्याप्रमाणें हेंही बरेच अलीकडचे व फारच मौल्यवान लेणें होय. ह्यांत अप्रातिम चित्रकाम, खोदकाम व कोरीव काम अशा कामगिरीची रेलचेल आहे. पुढील पडवी ४६ फूट लांबीची; मध्यें ४ व २ बाजूंच्या भिंतींत २ अर्धस्तभ अशा ६ खांबांवर आधारलेली आहे. खांबांच्या खालच्या पाव हिश्याचा घेर षोडशकोनी घेतला असून त्याचेवर मुरलीच्या आकाराच्या खांचण्याचें खोदकाम केलें आहे. त्याचेवरील मथळा किंवा स्तंभशीर्ष फुलाच्या आकाराचे कोरलें असून, असें दाखविलें आहे कीं, त्या फुलांच्या पाकळ्या म्हणजेच खांबावर सोडलेल्या मुरलीच्या आकाराच्या खांचण्या होत. स्तंभशीर्षांचा पहिला भर ह्याप्रमाणें, पुष्पाकाराचा बाह्यकोश कोरून त्याचा मध्य म्हणजे नाभिस्थान शक्य तितकें विस्तीर्ण कल्पून ह्या बाह्यकोषाच्या पाकळ्या टोकास सर्पजीभेसारख्या दोन दोन टोकांनीं खालीं सोडल्या आहेत ! ह्या बाह्यकोषाचेवर लहानशी पट्टी दिली असून त्याचेवरील गोलची पेल्याच्या आकाराची कोरली आहे; व त्याचेवर घंटेच्या आकाराचें पुष्प बसाविलें आहे असा भास होतो. ह्या स्तंभावर एकेकाळीं रंगकाम असावें असें दिसतें. पडवीच्या प्रत्येक टोकांस उपगृहें आहेत. दर्शनी भागावरील खांबाच्यावर खोदीव कामाचे उत्कृष्ट नमुने आहेत. उजव्या भागास एक

नागराजा सेवक-गणांसह बसविला आहे; त्यातच त्याचे डावे बाजूस आपले मूल घेऊन एक स्त्री कोरली आहे; दोन्ही बाजूच्या भागामध्यें लठ्ठ पुरुषाकृति खच्चून भरल्या आहेत. डाव्या बाजूस एका मोठ्या कोनाड्यात शाक्यमुनि मांडी घालून बसले असून शिकवीत आहेत; आणि त्यांचे प्रत्येक खांद्यावर एक एक लहान आकृति आहे.

## मधला सुंदर दरवाजा

दर्शनी भागास मध्यें एक सुंदर दरवाजा व दोन बाजूस दोन खिडक्या प्रकाश आंत येण्याकरितां कोरल्या आहेत. दरवाजावर अगणित कोरीव काम, तळाशीं पांच पांच फणा असलेले नागराज आपल्या फणांवर पुष्पें धारण करून दरवाजा उचलून धरीत आहेत, दरवाजाचे प्रत्येक बाजूचे विभागांतून स्त्रीपुरुषांची निरनिराळ्या हावभावांची जोडपी बसविली आहेत. उर्ध्वभागीं बैठ्या आकृति कोरल्या असून त्या सर्वांमध्यें एक भली मोठी लठ्ठाकृति बसविलो आहे. ह्या खोदकामाच्या पलीकडे अनेक बेलबुट्यांचे नमुने व त्यांतून

## पुष्पमय जगत् जणूं काय

कोरलें आहे. मध्येंच एक अर्धस्तंभ असून एका खुजाचे अंगावर टेका देऊन वृक्षवेलींच्या पुंजाखालीं एक सौंदर्यवती स्त्री कोरली आहे. मध्य दरवाजावर आडव्या आकृतींची रांगच रांग व त्याचे मध्यभागी नुसता एक राजमुकुट कोरला आहे.

## आंतील दिवाणखाना

४७×४८ फुटांचा चौरस असून १२ स्तंभांचा त्यास आधार घेतला आहे. आंतील मंदिराच्या भागासमोर जे खांब आहेत त्यांचेवर अतिशय खोदकाम केलें आहे. दर्शनी व मागच्या रांगेंतील मधल्या दोन खांबावर

कांहीं लठ्ठ खुजे ४, ४ हाताचे कोरले असून खांबांचे चहूं बाजूचे कोपरे त्यांनी उचलून धरले आहेत. खांबांवरील कोपरे नागमोडी फुलांच्या पाकळयांनी भरलें असून खांबाच्या मथळयावर आधार म्हणून जे धार दिले आहेत त्यांचे कोरीव कामही अप्रतिम व अतर्क्य कौशल्याचें दिसत आहे. पुढें असें दाखविलें आहे की शेकडो लोक बुद्ध मंदिरांत पूजा करीत आहेत. उजव्या बाजूच्या रांगेत एक एकट्या व्यक्ति बसविल्या असून त्यांचेवर कमानी कोरल्या आहेत; आणि त्या कमानी कोणा तरी राक्षसाच्या तोंडातूनच वर निघाल्या आहेत; आणि बाकीच्यांतून प्रत्येक ठिकाणी राजा, राणी व दासी बसविल्या आहेत; मंदीराचे पूर्व भागीं एका उपगृहांत

## एटींत बसलेलें जोडपें

असून त्याचे डोक्यावरील मुगुट अतिशय मौल्यवान् आहेत) त्यांतील स्त्रीनें आपलें मूल मांडीवर घेतलें असून उजव्या हातांतील कांहीं वस्तूनें मुलाचें रंजन करीत आहेत. डाव्या बाजूस असलेल्या दासी चवऱ्या ढाळीत आहेत. मागें एक दासी कांहीं फळें व पोपट घेऊन उभी आहे.

## बोकडांची झुंज

वरील जोडप्याचे आकृतीखालीं अकरा लहान आकृति काढल्या असून त्यापैकीं कोणी बोकडांची झुंज लावून देत आहेत, कोणी कुस्त्या करीत आहेत; कोणी मुलांच्या करमणुकीकरितां पावे वाजवीत आहेत.)

## ह्या चित्राचा उद्देश,

(शाक्यमुनींचे बालपण दाखविण्याचा आहे; आई शाक्यमुनीस खेळवीत आहे, वडील शुद्धोदन जवळ बसले आहेत आणि वरच्या कोपऱ्यांत गुरुजी असित शिकवीत आहेत) कलाकुसरीचे शिरस्त्राण घातलेल्या दोन दोन लठ्ठ पुरुषाकृति गळयांत मोठमोठाले हार, दंडांत बाहुभूषणें, आणि अंड्याच्या आकाराचे कांहीं तरी फळ हातीं घेतलेलें असें कोरलें आहेत; ह्या आकृतीच्या वरच्या कोपऱ्यांतून पंख लावलेली मनोहर आकृतींची

## यक्षकिन्नरांचीं सुंदर मुलें

उडत आहेत; खालीं भाजीपाला फळफळावळीसारखें ठेवलें आहे; ह्या बाजूच्या कोठड्याच्या दर्शनी भागावर नागराजे व त्यांचें कुटुंब दासदासींसह कोरलें आहे. ह्या शेजारचेंच

## बुद्ध मंदिर

१४×११ फूट आकाराचे व ११ फूट उंचीचे असल्यामुळें येथें फार अंधार आहे. ह्यांत शाक्यमुनी, समोर चक्र व दोन हरिणें घेऊन प्रवचन करीत आहेत. हरिणाचे मागें एक स्त्री पूजा करीत आहे. उजवे बाजूस असलेला चामरधर महामोलाचीं वस्त्रेंभूषणें ल्यालेला, डोक्यावर विशाल मुगुट, सभोंवतीं प्रकाश वर्तुळें असलेला असा आहे; शाक्यमुनीचे डावें बाजूस अवलोकितेश्वर डोक्यावर जटाजूट, हातीं कमळासारखें कांहीं घेऊन बसले आहेत !

## ह्या लेण्यांतील रंगकाम

१ पुढच्या पडवीचें सर्व छत रंगकामाच्या बहुमोल चित्रविचित्र नमुन्यानीं भरलेले होते. त्यांतील थोडासाच भाग हल्ली चांगला दिसतो. रंग अतिशय प्रेक्षणीय आहेत. चित्रांचे रेषालेखन अद्याप ताजें असल्यासारखे दिसते. मध्य भागाच्या चौकांत असलेली कमानींची रचना चातुर्यपूर्ण असून डाव्या बाजूकडील कमानीवर उडत्या आकृतींत एक स्त्री व एक पुरुष दाखविले असून उजव्या कमानीवर दोन मल्ल कुस्ती खेळत आहेत. ह्या कमानीपैकीं कांहीं अर्धा भाग तांबड्या रंगांत काढला असून कांहीं भाग हिरवा व कांहीं भाग करड्या रंगाचा चित्रिला आहे. पर्णपुष्पांच्या माळा चित्रकलेच्या कौशल्याचे नमुनेच होत.

२ छताचे जे भाग शिल्लक राहिले आहेत, त्यांतील चित्राची रेखाटणी, नमुने, कल्पनाचित्रें, हुन्नर, रेषालेखन व रंगकाम अशीं अप्रतिम आहेत कीं

त्यांच्या तोडीला हा सविण्यास जगांतील इतर कोणत्या ठिकाणच्या चित्रकलेचे इतिहासावशेष मुळींच सांपडावयाचे नाहींत. हजारों वर्षेपर्यंत ह्या पडवींतील चित्रकाम व रंगकाम अत्यन्त कडक थंडी, प्रचंड पाऊस, झंजावाती वादळी वारे, कमालीची उष्णता इत्यादि सृष्टीचे हरतऱ्हेचे खेळ सहन करून इतकी वर्षे टिकून राहिलें आहे, त्यावरून ह्या रंगकामाची खरी योग्यता ध्यानांत येते. निळे रंग तर इतके ताजे आहेत कीं जणुं काय ते कालच भरलें असावेत ! सर्वभक्षक काळानें ठिकठिकाणीं नुकसान केलें असतांही पुढच्या व्हरांड्याची मागची पडवी अशाच कलाकुसरीच्या नमुन्यानें भरलेली कोणाही चित्रकलाभिज्ञ रसिकाचे चित्त वेधून घेतल्याखेरीज रहात नाहीं. आहे एवढाच भाग आश्चर्यचकित करून सोडतो.

## दरवाजाचे डावे बाजूचे टोकांस चला ( व्हराड्यांत )

वरच्या कोपऱ्यांत दोन कुणी संत व भक्त ढगांत विहार करीत आहेत. ह्या चित्रफलकांत ज्या इतर आकृति आहेत त्यांचेपेक्षां ह्या सन्त भक्तांची कातडी जरा अधिक तांबूस दिसते. त्यांनीं अगदीं साधी वस्त्रें शरीराभोंवतीं गुंडाळून डाव्या खांद्यावर टाकली आहेत. एक हिरव्या चिटासारखें व दुसरें करड्या रंगाचे अशीं वस्त्रें परिधान करून डोक्यांतील केसांची जटा त्यांनीं मागचे बाजूस बांधली आहे व कांहीं थोडे केस सभोंवतीं वाऱ्यानें झुळझुळ करीत आहेत, कोणाच्याही अंगावर कांहींही भूषणें नाहींत व पुढचे हात भिक्षा मागण्याकरितां किंवा पूजेकरितां पुढें केलें आहेत अशी संतांचीं चित्रें दिसतात.

## इजिप्शिअन स्त्री व किन्नर जोडपें

वरील देखाव्याचें जवळच दोन आकृति नष्ट झाल्यासारख्या दिसत असून त्यापैकीं एकीचा चेहरा इजिप्शिअन स्त्रीच्या धर्तीसारखा दिसतो. ती आपल्या अंगावर दागिने घालीत आहे. एक हात कानाजवळ नेला आहे आणि तिचेपुढें सेवकानें धरलेल्या आरशांत ती डोळे लावून पहात आहे.

या मनोहर चित्राचा इतकाच अवशेष दिसतो. ह्याचे उजवे बाजूस अर्धी मनुष्याची व अर्धी पक्ष्याची आकृति असें किन्नर जोडपें काढलें आहे. ह्यांतील पुरुषाचें हातीं एक निळी बांसरी असून ती तो वाजवीत आहे. आणि बायकोच्या हातीं निळया झांजा आहेत. त्याचेवर पुनः एक स्त्री-पुरुष जोडपें चितारलें असून पुरुषानें आपला एक हात बायकोचे खांद्यावर ठेऊन दुसऱ्या हातांत नीलवर्णाचें लिंगी पुष्प घेतलेलें आहे. अंगावर दागदागिने पुष्कळ आहेत; तसेंच त्याची स्त्री सुद्धां निळी चोळी घातलेली आणि हातांत एका पानाच्या पुड्यांत पुष्कळशीं फुलें तिनें घेतली आहेत. त्याचेच खालीं कशाकरितां कोण जाणें एक निळया तलवारीचा तुकडा काढून ठेविला आहे. या चित्रावरून ते चितारणाऱ्या चित्रकाराला निळा रंग अतिशय आवडत असावा, असें दिसतें.

३ ह्याचे उजवीकडे गेले म्हणजे एका मोठ्या भव्य राजपुत्राचे खांदे व चेहरा असा अर्धपुतळाच काढलेला आहे. त्याची शिरोभूषणें मात्र आश्चर्य वाटेल अशी सुंदर चित्रित केली आहेत. त्याचे मागें खडकाचा देखावा दाखविला असून त्यामधून कांहीं किरात व भिल्ल डोकी बाहेर काढून पहात आहेत; त्यांतील एकाच्या मिशा मोठ्या पहाण्यासारख्या काढल्या आहेत; हा मिशावाला वरच्याची मनधरणी करीत असून खालच्याकडे हात दाखवीत आहे.

४ ह्या चित्रकारांच्या नजरेंतून लहान लहान गोष्टी देखील निसटल्या नाहींत; खुंट्या सुद्धां चित्रांत दाखविल्या आहेत. पुढें ढगांमध्यें निळी तलवार घेतलेला एक देवदूत दाखविला असून तो आपल्या डाव्या हातानें आपल्या बायकोच्या पाठीस आधार घेऊन तिला सावरून धरीत आहे; व ती कातळाच्या एका कड्यास टेंकून उभी आहे. मागें पांढरें निळें ढग आकाशांत काढले असून त्याच्या पलीकडे एक म्हातारा; अतिशय वृद्ध असा भिक्षू हा इतका कशास जगला असें कोणासही वाटावें असा-काढला आहे. त्याचे समोर एक स्त्री चितारली आहे.

५ ह्या चित्रफलकांत लांब तलवार उजव्या हातांत व दुसऱ्या हातीं ढाल घेऊन एक देवदूत कोणा तरी माणसास आधार देत आहे असें

दाखविलें आहे. (पडवीच्या उजव्या टोकांस भिंत व खिडकी ह्यांचेमध्यें एक तुकडा चित्रित केला असून त्यांत दोन बुद्धांचे भक्त ज्यांना मेघांतून आकाशांत उडण्याचें सामर्थ्य आले आहे असें दाखविलें आहेत; (त्याचेच उजवे बाजूस

## इन्द्र व शची

हीं दाखविली असून दोन देवदूत त्यांचे सेवेंत आहेत.) हिरव्या रंगाचा पोषाख केलेला एक देवदूत चवरी ढाळीत आहे असें दृश्य दिसते; त्याचेच पुढचा देखावा म्हणजे एक राजा आपले पाय स्टुलावर ठेवून बसला आहे. दोन दासी त्याचेवर चवऱ्या ढाळीत आहेत. उजवे बाजूस कित्येक लोक पालखी नेत असून तिला मागें पुढें दोन दांडे आहेत. ह्या स्वारीच्या पुढें तीन शिपाई मोठ्या ढाली घेऊन चालले आहेत. समोरच एक साध्या वर्णाचा मनुष्य खालीं पडून पालखीला नमस्कार करीत आहे, त्याचे हातीं तलवार आहे. हा त्याचा नमस्कार पालखी समोरच्या कोणत्या तरी संत महंताला असावा. ते दोघेही, असें दिसते कीं, एका काळ्या व हिरव्या पानांनी भरलेल्या वृक्षाकडे जात आहेत. तीच पालखी उजव्या कोपऱ्यांत पुढें दाखविली असून एक बाई जणु काय झोंप घेत आहे किंवा अतिशय खोल विचार करीत आहे. आणखी एक बाई पालखीच्या बाहेर आश्चर्यानें व भीतीनें पहात आहे असें दाखविलें आहे. पालखीचे वरचे बाजूस एका देखाव्यांत एका तळयाचे कांठीं कोणी तरी एक मूल आणून टाकलें असून एक स्त्री त्याचेकडे बघत आहे. तळें कमळांनीं व हंसांनीं भरले असून ह्या देखाव्याचें खालीच पांच फणाचा सर्प मस्तकीं धरून नागराजे, एक दासी जवळ घेऊन एका आसनावर बसले आहेत. ह्या चित्राचा बाकीचा भाग नष्ट झाला आहे.

६ कोठडीच्या दरवाजांतून आंत गेल्यावर एक घोडा व हत्ती दिसतो. पुढें एक सिंहासनस्थ राजा एकटाच बसला असून त्याचेसमोर एक जण आरसा धरीत आहे. एक मोठी ढाल समोर आहे. आणि कांहीं गाई अशोकवृक्ष व फुलें आणि कांहीं भंगलेल्या कोरीव कामाच्या मूर्ति एवढेंच ह्या चित्रांत दिसते.

ह्याचें छत सर्व लेण्यांमध्यें जसेच्या तसेंच राहिले आहे. त्याचेवरील फुलें, बेलबुट्ट्या, नागराजे उडत्या आकृति जागोजाग भरल्या असून चित्र-विचित्र रंगकाम व वनस्पतीचे देखावे ह्यांनीं तें सजविलें आहे.

## कमळांचे तळें

पुढच्या ओरीच्या डाव्या टोकास एक तळें कमळांनीं सारखे आच्छादिलें असून मधून हंस व हंसी बसले आहेत. हें कदाचित बुद्धाचे कलहंस-जातक असावें. ह्यांत हा राजा आपल्या अर्धांगीसह बसला आहे; त्याची लांब व सरळ तलवार म्यानांत घातलेली लोंबत असून जवळ ढालही आहे. मागील बाजूस जागोजाग टेंकड्या, पर्वतांचे देखावे, मधून मधून शस्त्रधारी पुरुष दाखविले आहेत. तळ्याजवळ दोन पुरुष पाण्यांत उभे असून त्यापैकीं एक हाताच्या ओंजळींतून पाणी घेऊन संकल्प करून अर्घ्य देत आहेत. ह्या देखाव्याचे पुढें डाव्या बाजूस एका आसनावर हंस बसला आहे त्याचेवर एक हिरव्या रंगाची आकृति बसली असून दुसरी आकृति हात जोडलेली आहे. उजव्या बाजूचे दालनांत एक राजा पाय खालीं सोडून बसला असून त्याचे मागें एक निळें लोड ठेवलें आहे. डाव्या बाजूस एका राजपुत्राचे डोक्यावर एक मुगुट आहे; व त्या दोघांमध्यें त्याचे दोन प्रधान बसले आहेत. त्यांचेपैकीं एक जण जणुं कांहीं बोलत आहे अशा तयारींत हात वर करीत आहे. ह्या चित्रांचे कोपऱ्यांत दोन स्त्रिया बसल्या असून एकीच्या हातांत राजाची तलवार आहे. पुढच्या एका देखाव्यांत दोन स्त्रिया बसल्या असून एकीनें पदर घेतला असून आपल्या कमरेभोंवती वस्त्र परिधान केलेलें आहे. तिनें कमरपट्ट्या घातल्या असून हातावर दंडभूषणें आहेत; आणि आपल्या मांड्या मणिमाळांनीं झाकल्या आहेत. पुढच्या एका चित्रांत एक मनुष्य मांडी घालून बसला असून कमरेपुरतेंच वस्त्र परिधान करून गुडघ्यावर कोंपर टेकून उजव्या हातात कांहीं वस्तू घेऊन ती तपासत आहे असें दिसत आहे. ह्याचेच उजवे बाजूस एका स्त्रीचें चित्र संपूर्ण नग्न स्वरूपांत काढलेलें दिसतें.

७ ह्याचेच जवळ खालच्या बाजूस असलेल्या ओळींत सगळ्या स्त्रिया चित्रीत केल्या आहेत. एकीच्या हातांत कांहीं तिकोनी वाद्य असून ती तें वाजवीत आहे. पुढच्या चित्रांत एक राजा गादी-तक्क्याशीं टेकून बसला असून त्याचे डोक्यास प्रकाश-वर्तुळ दाखविलें आहे. चवरी ढाळणारा एक गौरवर्ण सेवक, एक काळ्या रंगाचा भिल्ल सेवक असें जवळ असून काळ्या रंगाचे मुगुट घातलेले एक गृहस्थ त्याचे प्रधान असावे. पुढच्या देखाव्यांत एका राजवाड्यांत एक राजा आपले डावे बाजूस राणीसह बसला आहे. त्याची सर्व राजचिन्हें स्पष्ट दाखविली आहेत. ह्या सेवकांचेपैकीं एकाचे डोक्यावर पर्शिअन कॅप आहे; मागचे बाजूस हातांत घडा घेतलेली एक स्त्री, पुढे दोन मजूर राजाशीं बोलत असलेले, खांबापलीकडे हातांत गुलाब-पुष्पांची परडी घेऊन एक मजूर पलीकडच्या एका स्त्रीशीं बोलतो व हंसतो आहे असें दाखविलें आहे. तिच्या सुंदर वस्त्रभूषणांवरून ती उच्च कुळातली असावी असें दिसते.

## (बुद्ध व त्याचे गुरु आसत

पुढच्या देखाव्यांत शुभ्र पोषाख केलेलें गुरु असित, डोक्यावर छत्री घेऊन उभे असून ती स्त्री आपले लहान मूल गुरुजींचे हातीं देत आहे. डावे बाजूस राजा असून गुरुजी व मुलाचा संवाद मोठ्या आनंदानें ऐकत आहे. हें बुद्धाचें बालशिक्षण असावे.)

## (११० बुद्ध मूर्ति ( डाव्या हाताच्या भिंतीस )

(ह्या देखाव्यांत दुसऱ्या व तिसऱ्या कोठडीच्या दरवाजामध्यें एक भिक्षुक चार बुद्धांचे समोर कमलपुष्प घेऊन उभा आहे. एकेका रांगेंत दहा दहा ह्याप्रमाणें शाक्यमुनींच्या आकृतीच्या ११ ओळी सारख्या रांगेंत काढल्या आहेत. प्रत्येक आकृति कमलपुष्पावर बसवून तांबडे वस्त्र परिधान केलेली अशी दाखविली आहे.

## आम्रवृक्षाखालीं शाक्यमुनि

एका आम्रवृक्षाखाली शाक्यमुनि बसले असून त्यांचे दोन्ही बाजूंस इन्द्र व बोधिसत्व बसले आहेत. पांढऱ्या कमलपुष्पावर त्यांचे चरण असून एक पूजार्थी खालीं बसला आहे. ह्याचेवर एकेक कमलपुष्पावर काढलेली शाक्यमुनींची ७ चित्रें असून ह्या कमलपुष्पाचें नाल खालीं पाताळांत पाण्यांत सोडलेलें असें काढलेलें आहे. ह्या खालीं एक लेख असून त्याचा अर्थ

**"हें यति बुद्धगुप्ताचें कर्तव्यनिष्ठ दान आहे**
**ह्याचें जें पुण्य असेल तें सर्व प्राणीमात्रास मिळो"**

८ बुद्धावशेष मंदिराचें अन्तर्गृह आणि त्याचें छप्पर फारच सुशोभित केलें आहे. ह्यांतील चित्रांचें रेखालेखन (Design) मोठें धीट व आकर्षक आहे. दोन पक्षी सुंदर तुरे डोक्यावर असलेले चहूंकडे कोरून रंगविले आहेत. भिंतीवर शाक्यमुनींच्या रंगविलेल्या कित्येक आकृति आहेत. त्याखालील लेख असें सांगतो कीं, हा भाग भिक्षु भदन्त धर्मदत्त ह्यानें दान दिला. ह्याचें पुण्य मातापितरांना निर्वाण प्राप्ति होण्यानें मिळो. इत्यादि.

ह्याच मंदिरास उजवे बाजूला दरवाजापाशीं बोधिसत्व राजपोषाकांत दोन सेवकांसह आहेत. डावे बाजूस अवलोकितेश्वर हातीं पाण्याचा तुंबा व खांद्यावर हरिणाचे कातडे घेऊन आलेले दिसत आहेत. भिंतीवर प्रत्येक ओळींत चार अशा तीन रांगा शाक्यमुनींच्या आकृतीनें भरल्या आहेत; ह्या भागाचें छत १२ फूट उंचीचें असून येथे इतका रंग आहे कीं, हें रंगवीत असतांना कांहीं कृत्रिम प्रकाश उपयोगांत आणला असला पाहिजे.

जवळच एका टेकडीवर इन्द्राची एक विशाल आकृति, एक शस्त्रधारी पिवळा खुजा पायाशीं असलेली, डावें बाजूस तीन आधिक सेवक आणि निरनिराळ्या कृत्यांत गुंतलेल्या कांहीं स्त्रिया असें हें चित्र आहे.

९ डाव्या बाजूचे भिंतीवर एक मंदिराचें चित्र असून त्याचे सज्जावर दोन दोन स्त्रियांच्या दोन जोड्या दोन खिडक्यांतून खालचा देखावा पहात आहेत. मध्येंच आकाशांत एक ताम्रवर्णी पुरुष ढगामध्यें पोंहत आहे आणि त्याचे शेजारीं देवदूत आहेत. ह्याच्या खालच्या इमारतींस तीन दालनें असून मधल्या दालनांत एक हुबेहुब काळ्या रंगाची उंच अशी स्त्री भिंतीस टेकून बसली असून ती डाव्या बाजूकडे एका तांबूस रंगाच्या बाईशीं बोलत आहे. तिच्या मागें एक बाई हातांतील मुलगे दुसरीपाशीं देत आहे पण ते मुलगे मात्र तिच्याकडे जात नाहींत आणि खालीं कांहीं भिक्षुक भिक्षा मागत आहेत असें काढलें आहे.

उजवे बाजूस तीच उंच बाई पुन्हां दिसत असून मधल्या दालनांतून आपला हात वर करून, डावा हात छातीवर ठेऊन कांहीं तरी सांगत आहे. तिचे पाठीमागें चार बाया आहेत. जवळच्या दोन सुंदर आहेत. तिसरीनें खांबास विळखा दिला आहे; आणि चौथी तांबूस वर्णाची पण पांढरी शुभ्र चोळी अंगांत घातलेली काढलेली आहे. ह्या चित्रांत बहुतेक स्त्रियाच चित्रित केल्या असून एक वेत्रधारी नोकर उभा आहे. डाव्या बाजूस शुभ्र हिरव्या, तांबूस व हिरव्या अशा रंगाच्या दासी दिसतात. एकीच्या हातीं फुलांची परडी असून जवळच एक भिक्षुक त्यांना कांहीं उपदेश करीत आहे. मध्यभागीं वर पाहिलें तर दोन स्त्रिया व एक मुलगा खिडकींतून खालीं बघत आहे असें दिसतें.

## छतावरील कलाकुसरीचें चित्रकाम

(ह्या कोठडीचें छत अप्रतिम कलाकुसरीनें रंगविलें असून एका मोठ्या विशाल चौकोनांत एक विशाल मध्य-वर्तुळ व ह्यांत अनेक लहान लहान मध्य-वर्तुळें करून त्यांतून वेलबुट्ट्या व नक्षीकाम रंगविलें आहे.) वर्तुलाकार पट्टीच्या वेलबुट्टीपुढें दुसरी पट्टी सोनेरी पानी वेलबुट्टांची असून त्यांच्यापुढें हंसीच्या रांगाच्या रांगा बसविल्या आहेत. या वर्तुळाचा मध्य भाग खपली उडाल्यामुळें हल्ली खराब झालेला दिसतो.

## हंसहंसीचा विहार

आणि मधल्या जागा निरनिराळया रंगाच्या फुलांनीं भरून टाकल्या आहेत. जरा बारकाईनें पहील तर असें दिसेल कीं रिकामी जागा मनोहर कुशलतेनें रंगविली असून त्यामध्यें हंसहंसीचा विहार प्रेक्षणीय दाखविला आहे. ह्यांतील प्रत्येक हंसी निरनिराळ्या प्रकारच्या हावभावांत हंसाचें रंजन करीत आहे. आणि हंसाचें चलनवलनही अत्यन्त असाधारण असल्याची खात्री पटते. एवढ्या एका पट्टीचें जरी अवलोकन केलें तरी दोन हजार वर्षांपूर्वीच्या या चित्रकाचे कौशल्य व पक्षाच्या सहज लीलांचें मार्मिक ज्ञान त्यांना किती होते तें दिसून येईल.

## मध्येंच एक गुलाब गुच्छ

रंगविला आहे ही कल्पना एका कमळावरून घेतली आहे. चौकोनांतील चार कोपरे घेऊन त्यापैकी दोन कोपऱ्यांत कित्येक वाकडी तोंडें करीत असलेली मुंडकीं ( शिरें ) बसविली आहेत. आणि हत्तींच्या सोंडा एकीपुढें एक अशा वेलबुट्टीसारख्या बसविल्या आहेत. आणि वेलबुट्यांतून वाकड्या तुताऱ्या दाखविल्या असून प्रत्येक डोक्याच्या दोन्हीं बाजूस निघालेली वेलबुट्टी दुसऱ्या टोंकाशीं चिकटवून दिलेली आहे. हें रेखालेखन खरोखरीच अभ्यास करण्यासारखें आहे.

## राक्षस व मनुष्य यांची कुस्ती

तिसऱ्या कोपऱ्यांत एक राक्षस व एक मनुष्याकृति आहे आणि जे कुस्ती करावयास लागले आहेत त्यांची कुस्ती होतां होतां ते पुढें काढलेल्या वेलबुट्टींत बेपत्ता झालेले दिसतात ! आणि चौथ्या कोपऱ्यांत एका राक्षसावर दुसऱ्या एका प्राण्यानें चढाई केली असून दोघांच्या शरीरावर वेलबुट्यांचे काढलेलें काम टोकास नेऊन पोंचविलें आहे.

ह्या चित्राकृतींच्या समोरच्या मंदीरांत दोन देखावे रंगविले आहेत. काळ्या जमिनीवर भगव्या रंगाच्या प्रमुख आकृति काढल्या आहेत. त्यांत

टेंकडयांमधून पांच स्त्रियांची आकृति आहे. डावे बाजूकडील एक स्त्री पातळ पोषाक केलेली केळीच्या झाडापुढें उभी आहे. एकीच्या हातांत एक लहान पेटी, दुसरीच्या हातांत एक डबी. ह्या स्त्रियांच्या पायाशीं ४ लहान मुलगे खेळत आहेत असा देखावा काढला आहे. एका स्त्रीच्या डोक्यावर मुगूट असून ती एका मुलास हातीं धरून नेत आहे. मुलांचे हातांत काठी आहे. आणि त्यांचे मागें दुसरा एक मुलगा चालत आहे व वरच्या मेघ-मंडळांत दोन भक्त हात जोडून उभे आहेत. उजव्या बाजूचे खोलींत वर्तुळाकार एक बसला आहे. मागें एक उंच छत्रधर उभा आहे. डावीकडून दोन स्त्रिया कमरेपर्यंत नग्न असलेल्या येत आहेत. शेवटचीच्या हातांत फुलांची परडी असून तिच्या मागें केळींचे झाड काढलेलें आहे. धनुष्यबाण घेतलेला एक मनुष्य राजाकडे येत आहे. व मागें वळून जवळच्या स्त्रीशीं बोलत आहे. आणखी कांहीं माणसें जवळपास असून एकाचे हातांत कोंबडा व दुसऱ्याचे हातांत कांहीं पक्षी आहेत. उजवे बाजूस ढगांत दोन आकृति दिसत असून तीपैकीं एकीचे हातांत कांहीं पुष्प दिलें असून दुसरी लहआकृति मागल्या भिंतीवरील कोरीव कामाकडे लक्षपूर्वक पाहात आहे असें दिसतें.

१० वरील चित्राच्या पलीकडे कोठडीचें छत वेलबुट्टीच्या रंगकामाचा आश्चर्यकारक नमुना म्हटला पाहिजे. ह्या वेलबुट्टीची टोकें पुष्पगुच्छांनीं व मध्येंच एखादा राक्षस अथवा म्हशासूर गुंफून मनोहर केलीं आहेत. बुद्धकालीन कारागीर आणि शिल्पकार परमावधीच्या विविधतेचे भोक्ते होते, आपल्या बुद्धिकौशल्यानें त्यांनीं अनेक तऱ्हा कल्पून त्या चित्रसृष्टींत उतरविल्या. अजिंठ्याच्या लेण्यांत ह्या दोन छतांवरील रंगकामाखेरीज दुसरें कांहींही नसतें, तरी तेवढ्या दोन छतावरील रंगकामामुळें हें लेणें जागतिक प्रसिद्धीला पात्र झालें असतें ह्यांत तिलप्राय शंका नाहीं. बुद्ध युगांत कलेचा एवढा परमावधीचा उत्कर्ष झाला होता हें केवढें आश्चर्य आहे!

## सुवर्णमृग ?

मागील भिंतींतील अर्धस्तंभाचे उजवे बाजूस चौकांचें उजवेकडील ओरीमध्यें एका नदीच्या कांठीं उभे असलेले अंगावर चित्रविचित्र ठिपके असलेलें

हरिण चितारलें आहे; व नदींत एक मनुष्य उभा असून त्या हरिणास तो पलीकडे नेणार आहे. ह्या देखाव्याचे वरील पुसट झालेल्या रंगकामावरून दुसरें एक हरिण येत आहे असा बोध होतो आणि बाकीच्या भिंतीवर पुढें अतिशय महत्त्वाचीं चित्रें रंगविलेलीं व दुसऱ्या व तिसऱ्या खोलीच्या दरवाजामध्यें राज्याची स्वारी रंगविलीं आहे. एका मोठ्या हत्तीवर बसून राजे बाहेर निघाले आहेत. राजछत्र डोक्यावर धरलें आहे. हातांत राजचिन्हांकित तलवार आहे. चौरी धरणारा सेवकही मागें आहे. दुसरा एक हत्ती त्यांच्या बाजूला चालला आहे. परंतु त्याचे वरील स्वार रंगाची खपली गळल्यामुळें दिसत नाहीं. त्याचे पुढें पाठीवर गांठोडें घेतलेला कोणी मनुष्य डावे बाजूस पांच घोडेस्वार, त्यांतील तीन घोडे हिरव्या रंगाचे आणि १४ शिपायांचें पायदळ, हातीं ढाली, तलवारी घेतलेलें असें चाललेलें आहे. ९ शिपायांच्या हातांतील तलवारी नेपाळी दिसतात पडघम व तुताऱ्या वाजविल्या जात आहेत.

पहिल्या व दुसऱ्या कोठडीच्या मधील भागांत चिनी पद्धतीच्या नदीचा देखावा काढला आहे. तिच्यांत पुष्कळ मासे व कासवें दाखविलीं आहेत. एक गलबत तीन डोलकाठ्या लावलेलें नदींत चालत असून मागें वल्हविणारे बसलेले आहेत आणि गलबताच्या सुकाणूजवळ दहा मातीचे घडे कशानें तरी भरलेले ठेवले आहेत. एक लांब शेंडीचा चिनी मनुष्य आंत बसला असून तो प्रार्थना करीत आहे. आणि गलबताचे मागचे बाजूस स्वच्छ निरभ्र आकाशांत चंद्राची रमणीय कोर दिसत असून नागराजे व त्यांची राणी हें गलबत पाण्यातून ओढीत ओढीत तीरावर आणीत आहेत असें दाखविलें आहे. खालच्या पाण्यांत माणसाचें डोकें पण लांब शेपूट असलेली एक व्यक्ति दाखविली असून किनाऱ्यावर बसलेल्या बुध्दाकडे हें गलबत चालविलें आहे असा देखावा आहे.

११ तिसऱ्या दरवाजाचे वर एक स्त्री सज्जावरुन उजवीकडे बघत आहे आणि डावें बाजूस घोडेस्वाराच्या देखाव्याचें वर एक राजा कोचावर बसून दोहोंबाजूच्या मनुष्यांबरोबर बोलत आहे. त्या दोघांपैकी एक राजास कांहीं समजावून सांगत आहे. खालच्या अंगणांत एक घोडा बाधून ठेवला आहे.

ह्या घोडयाविषयीं कांहीं विचार चालला असावा. ह्याच विषयीचा दुसरा देखावा पुढच्या एका ठिकाणीं काढला असून तेथें राजा गादीवर बसला असून हातांतील फुलांचा सुवास घेत आहे. त्याचे मागे चार स्त्रिया उभ्या असून त्या बहुमूल्य वस्त्रालंकारांनीं भरल्या आहेत. समोरच्या बाजूस एक मनुष्य हार घातलेला उभा आहे आणि तिसरा एक पर्शिअन कॅप व निळें जाकिट घातलेला मनुष्य आला असून तो राजाशीं बोलत आहे. पलिकडे आणखी एक चित्र असें आहे कीं, हिरव्या गवतांवर अथवा गालिच्यावर दोन पुरुष बसले असून त्यांचेसमोर एक मोठी लांब फळी आहे आणि तिच्यांत २४घरे पाडलीं असून त्या फळीच्या उजवे बाजूस एक मोठा मनुष्य बसला आहे. दुसरा कोणीतरी एक जवळ आहे. त्या ठिकाणीं कोणीतरी मोठा मनुष्य चिटाचें कापडाच्या गादीवर बसला असून उजवे बाजूस नागराजा गादिवर बसलेल्या पाहुण्यांशीं बोलत आहे. त्याचें खालीं उजवे बाजूचें दरवाजासमोर एक घोडेस्वार घोड्यावरून येत आहे. तो राजवाड्याचें दरवाजांपाशीं घोडा घेऊन आला आहे. जिन्याखाली एक पडवी असून तींत एक बाई झोंपाळयांवर बसली आहे व डावें बाजूस घोडा घेऊन आलेला--स्वार तिचेजवळ आला असून तिच्याशीं बोलत आहे. झोपाळयाचें पलीकडे नागराजे व त्यांचा प्रधान बसले आहेत. राजा आपले हात चार स्त्रियांकडे दाखवित आहेत. त्या स्त्रिया त्याच्याशीं (प्रधानाशीं) बोलत आहेत व प्रधान त्यांच्या म्हणण्यास आपली पसंती दाखवीत आहे.

१२ वरील देखाव्याचे उजवे बाजूस दोन शिष्य एका गोसाव्यामागून चालले असून त्याचेवर दोन साधू आकाशांतून उडत आहेत. एक मनुष्य त्या साधूंची पूजा करण्याकरितां हातांत तांब्या घेऊन आला आहे. त्याचे मागें फुलांच्या परड्या घेऊन दोघे उभे आहेत. व त्या घरांतील तीन स्त्रिया पुढें येऊन साधूला नमस्कार करीत आहेत.

१३ वरील दोन देखाव्यांचे शेजारी दोन स्त्रिया व ५ गवय्ये एकाचे हातीं मोठी झांज, एकाचें हातांत शंख आणि एक लांब तुतारी फुंकीत असलेला, एकाचे गळयांत एक मोठा मृदंग असून तो ते वाजवीत आहे, पांचवा मोठ्या मिशांचा काढला आहे पण तो काय करीत आहे तें समजत

नाहीं. पहिल्या दोन स्त्रियांचे समोर एक मनुष्य पांढरा निळा कमर चोळणा घालून उभा आहे.

१४ वरील गलबताच्या चित्राचे वर एक चित्रांची मालिकाच अशी लावली आहे कीं, तिच्यावरून वाड्याचे बाहेर काय चाललें आहे तें समजून यावें. नागराजे व त्याचे प्रधान यांचेमध्यें एक दरवाजा असून त्यांत दोन स्त्रिया बसल्या आहेत. एकीच्या अंगावर निळ्या चिटाचें जाकिट व हातांत ताम्हण असून दुसरी त्या ताम्हणांतील वस्तूंकडे पहात आहे. पुढें एकाचे हातांत एक लांब निळी नेपाळी तलवार असून मागून कोणीतरी मोठा व्यापारी येत आहे. त्याचे दोहोंबाजूस दोन मनुष्य व पुढें एक चाकर निळी विजार घालून हातांत कसलें तरी भरलेलें ताट आणीत आहे असा देखावा दाखविला आहे. गच्चीवरील दालनांत तिघे असामी दिसतात ते बहुतकरून गवय्ये असावेत. राजवाड्याचे उजवे बाजूस एक भिक्षु आसनावर बसलेला आहे. त्याचा शिष्य डाव्या बाजूस बसलेला आहे. ह्या गुरुसमोर जवळच सात पुरुष उभे असून दोन स्त्रिया आहेत. सर्व हात जोडून आहेत. भिक्षु प्रवचन करीत आहे व सर्व श्रोते लक्षपूर्वक ऐकत आहेत असा देखावा काढला आहे.

१५ पुढल्या ओरीचे टोकास म्हणजे उजव्या कोपऱ्याचेवर एक राजा आपल्या राजवाड्यांत बसला असून त्यानें आपली लाबच लांब तलवार सरळ धरली आहे. त्याचे डावे बाजूस एक स्त्री गुडघे टेंकून व तिची दासी पाया पडत आहे अशी दाखविली आहे. ती स्त्री मौल्यवान कमरपट्टा घातलेली आहे. दासीनें आपले डोके आपल्या हातांवर ठेऊन दुःखानें करुणा भाकली आहे. दुसरी एक स्त्री गुडघे टेकून आणि गुडघ्यावर कोंपर ठेवून दुःखानें करुणा भाकीत आहे. दुसरी एक स्त्री गुडघे टेकून राजाचे पायांवर आपले हात ठेऊन आपलें डोकें जमिनीवर ठेऊन कांहीं आग्रहाची विनंती करीत आहे. तिच्या पलीकडे एक ताम्रवर्णी स्त्री आपल्या हातानें लवून नमस्कार करीत क्षमा मागत आहे. आणि उजवे बाजूला एक मनुष्य पांढऱ्या निळ्या चिटाचें कुडतें घातलेला राजवाड्याबाहेर जात आहे. बाहेर एक पहारेकरी हातांत एक भाला व लाठी घेऊन उभा आहे. त्याच्या मागें एक बायको हिरवा

पोषाख केलेली बसली आहे, असा देखावा ज्यांत एका स्त्रीस शिक्षा देण्याचा प्रसंग उद्भवला होता त्या विषयींचा आहे.

१६ ह्या देखाव्यापुढेंच डाव्या बाजूस एका राजवाड्याचा देखावा असून त्यांत एक राजा राणी बसली आहेत. राणीची सुंदर चोळी व मौल्यवान् शिरोभूषणें प्रेक्षणीय आहेत. तिचें मागें एक ताम्रवर्णी दासी हातीं पंखा घेऊन वारा घालीत आहे. राजाचे डाव्या बाजूस पांढरी चोळी घातलेली एक दासी आंतमध्यें शिरते. राजाचे मागें डोक्याचे सर्व केस काढून गोटा केलेला गौरवर्णाचा पोपटी पोषाखाचा म्हातारा ब्राह्मण दिसतो. त्याच्या मागें पांढऱ्या निळया चिटाचें जाकिट घातलेली एक स्त्री भिंतीस टेकून उभी दिसते. समोर वरच्या चित्रांतील स्त्री व दासी दाखविली आहे.

१७ उजव्या बाजूचें टोकास मूल्यवान् पोषाक पण अर्धनग्न अशी स्त्री तीन सांखळयावर लोंबत असलेलें भांडें घेऊन उभी आहे. खालीं एक हत्ती व त्याचे पलीकडे दोन पुरुष दिसतात. कोपऱ्यांत एक व्यक्ति विश्रांति घेत असलेली दिसत आहे. पलीकडे तांबड्या व हिरव्या रंगाच्या दोन घोड्यांची डोकीं दिसत आहेत.

१८ दरवाजाचे उजवे बाजूस एक राजा कोचावर बसला आहे त्याचे पाय स्टुलावर असून तो कांहीं शिकवीत आहे. एका दासीनें मागें चौरी धरली आहे. उजवे बाजूस उंच पार्शिअन कॅप घातलेली एक फिक्कट चेहऱ्याची व्यक्ति दाखविली असून कानांत रत्न भूषणें घालून भरपोषाक करून येऊन डाव्या हातांत एक ताट धरून उभी आहे. त्याचे मागें एक पीतवर्णी स्त्री चौरी ढाळीत आहे. राजासमोर दोन पीतवर्णी पुरुष बसले असून उपरणें व धोतर एवढेंच त्यांचे पोषाख आहेत. पण डोक्यावर मुगुट व मनगटावर मोत्यांची व रत्नांची भूषणें आहेत. ते राजाशीं कांहीं बोलत आहेत. ते दोघे व राजा यांच्यामध्यें एक विद्रुप आकृतीचा दुभाषा बसला आहे व तो अर्थ समजावून सांगत आहे. पुढचे भिंतीचे मागें पर्वताचें देखाव्यांत एक पुरुषाकृति, डावें बाजूस एक स्त्री आणि उजवें बाजूस दोन नोकर घेऊन बसले आहेत.

# लेणें क्रमांक तीन

✤✤✤ लेणें ३

(क्रमांक २ च्या लेण्याचे वर हें विहार लेणें कोरलें असून त्याची पुढील पडवी २९×७ फुटांची, पुढच्या बाजूस मध्यें चार खांब व दोन बाजूच्या भिंतींत दोन अर्धस्तंभ असे कोरले आहेत. आंत दिवाणखाना करावा म्हणून एक दरवाजा कोरला आहे. एवढेंच काम करुन हें लेणें अर्धवट सोडलें !)

# लेणें क्रमांक चार

✤✤✤ लेणें ४

(विहार लेण्यांत हें सर्वांत मोठे निवासस्थान म्हणून बुध्द भिक्षूंनी कोरले. याच्या विशाल पडवीची कल्पना ८७ फूट लांब, १२ फूट रुंद व १६ फूट उंच या आकारावरुन येईल! या पडवीला आठ अष्टकोनी कोरीव स्तंभांचा आधारं घेतला आहे. दोन्ही बाजूस दोन खोल्या असून त्यांत जाण्याकरितां

३ पायऱ्या व पुढें दरवाजा अशी सोय केली आहे. दर्शनी दरवाजाच्या दोहों बाजूस कोरीव खिडक्या व जवळून बुध्दाच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. दरवाजाच्या उजवे बाजूस एक बुध्दमूर्ति ५ '—९ " उंचीची कमलासनावर उभी असलेली कोरली असून दोन्ही बाजूस वरती बैठे बुध्द ( कमलासनावर बसलेले ) व खालीं हत्ती. सिंह इत्यादिकांची चित्रें कोरलेलीं आहेत. दोन्ही दरवाज्यांची, खिडक्यांची नक्षी ( वेलबुट्टी ) प्रेक्षणीय आहे. दुःखाची गोष्ट कीं यांतील कोरीव कामाचा बराचसा भाग पडलेला अथवा पाडलेला आहे.

बुद्धमूर्तीचें हात तोडलेले आहेत. वरील छताचा भाग रंगविलेला असावा कारण अवशेष स्पष्ट दिसतात. निळा तांबडा व पांढरा रंग उठून दिसतात. प्रत्येक खिडकीच्या दोन्ही बाजूस दोन स्त्रिया, त्यांचे शेजारी एकेक सेवक अशा कोरल्या आहेत. पडवी ओलांडून आंत-जाण्यास एक दरवाजा व त्याचे दोन बाजूंच्या टोंकांस दोन लहान दरवाजे आणि या तिन्ही दरवाजामध्यें दोन खिडक्या अशी आंतमध्यें भरपूर प्रकाश येण्याचीं सोय केली आहे. दरवाज्याजवळ दोन द्वारपालिका परिचारकांसह कोरलेल्या आहेत. कोरीवकामांत बुद्धाच्या अनेक मूर्ती, मानवाकृतींच्या जोड्या, मेंढ्यासारख्या आकृति, त्या मेंढ्यावर कोणी चालले आहेत असें देखावें दिसतात.

## पद्मपाणि बुद्धाची भव्य आकृति

भगवान बुद्धाच्या निर्वाणानंतर त्याचेहीपुढें अवतार झाले. त्यांपैकीं चौथा ज्ञानी जो, तोच हा पद्मपाणि बोधिसत्व होय. यालाच अमिताभचा बोधिसत्व म्हणतात. याचे दोन्ही हात तुटले असून शिरोभागीं अमिताभ बुद्धाजी आकृति आणि तिच्या शिरोभागीं प्रकाशवर्तुळ दाखविल आहे. डाव्या हातांत घेतलेल्या कमळाचे कांहीं तुटके भाग दिसतात. आंतील दालनांमध्यें एक मोठें भव्य प्रार्थनास्थान काढलें आहे. पद्मपाणि बुद्ध व सामुदायिक प्रार्थनास्थानें अशी कोरण्याची पद्धत क्र. २६ व १७ च्या लेण्यांतही अंगिकारलेली दिसतें. वरच्या अर्धवर्तुळाकार भागांत भगवान बुद्ध आसनस्थ स्थितीत बसले आहेत.

(गाभाऱ्याचा मंडप ८७ × ८७ चौरस फूट असून त्याला २८ स्तंभ आहेत. आणि प्रत्येक स्तंभही ३।। फूट व्यासाचा धरला आहे. या सभामंडपांत शाक्य मुनींचा उभा पुतळा उपदेश करीत असून शिष्यगणांस शिकवीत आहे. एका परिचारकाच्या हातीं एक कमळ, एक चक्र, व समोर हरिण अशीं कोरलीं असून आसनाच्या प्रत्येक कोपऱ्याशीं पूजेकरी प्रार्थना करीत आहेत. पुढच्या बाजूची ओरी ९७ फूट लांबीची आहे. यावरून हजार पांचशें शिष्य एकदम बसण्याची सोय केलेलें असें हें सर्वांत मोठें विहार लेणें होय.)

या लेण्यांतील सभामंडपाच्या मध्यभागीं एक मोठा नंदी कोरलेला होता. शंकराच्या देवळांत जसे नंदी असतात, त्याप्रमाणे हा नंदी कोरलेला असावा. आमच्या माहितीप्रमाणें इ. स. १९५५ पर्यंत तरी हा नंदी शाबूत होता. परंतु अलिकडेच तो काढून टाकलेला दिसतो.

---

# लेणें क्रमांक पांच

लेणें ५

( या लेण्याचेंही काम अर्धवट असेंच टाकलें आहे. आकार ४६।। × ८।। फुटांचा धरला असून एक दर्शनी पडवी खोदून कोरण्याकरितां प्रयत्न केलेला आहे. आंत गेल्यावर दोहोंबाजूस ६।६ खोल्या कोरण्याकरितां प्रयत्न केला आहे. दरवाजावरील गणेशपट्टीचे दर्शनी भागांत ९ खण दाखविले असून मधल्या खणांत बुद्ध व त्याचे सेवक व बाकीच्यांत बसलेलीं स्त्रीपुरुष जोडपीं कोरलीं आहेत. अशोक व आम्रवृक्षांच्या झुडपांत एका मगराच्या अथवा इतर प्राण्यांच्या आकृतीवर स्त्रिया पाय देऊन उभ्या आहेत.)

---

# लेणें क्रमांक सहा

लेणें ६

हें दुमजली विहार लेणें. खालच्या मजल्याची पडवी सर्वच पडली आहे. यांचे आंत ५०–५५ फूट चौरस असा विस्तीर्ण दिवाणखाना आणि त्यासभोंवती चार ओऱ्या प्रत्येकीं ७० फूट लांबीच्या, आणि प्रत्येक ओरीच्या कोपऱ्यावर ८′ × १०′ च्या छोट्या बैठकीच्या खोल्या कोरल्या आहेत. हे १६ खांबी लेणें. प्रत्येक खांब अष्टकोनी, बिननक्षीचा १३।१३ फूट उंचीचा असा कोरला असून १३ फूटाचे वर यांच अष्टकोनी भागाचा षोडश कोनी भाग दाखविला आहे. गर्भागाराचा दरवाजा चौंहोबाजूंनीं अतिशय चित्र-विचित्र नक्षीनें कोरला असून तसाच रंगलेला होता. कांहीं ठिकाणचे रंग अद्याप स्पष्ट दिसतात. गर्भागाराच्या आंतील बाजूसभोंवतीं विशाल अशा सुमारें आठ आठ फूट उंचीच्या उभ्या आकृति कोरल्या आहेत.

शाक्यमुनींची नीळवर्ण आकृति ! आंतील गर्भागारांत कोरली असून मुनिमहाराज तीन फूट उंचीच्या आसनावर बसून उपदेश देत आहेत. समोर चक्र व हरिण आहे. सिंहासनाचे कोपरे सिंहाने आपले डोक्यावर घेतले आहेत. लेण्याच्या दरवाजांवरील कमान निरनिराळया आकृतींनी भरली आहे. दुसऱ्या मजल्यावर जाण्यांकरितां कोरलेला जिना तुटून गेला आहे. तथापि वर जातां येते. वर गेल्यावर एक मोठा सज्जा लागतो. त्याच्या भिंतीवर लहान लहान बुद्धाच्या अनेक आकृति कोरल्या असून दोन्ही बाजूस दोन छोट्या खोल्या ११ × ९ च्या आहेत. वरचा दिवाणखाना ५३′ × ५०′ चौरस ११॥′ उंचीचा असून त्यांस १२ बिन नक्षीच्या खांबांचा आधार दिला असून प्रत्येक खांबावर शाक्य मुनि कोरले आहेत.

पुढच्या सज्जांतील भिंतीवर रागावलेले हत्ती कोरले असून त्यापैकीं एकानें वाघास मारलें आहे. पलीकडे एक अंतर्गृह १६ × ८ असून त्याचे भिंतींत उंच व उभ्या अशा बुद्धाच्या मूर्तींशेजारी भक्तगण पूजा करीत आहेत. डावे बाजूस एक उभा बुद्ध त्याचे खालोखाल तीन लहान बुद्ध उभे व बसलेले, असे कोरले आहेत. बुद्धाच्या अनेक आकृतींनी हे लेणें भरून टाकलें आहे. आसनस्थ बुद्धाच्या १४ आकृति व पुढील भिंतींत ९ कोनाड्यांतून बसविलेलें ९ बुद्ध दाखविलेले असून त्या आकृतींना नागांनीं आपल्या हातांतील कमळांवर झेलून धरलें आहे. भिंतीच्या शिखरावर पुन्हां १६ बुद्धाच्या आकृति कोरल्या असून त्यांचेसमोर सिंह, हरिण, चक्र व सेवकगण कोरलेले आहेत. बाजूच्या भिंतीवर ५।५ उंच बुद्धाकृति, कांहीं सिंहासनावर बसलेल्या आकृति, बुद्ध भिक्षु सेवा करीत आहेत. प्रत्येक बाजूस देवदूत आले आहेत. असे जिकडे तिकडे बुद्धच बुद्ध असे हें बुद्धमय लेणें कोरलें आहे.

वरच्या मजल्यावर केलेलें रंगकाम बहुतेक गळून गेलेलें असून छतावर चितारलेल्या रंगकामाचे कांहीं लहान लहान तुकडे अवशिष्ट आहेत. त्यावरून मात्र चित्रकलेचा उत्कृष्ठ नमुना पहावयास मिळतो. गर्भागारांत जाण्यापूर्वी डाव्या हाताला एक भिक्षु चितारला आहे. त्याचे रंग अद्याप उठावदार दिसत असून त्यांच्या चेहऱ्यावरील भावही स्पष्ट दिसत आहेत. याशिवाय दुसरें चित्रकाम नाहीं.

**तंबोऱ्यासारखा आवाज येणारे चार दगडी खांब !** वरच्या मजल्यावरील डाव्या व उजव्या बाजूस दोन दोन असे खांब आहेत. त्या खांबांवर हातानें ठोकलें असतां त्यांतून तंबोऱ्यासारखा आवाज निघतो.

# लेणें क्रमांक सात

लेणें ७

इतर विहार लेण्यांपेक्षां हें लेणें निराळ्या धर्तीचें कोरले आहे. पुढच्या दोन द्वारमंडपाचे उधळयावर बसविलेल्या अष्टकोनीं खांबाचा आधार घेतला आहे. पुढची पडवी ६३ × १३।। फूट आकाराचीं १३।।' उंचीची घेतली आहे. मागच्या भिंतींत चार कोठड्या किंवा ध्यानगृहें कोरलीं असून जवळच्या अंतर्गृहामधून गर्भागारांत जातां येतें. येथें शाक्यमुनि महाराज

## भला मोठा मुकुट घालून

सिंहासनावर बसले आहेत! एक चक्र, दोहों बाजूस दोन सिंह व दोन हरिणें एकमेकांकडे पहात असलेलीं कोरलीं आहेत. शाक्यमुनि पद्मासनांत असून उजव्या हातानें आशिर्वाद देत असावेत व डाव्या हातांत कफनी धरली असावी असे वाटतें. दोन हात तुटले आहेत. मागचे बाजूस दोन राक्षसपिशाच्चासारख्या विचित्र आकृति पुढें डोकें काढून बघत आहेत. ! शिरोभागीं एक प्रकाश वर्तुळ व शेजारी एक छत्रधर ज्यानें डोक्यावर छत्री धरली, असा कोरला आहे. राक्षसांच्या मागील कोपऱ्यांत छबकडे शिशु दाखविलें आहेत! खुद्द सिंहासनही पाहिलें तर त्याचा देखावा अत्यंत मनोरंजक दिसतो, सभोंवतालो विविध आकृतीचे बुद्ध पांच पांच सात सात बुद्धांच्या पंक्तींच्या पंक्ती कोरून दाखविल्या आहेत. गर्भागाराच्या दोन्ही बाजूस पाणी असल्याचा देखावा व त्यांतून कमलपुष्पांचे नाल हातीं घेऊन गुडघे टेकून बसलेल्या नाग राजपुत्रांच्या दोन आकृति

आहेत. या सर्वच लेणेंभर चोहोंकडे बुद्धाकृति कोरल्या असून दरवाजाच्या दोन्ही बाजूस एका राक्षसास झुडुपांत पायानें दडपून टाकीत असलेली जणूं महिषासुरमर्दिनीच कीं काय अशा आकृत्या दाखविल्या आहेत! या सर्वांचे वरील उंच भागीं लहान लहान सुंदर पोरें कोपऱ्यांतून नाचतीं खेळतीं दाखविली असून त्यांचे खालीं ठिकठिकाणीं सप्तफणायुक्त सर्पमुकुट घातलेले बुद्ध बसले आहेत. दरवाजाच्या पायरीवर दोन्ही बाजूस पंजावर तोंड ठेऊन सिंह दाखविले आहेत.

## शंभरापेक्षां जास्त मूर्ति असलेलें हें लेणें!!

कोरणाऱ्यांच्या हस्तकौशल्याचे व योजकतेचें उदाहरणच होय.

## चित्रांचें रंगकाम


या लेण्यांचे मागचे भिंतीवर थोडें आहे व तें फारच अंधुक दिसतें. या चित्रांत बुद्ध एका सिंहासनावर बसले आहेत. एकीचा झगा व दुसरीचा घागरा नारिंगी रंगाचा तर तिसरी बहुतेक नग्न चितारली आहे, असें कांहीं देखावे छतावरही अस्पष्ट दिसतात.

# लेणें क्रमांक आठ

**ᛘᛘᛘ लेणें ८**

यांतील बहुतेक भाग पडलेला असून एक दिवाणखानाच काय तो दिसतो. त्याचा आकार ३२ × १७ फुटांचा आहे. यांत दोन कोठड्या एक अंतर्गृह व गर्भागार आहेत. एकही पुतळा किंवा चित्रकाम नाही. यामध्यें सध्यां विद्युत् उत्पादक यंत्र बसविलें आहे.

शाक्यमुनी भला मोठा मुगुट



लेणे ७, पान ४६

स्तूपदर्शन



लेणे १०, पान ५२

बुद्ध व शिष्य



खंड १०, पान ५३

मरणोन्मुख राजस्त्री



लेणें १६, पान ६०

# लेणें क्रमांक नऊ

**लेणें ९**

(हें फार जुनें चैत्य लेणें, खिस्तपूर्व १ ल्या शतकापासून दोन तीन वेळां कोरलेलें व रंगविलेलें असावें. आंतील पहिला भाग ४५ × २३ फुटांचा व २३ फूट उंचीचा कोरला असून मधल्या सभामंडपाच्या भोवतालच्या ओऱ्या स्तंभपंक्तीमुळें वेगळया केल्या आहेंत. या स्तंभपंक्ती अर्धवर्तुळाकार नयनमनोहर दिसत असून त्यांत चैत्य म्हणजे बुद्धावशेषस्थान तळांत ७ फूट व्यासाचे वर्तुळाकार उंची ५ फूट व त्याचेवर घुमट ६ फूट व्यासाचा असे निर्मिलें असून त्याचा आकार पेटीसारखा जिचे झांकण जणूं काय बाहेर काढलें आहे असे दाखविलें आहे! गाभाऱ्याच्या सभामंडपाच्या २१ अष्ठकोनी खांबांचा प्रत्येक खांब दहा फूट उंचीचा घेऊन त्याचेवरील शीर्षार्ध ६ फूट ८ इंच इतके विशाल उंचीचे घेऊन त्यावर)

## चक्राकार कमानीचें छत

कोरलें आहे! ओऱ्यांच्या दालनाला खिडक्यांनीं बाहेरचा प्रकाश घेतला आहे. बाहेरील कोरीव काम इतकें प्रेक्षणीय आहे कीं त्याचें वर्णन करणें जवळजवळ अशक्यच होय. लेण्यांतील सज्जाचे प्रत्येक टोंकास केलेलें नक्षीकाम व खोदकाम बहुतकरून ५ व्या शतकांतील असावे असा तज्ज्ञांचा अदमास आहे.)

## रंगीत चित्रकाम

या लेण्यांत फारच थोडें अवशिष्ट राहिलें आहे. कल्पना आहे की, तें निरनिराळ्या दोन अथवा तीन कालखंडांतील असावें आणि रंगकाम एकावर एक असें कांहीं ठिकाणीं चढविलेलें असल्यानें पुनः पुनः चितारकाम केलेलें दिसतें. चित्रांतील पोषाख मौल्यवान रत्नांच्या दागिन्यांनीं मढविलेले, निरनिराळ्या प्रकारचे कंठहार व कर्णभूषणें, मनगटांतील पोंच्या, दंडभूषणें, असें सर्व रंगकाम येथें आढळतें. पण तें पुष्कळसें अस्पष्ट आहे.

समोरून डावे बाजूच्या भिंतींत खालच्या भागांत गिलाव्याच्या खपल्या पार पडून गेल्या आहेत. परंतु वरच्या भागांत

## सहा विशाल बुद्धाकृति !

दाखविल्या आहेत. प्रत्येकीच्या डोकीवर ३।३ छत्र्या आहेत. बुद्धाची प्रभा त्रिभुवनांत फांकली आहे असें दाखविण्याचा उद्देश असावा. पलीकडच्या बाजूस भिंत धुरकटल्यामुळें दिसत नाहीं. परंतु कांहीं इमारती व देवळासारखें एकादें बांधकाम मध्येंच दिसतें. त्याचेखालील संबंध भिंत अनेक बुद्धाकृतींनीं रंगविली आहे.

मागील भिंतीवर एका मोठ्या देखाव्याचा एक लहानसा भागच अवशिष्ट दिसतो. एका टोंकास बुद्धदेव टेकडीवर बसले असून दोन शिष्य समोर बसलेले आहेत व तिसरा मागें उभा आहे त्यांचे उजवे बाजूला एक वाटली जमिनीवर असून कोणीतरी एका बाटलींतून भांड्यांत कांहींतरी ओतीत आहे असें दाखविलें आहे. त्याचेंच पुढें एका राजवाड्याजवळ बुद्धदेव भिक्षापात्र घेऊन उभे आहेत आणि त्यांचेपुढें जटामुगुटवाले तीन भिक्षु आधि एक लहान भिक्षुचा मुलगा उभे आहेत. एक पाण्याचा खुजा तिवईवर ठेवला आहे. एक मनुष्य शिडीवर उभा असून राजवाड्यावर चढत आहे. आणि खालच्याच्या खांद्यावरून एक घडा उचलून घेत आहे. तिसरा एक असाच घडा खांद्यावर ठेऊन उजवीकडे चढत आहे. असा एक देखावा

११४२३

चितारला आहे. पुढें उजवे बाजूस एक बोधिसत्त्व, कमरेभोंवतीं पांढरा शुभ्र चोळणा परिधान केलेला डाव्या हातांत एक बाटली घेऊन आणि डाव्या खांद्यावर एक हरिणाजिन टाकून उजवा हात वर करून आशीर्वाद देत आहे. पुढें एका मौल्यवान आसनावर शाक्यमुनि बसले आहेत. त्यांचे सिंहासनाखालीं एका चौरस जागेंत एक लेख कोरला असून त्यांतील " या धर्मा " एवढींच अक्षरें वाचतां येतात. शाक्यमुनीचे समोर एक आकृति डोकीवर जटाजूट अगांत चिटाचा अंगरखा, एका भांड्यांत पुष्कळशी फुलें घेऊन बोटांवरून एक फुलांची माळ घेतलेली अशी दाखविली आहे. दुसरा एक भिक्षु हातीं पुष्पमाला घेऊन नमस्कार करीत आहे. पुढें कोणीतरी एक विद्वान प्रसिद्ध मनुष्य बसला असून त्याच्या गृहिणीचे मोठें सुंदर चित्र त्याच्या शेजारीं काढलें आहे आणि त्याचें मांडीवर कांहींतरी गाण्याचें हत्यार ( वाद्य ) दिसत आहे. तीन छत्र्यांवर आधारलेला एक बुद्धावशेष उजवे बाजूस असून डावे बाजूस एक गरुड नाकाचा मोठा दाढीवाला साधु काढला आहे. त्याचे उजवे बाजूस कमलावर उभे असलेले आणि शिरोभागाच्या प्रकाश वर्तुळामधून डोळ्यांतील अग्नीच्या ज्वाला वर निघत असलेले आणि मोत्यांच्या हारांत गुंतवलेली एक छत्री डोक्यांवर घेतलेले असे बुद्धदेव काढलेलें आहेत ! पुढें एका बुद्धाजवळ एक अतिशय श्रीमंत अशा पोषाखांतील आकृति, एकीच्या हातीं इंद्राचें वज्र आणि दोघींनीं छत्री धरलेली अशा आहेत त्याचेखालीं डावे बाजूस एक चौरसाकृति मुगुट घातलेले राजे व त्यांची राणी आहे. राजा बुद्धाकडे पहात असून कान देऊन ऐकत आहे. त्याची राणी राजाच्या म्हणण्यांत अधिक तथ्य आहे अशा चेहऱ्यानें बुद्धाकडे पहात आहे. त्याचेवर एक किन्नर गायक आकाशमार्गें बुद्धाकडे येत आहे. राजाचे पुढें एक शिष्य हात जोडून नमस्कार करीत आहे. याखेरीज किरकोळ देखावे पुढें दाखविलें असून शाक्य मुनि, त्यांचे छत्रधर व शिष्य-गण असे आहेत-

या भागांत एक लेख होता. ह्यांतील " परमोपासक " एवढींच अक्षरें शिल्लक आहेत. एका ठिकाणी एक फूट चौरस जागेंतील

### चित्र गिलाव्यासह काढून नेलें !

इतर पुष्कळ चित्रें छिन्नभिन्न व नष्ट झालेलीं दिसतात. यांतील चैत्याच्या उजवे बाजूकडील त्रिकोणांत एक चित्राचा चांगला भाग होता. परंतु कांहीं उंच आकृति व छत्र्या याखेरीज अधिक दिसत नाहीं. पलीकडे

### बुद्धाच्या अनेक पिवळ्या आकृति !

छत्रधर सेवकांसह उभ्या व बसलेल्या अशा काढल्या आहेत.

---

# लेणें क्रमांक दहा



सर्वांत जुने ख्रिस्तपूर्व दुसऱ्या शतकांतले सुमारें हें लेणें अत्यंत प्रेक्षणीय लेण्यांपैकीं एक होय. चैत्य म्हणजें प्रार्थना व उपासनास्थान असें हें लेणें ४१ फूट रुंद व ३६ फूट उंच आणि कातळांत ९५ फूट आंत खोदीत नेलेलें इतक्या विशाल विस्ताराचें असून त्याचें अर्धचंद्राकार छत ३९ अष्टकोनी खांबावर आधारलेलें आहें. मध्य मंडपाच्या भोंवतालील ओऱ्या सहा फूट रुंदीच्या अर्धकमानी व कमानीच्या आहेत. बुद्धावशेष स्थान साधें, एका पेटीच्या आकाराचा जमिनीवरील पाया व चौकटींच्या तुकड्याचें आच्छादन घातलेला वरचा भाग असून कमानीच्या उजव्या बाजूस एक लेख खोदला आहे. त्यांत " या लेण्याचें प्रवेशद्वार व दर्शनी भाग हे वशिष्ठी पुत्राचें दान आहे" असें म्हटलें आहे. नाशिकच्या लेण्यांत ज्या पुलुमायी वशिष्ठी पुत्राचा उल्लेख आहे, तो हाच असावा असें म्हटलें तर ख्रिस्तपूर्व दुसऱ्या शतकांतील हें लेणे असावें असें म्हणतां येईल. कदाचित् हें सबंध लेणेंच वशिष्ठी पुत्राचें दान असावें.

## सर्वत्र रंगीत चित्रकाम, बुद्धाच्या हजारों मूर्ति !

सर्वत्र चितारलेल्या या लेण्यांतील कांहीं भाग प्रवाशांनीं गेल्या ५० वर्षांत खरडून नेले आहेत. कमानी, खांब, भिंती, छत अशा सर्व ठिकाणीं बुद्धाच्या मूर्ति रंगविल्या असून यांत दोन लेखही आहेत. त्यांची अक्षर पद्धति फार जुनी दिसते. दर्शनी भागाच्या जवळच एक जुनें वाक्य कोरलेलें दिसत आहे. 'भगवस यतिपुव देव पावयांत पतीसयसा' इतकेंच दिसतें. या वाक्याचें भाषांतर करतां येत नाही. या लेण्यांतील खोदकाम व कोरीव कामाची पद्धत भाजे, कार्ले, कोंडानें या ठिकाणच्या लेण्यांसारखीच दिसते.

## सहा सोंडांचा हत्ती !

हत्तींच्या कळपांचा देखावा दाखविला असून त्यांत एक मोठा शुभ्र रंगांचा सहा सोंडाचा हत्ती, ज्याच्या कातडीवर मधून मधून शुभ्र गुलाबी रंगाचे ठिपके आहेत असा दाखविला आहे. जातककथांत बुद्धांच्या कथा दिल्या असून त्यांत एका जन्मांत बुद्ध सहा सोंडाचा हत्ती होता. त्यांस मारून त्यांचे दांत काढून घेण्याकरितां एक पारधी भक्तांच्या मिषानें आपली वासना लपवून ठेवून त्याजपाशीं आला. त्याची लबाडी बुद्धानें म्हणजे सहा सोंडाच्या हत्तीच्या या राजानें ओळखली. त्यानें आपल्या सहाही सोंड काढल्या, आपले दांत उपटले, आणि ते त्या पाराध्याला दिले ! हा हत्तीच्य राजाचा देखावा मोठा प्रेक्षणीयच चितारला आहे. पुढें पूर्वेस मयूरासनावर उभारलेल्या एका इमारतीचें चित्रलेखन मनांत भरतें. डावे बाजूस एक मोठी मिरवणूक चालली असून तींत कांहीं पायदळी व कांहीं अश्वारूढ सैनिक हरतऱ्हेच्या हत्यारांनी व चित्रविचित्र पोषाखांनीं सजलेले अग्रभागीं चालत आहेत. मागें स्त्रियांचे जमाव जुटीनें चालले आहेत. या सैनिकांचे हातीं भाले, तलवारी, धनुष्यबाण व परशु अशीं व इतर हत्यारें काढलीं आहेत.

## पूजनीय बोधिद्रुमाचें चित्र !

जवळच रंगविलेलें असून त्यांत कांही लोक त्याची पूजा करीत आहेत. व त्यास वाहिलेल्या वस्तू वृक्षावर लोंबत आहेत असें दाखविलें आहे. अति

विशाल खोदकाम व कोरीव शिल्प, पाली व इतर भाषेंतील लेख तसेंच अप्रतिम प्रेक्षणीय रंगीत चित्रकाम, शातकर्णी राजांच्या वेळची पोषाकांची तऱ्हा, सांची येथील द्वारपद्धतीसारखी पद्धत प्रवेश मंडपाचें रेखालेखन मुगुटासह असलेल्या पांचसहा सुंदर चेहऱ्यांचें रेखालेखन, चित्तवेधक मिरवणुकीचा देखावा, अशा आकर्षक गोष्टींनीं हें लेणें अत्यंत मनोवेधक झालें आहे.

या चैत्य लेण्याखालीं नदीचे पात्रापर्यंत पायऱ्या होत्या असें दिसतें. आतां त्यापैकीं फक्त दोनच दिसतात. नदीचे पात्रांतील पहिल्या पायरीशीं एक जपानी मनुष्य प्रथम आला आणि त्यानें आपले बूट व टोपी तेथें काढून ठेवून तो मग वर गेला आणि त्यानें या लेण्यांत प्रार्थना केली असें म्हणतात. जपानी वाङ्मयांत कोठेंतरी या लेण्यांचा व बुद्धमंदिराचा उल्लेख असून धर्मश्रद्धेमुळें हा जपानी याप्रमाणें प्रार्थना करण्यास आला असावा असा तर्क होतो.

---

# लेणें क्रमांक अकरा

लेणें ११

याची दर्शनी पडवी चार अष्टकोनी विशाल चौरस स्तंभाची, ज्यांना तिरप्या धीरांचे मथळे दिले आहेत. अशी आहे पडवीची मोहटी स्तंभांचें पुढें बरीच लांब बाहेर काढली असून तिचें आंतील छत अतिशय परिश्रमांनीं व कल्पनातीत कौशल्यानें चित्रविचित्र रंगांचीं फुलें, ताटवे, विविध पक्षी रेखालेखनांचे असंख्य नमुने, अशानीं जणूं काय भरलें आहे. दोन हजार वर्षांपूर्वी चित्रकलेचा एवढा उत्कर्ष झालेला दिसतो कीं, आधुनिक कालांतील परिणत चित्रकलेचा गर्वहि त्यामुळे हरण व्हावा! एवढ्या एकच पडवीच्या छतांच्या रंगांचें व चित्रांचें काम चित्तकलाभिज्ञांना बराच वेळ त्या ठिकाणीं आकृष्ट करून ठेवील यांत शंकाच नाहीं. असो. मुख्यतः हें विहार लेणें

असल्यामुळें बुद्ध भिक्षूंच्या निवासाकरितां अनेक कोठड्या व दालनें या लेण्यांत काढलीं असून मधला दिवाणखाना ३७'×२८' आकाराचा व १०' उंचीचा घेतला आहे. ह्या दिवाणखान्याच्या दरवाजाजवळ दोन मोठे सिंह कोरले आहेत. बसण्याकरितां उंच उंच आसनें कोरलीं असून ठिकठिकाणी बुद्धाच्या लहान मोठ्या मूर्ति कोरल्या आहेत. एका सिंहासनावर शाक्य मुनींचा पुतळा, समोर चक्र, दोन बाजूस दोन हरणें व मागें सिंह असा दाखविला आहे. वर आकाशांत उडतें यक्षकिन्नर कोरले असून असून शाक्य मुनींचें पुढें एका भिक्षूचें सुंदर चित्र हातीं भिक्षापात्र घेऊन भक्तिभावानें गुडघे टेकून बसलेल्या आकाराचें खोदलें आहे. पडवीखेरीज आंतील कोणत्याही भागांत चित्रकाम फारसें नाहीं. पडवीच्या डाव्या टोंकास निळ्या रंगाच्या जमिनीवर, बुद्ध बसले असून डाव्या हातांत झगा व सभोंवतीं प्रकाश किरण तळपत आहेत. डोक्यावर चवऱ्या धरल्या आहेत, वरच्या भागांत गंधर्व, यक्ष, साधू हातांतून कांहीं कमळें. तऱ्हेतऱ्हेचीं पुष्पें घेउन उभे आहेत, असा देखावा दिसतो. हे लेणें आंतील सर्व भागांस रंगविलें होतें. परंतु त्याचा इतका नाश झाला कीं, कोणताही भाग स्पष्टपणें दिसत नाहीं.

---

## लेणें क्रमांक बारा

लेणें १२

या लेण्याचा दिवाणखाना ३६ फूट चौरस आकाराचा असून आंतील प्रत्येक बाजूस ४।४ कोठड्या प्रत्येकींत दगडी बिछाने कोरलेले अशा आहेत. दरवाजे व अडसर बसविण्याकरितां कातळांत खळगे व भोंकें ठेवलीं आहेत. अशा एकंदर ११ कोठड्या असून एका कोठडींत एक ३ ओळींचा कोरीव लेख आहे तो समजत नाहीं. या लेण्यांत चौकोनी चिरेबंदी काम नवे झाले असून पूर्वीचें स्वरूप बदलले आहे. चौकोनी चिऱ्याचे खांबही नवीन बसविलेले दिसतात. विशेष म्हणजे यांत एकही लहानशी सुद्धां बुद्धमूर्ती नाहीं.

## लेणें क्रमांक तेरा



हे बरेंच जुने भिक्षूंचे निवासस्थान म्हणून कोरलें असावें. क्रमांक १२, १३ या दोन्हीं लेण्यांना खांब नाहींत. लेण्यांतील कोठड्या दगडांत कोरलेल्या निजावयाच्या जागा आहेत, इ. स. चे दुसऱ्या शतकाचे अगोदर जीं लेणीं कोरलीं आहेत त्याच्यांत अशाच निजावयाच्या व निवासाच्या जागा करणें आवश्यक होतें. या लेण्यांत अशा ७ कोठड्या काढल्या आहेत. यांत एकही बुद्धमूर्ति अथवा कोरीव काम अजिबात नाही.

## लेणें क्रमांक चवदा



हें लेणें अर्धवट सोडलें आहे असा तर्क होतो. क्र. १३ च्या लेण्यावरील कातळांत हें खोदले असून याची पडवी ६३' लांब ११' रुंदीची व ९' उंचीची घेतली आहे. ६ मधले व दोन भिताडी खांब अगदीं वेगळ्या धर्तीचे या पडवींत कोरलेले दिसतात. मध्यभागीं एक सुंदर दरवाजा असून दोन बाजूस दोन दरवाजे व पलीकडे खिडक्या आहेत.

## लेणें क्रमांक पंधरा



क्रमांक १४ व्या लेण्यापलीकडे हें लेणें कोरले असून याची पुढची पडवी ३०'× ६॥' ची होती. पण ती आतां संपूर्ण ( खांबासह ) पडली आहे. या लेण्यांत चार कोठड्या आंतमध्यें दोन्ही बाजूस आहेत. अंतर्गृहांतील दिवाणखाना २४'× १०' चा असून आंतील भागांत सिंहासनस्थ शाक्यमुनीसमोर चक्र आणि सिंह कोरलेले आहेत. अंतर्गृहांत मात्र छताच्या कांहीं भागांस रंगकाम केलेले दिसतें.

# लेणें क्रमांक सोळा

लेणें १६

हें विहार लेणें खोदकाम, कोरीव काम व चित्रविचित्र रंगकाम यांनीं सुशोभित केलें असून एकंदर लेण्यांमध्यें याचा क्रमांक बराच वरती लागतो. पुढच्या पडवीचा विस्तार ६'५'×१०॥', त्याचे आधारस्तंभ ६ अष्टकोनी, आंत जाण्यास मध्यें खिडक्या असलेले ३ दरवाजे, पडवीचे आंत विस्तीर्ण लांबच लांब ७४' लांबीची ओरी आणि त्यापुढें आंतील विशाल सभामंडप ६५'×६५' चौरसाकृति, १५' उंचीचा कोरला असून, विशाल अशा २० आधारस्तंभावर वरचें छत आधारलेलें आहे. खेरीज पुढच्या पडवीचे प्रत्येक टोंकास एकेक कोठडी, दिवाणखान्याच्या दोहों भागास ६।६ कोठड्या आणि मागचे भिंतींत दोन अशी भिक्षूंची वसतिगृहें कोरून शेंकडो भिक्षुंना रहावयाकरितां हें मोठें वसतिस्थान कोरलें आहे! अर्थात दिवाणखान्यांत एक स्तूप उभारला आहेच! त्याचें दोहों बाजूस लहान लहान उपगृहेंही आहेत. खोदकामाचे व कोरीव कामाचे केवढे विशाल परिश्रम लागले असतील त्याची कल्पनाच केलेली बरी!

## शाक्यमुनि व कोरीव लेख

या लेण्याच्या विशाल आकृतीनें मन थक्क होऊन गेल्यानंतर एका मागून एक अनेक आश्चर्यें पहावयास सांपडतात. एका भल्या मोठ्या उच्चासनावर विशाल आकृतीचे शाक्यमुनि खालीं पाय सोडून बसले असून हातांचे ठेवणीवरून ते कांहीं तरी शिकवीत आहेत असें दिसतें. दर्शनी भागाच्या डाव्या टोंकास २७ ओळींचा एक लेख कोरला असून त्यांत वाकाटक नांवाच्या ब्राह्मण घराण्याची राजसत्ता चालू होती, त्यांतील विंध्यशक्ति आणि इतर ६।७ राजांची नांवें या लेखांत सांगितली आहेत.

## लेखांचे त्रोटक भाषांतर

“त्रिभुवनांतील दुःखाचें हरण व्हावें म्हणून मी प्रथमारंभीं बुद्ध देवाला नमस्कार करून (वाकाटक)--राजांच्या वंशाचे वर्णन करतो ........ (नऊ अक्षरें गेली आहेत) विंध्यशक्ति राजाचा उत्कर्ष झाला. त्याचें राज्य लांबच लांब पसरलें. त्याचे पराक्रमानें व औदार्यानें देवही कंपायमान झाले. हे सुप्रसिद्ध राजे ब्राह्मण जातीचे होते. वाकाटक घराण्यातील हा सिंह पराक्रमांत इंद्राप्रमाणें आणि दयेंत उपेंद्राप्रमाणे होता. सिंहाप्रमाणें मानी, ज्यानें पराक्रमांत सूर्यालाही मागें टाकलें, वादांत ज्याने प्रवीणता संपादन केली, शत्रूवर जय मिळवून विद्वान लोकांशींही वाद केले, त्याच्या चरणकमलाचे पाकळयांवर मांडलीक राजांच्या डोक्यावरील मुगुटांतील रत्नांची प्रभा पडत असे...... (वरील वाक्यांत मधून कांहीं कांहीं अक्षरें गळून पडली आहेत.) त्यांचा मुलगा प्रवरसेन. कमलांना फुलविणाऱ्या सूर्य किरणाप्रमाणें प्रजेला हर्ष वर्धक होई........(१४ अक्षरें तुटली) त्याचें सैन्य उत्तम शिस्तबद्ध होतें. त्याला असा मुलगा झाला कीं, ज्याने सर्वांच्या सैन्याच्या पाडाव केला. त्यानें धर्मानें पृथ्वीपालन केलें कुंतल नांवाचा त्याचा मुलगा पुढें झाला. त्यालाही प्रवरसेन नांवाचा सुपुत्र होऊन त्यानें ८ वर्षें उत्तम प्रकारें राज्य केलें. त्याला देवसेन नांवांचा मुलगा झाला. (पुढील १९ अक्षरें गेली) त्याचा मुलगा हस्तीभोज, नंतर एकच नांवाचा राजा झाला. याच एकचानें पुष्कळ पराक्रम करुन, कुंतल, अवंति, कलिंग, कोशल, त्रिकुट, लाट, आंध्र हे देश जिंकले! आणि सिंहाप्रमाणें प्रराक्रम करून कीर्ति मिळविली. (यापुढें कांहीं वाक्ये तुटक असून अर्थ लागत नाहीं. ३।४ वंशजांची यांत नांवे असावीत पुढें “मातापितरांचें हिताकरता हे गृह (गुहा) स्थापिले (सुमारें १२ अक्षरें गळलीं) रुद्धट, भुजगेंद्रानें वस्ती केलेल्या ह्या मोठ्या टेकडीत” (पहिली सोळा अक्षरें गळलीं--पुढें दहा अक्षरें गळलीं) लतागुल्मानें आच्छादिलेली ही जागा.........खिडक्या ......... वेदिका......... मनोहर स्तंभांची रचना.” यापुढील सगळ्या ओळींतील लेख लागत नाहींत.

[ लेख समाप्त

या लेण्याच्या सर्व भिंतींवर शाक्य मुनींच्या चरित्रांतील विविध कथा तत्कालीन संतांच्या दंतकथा रंगीत चित्रांत गोंवल्या आहेत चित्रकलेचे विविध प्रकारचे आश्चर्यकारक मनोवेधक नमुने रंगांच्या उत्कृष्ट मिलाफानें थक्क करुन सोडण्यासारखे छतावर, खांबांवर, भिंतीवर सर्वत्र चितारले आहेत, चौरस व वर्तुळाकार विभाग करून त्यामधून अनंत प्रकारच्या पुष्प वाटिका, वेलबुट्टया, पशुपक्षांचें वनविहार असें चित्रित केले आहेत कीं तोंडांत बोटेंच यालावींत ! चित्रकामाचे संपूर्ण वर्णन करणें अशक्य असल्यानें कांहीं प्रमुख देखाव्यांचे वर्णन या खाली करीत आहोंत. या देखाव्यांतील रंगकाम जणू काय कालच रंगविल्यासारखे जसेंच्या तसेंच पडवीच्या छतावर असून चित्रकलेचा उत्कृष्ट परिपाक यांत दिसतो !

## पडवीच्या दालनांत

१. एका कोरीव खांबाच्या धीरावर असा देखावा आहे कीं, एक भिक्षु निजले आहेत. एक वन्य पशु त्यांचें पाय चाटीत आहे. जवळच एक घोडा त्यांचें मागें उभा असून उजवे बाजूस भिक्षा मागणारे तीन भिक्षु बसले आहेत. इतक्यांत दुसरा एक वन्य पशु उजवीकडून येत आहे दुसऱ्या एका धीरावर दोन भिक्षु एक बाई आणि कांहीं इतर लोक बसलेले आहेत.

२. पडवीच्या मागील भिंतीवर चित्रकामाचा एक अवशिष्ट नमुना प्रेक्षणीय आहे. निळया झग्यांचा पोशाक करून बुद्ध उच्चासनावर बसले आहेत. त्यांच्या डाव्या बाजूला कोणी तीन राजपुत्र बसले असून त्यापैकी एकाची कातडी हिरवी आहे. दुसरे बाजुस एक मोठा मनुष्य व कांहीं स्त्रिया भेटीचे पदार्थ घेऊन आले आहेत. एका हिरव्या कोनाड्यावर छत्री धरली असून त्या कोनाड्यांत बुद्धदेव उभे आहेत. त्यांचे डावे बाजूस राजमुकुट घातलेले चौघे राजपुत्र व त्यांचे मागें तसेच १८ राजपुत्र चितारले आहेत. सर्व राजपुत्रांनीं रत्नखचित पोशाक केले असून त्यांचे पैकीं एक सर्वांत सुस्वरुप य सशक्त दिसतो. बुद्धाचे उजवे बाजूस नारिंगी रंगाची कातडी असलेले जटाजूट धारण केलेले ६ सेवक दिसतात त्याचे मागें एक हिरव्या कातडीचा पुरुष उभा दिसतो: मागचें बाजूस हातीं सर्प घेतलेली गरुडासारखी एक मूर्ति काढली असून या सर्व देखाव्याचे मागें

## अभ्राच्छादित आकाशाचा मनोहर देखावा

काढला आहे. आणि त्यामध्यें बुद्ध महाराज बसले आहेत. हिरव्या कातडीचे व नारिंगी कातडीचे लोक कोणत्या जातीचे किंवा वंशाचे असावेत याचा उलगडा होत नाही.

३. पुढच्या ओरीचे डावे बाजूस एक विचित्र देखावा आढळतो. एक स्त्री व एक पुरुष एका लहान मुलाचे हातपाय दाबुन धरून उभे आहेत. आणि तिसरा एक जण तरवारीने त्या मुलाचें दोन तुकडे करण्याच्या बेतात आहे! वर दोन टेकड्यांच्या रांगांनधुन एक नदी वहात आहे. उजव्या बाजूस कांहीं माणसे एक खटारा ओढीत आहेत, टेकडीवर पर्शीयन टोपी घातलेला एक मनुष्य बसला असून शोक करित आहे. दुसरा एक हिरव्या कातडीचा मनुष्य एकांस टेकडीवर चढवीत आहे तर जरा आणखी वर टेकडीच्या कातळावर बसलेल्या तांबुस रंगाच्या माणसास पर्शियन टोपीवाला मनुष्य नमस्कार करीत आहे. आणखी कांहीं देखाव्यांचे मागे एक तरवार घेतलेला मनुष्य व एका रानाचा देखावा असुन त्यांत केळीचीं झाडें चितारली आहेत.

## मरणोन्मुख राजस्त्री !!

४ अद्ययावत् चित्रकलेच्या इतिहासांत ज्या चित्राला तोड सापडणार नाहीं असे अत्यंत अप्रतिम चित्र या ठिकाणी काढलें आहे. या चित्रांत जें अप्रतिम भावनालेखनाचें कौशल्य चित्रकारानें ओतिलें आहे ते केवळ अवर्णनीय आहे. या चित्रांत एक राजस्त्री आपल्या पतीच्या विरहाने खंगून मरणोन्मुख झाली आहे. तिचा पति राज्य सोडून बुद्ध भिक्षु झाला. आता ती थोड्याच घटकेची सोबतिण राहिली आहे अशा अवस्थेत हे चित्र काढलें असून तिच्या थोरल्या मुलीने तिला सावरून धरली आहे, धाकटी मुलगी दुःखित चेहऱ्यानें तिच्याकडे पहाते आहे. मरणसमयीं आपल्या पतीचे दर्शन होत नाहीं, निदान त्याच्या राजमुकुटाचे तरी दर्शन घ्यावें म्हणून तिच्या इच्छेप्रमाणें मुकुट दाखविण्यांस आणला आहे. पण आतां

तर त्याकडे पहाण्याचेहीं सामर्थ्य तिला उरलें नाहीं. कोणी दासी पंख्यानें वारा घालीत आहे. आणि गच्चीवर वैद्यबुवा कांहीं औषधाचा घडा घेऊन जात असून कांहीं उपाय आहे कां म्हणून एकानें विचारतांच तो आपल्या हातांच्या बोटांनीं दोन घटकांची सोबतीण आहे असें सांगत आहे, इत्यादि अनेक भावना निराळया जवळच्या सेवकांकडून व राजस्त्रीच्या मुलीच्या चेहऱ्यावरून अशा उमटविल्या आहेत कीं, या चितान्यांच्या कौशल्याचें वर्णन करावें तितकें थोडेंच होईल. या चित्राची प्रशंसा अनेक परदेशस्थ चित्रकलाभिज्ञांनीं केली असून स्वदेशीयांना तर हे चित्र आपल्या प्राचीन चित्रकलेचा अभिमानास्पद नमुना म्हणून दाखवितां येईल.

## राजवाडा व बुद्ध भिक्षु

५. एका मोठ्या राजवाड्यामध्यें पांढरा शुभ्र झगा परिधान करून हातीं भिक्षा पात्र घेऊन भिक्षु बसले आहेत. तसेंच त्यांचे चित्र डावेकडील दरवाजाजवळ दाखविले आहे. तेथें एक राजा गुडघे टेकून त्यांचें पायीं पडत आहे. उजवीकडे पर्शियन टोपी घातलेली एक व्यक्ति घोड्यावर बसून घोड्यासह आंत येत आहे. तशाच आणखी कांहीं व्यक्ती आंत शिरत असून घोडा खिंकाळत आहे व चिटाचा मांडचोळणा घातलेला एक नोकर त्याला आंत आणीत आहे. पर्शियन टोप्या घातलेल्या कांहीं व्यक्ति बाहेर दिसत असून एक घोड्याला धरून उभीं आहे. पर्शियन टोपीवाला मनुष्य आंत येतांना त्याला वाकडी तरवार घेतलेला एक मनुष्य रस्ता दाखवीत आहे. या देखाव्यापुढें एक तीन दालनी विहाराचा देखावा असून मधल्यांत बुद्ध बसले असून बाजूच्या दोन दालनांतून अनेक स्त्रिया बसल्या आहेत. हीं दालनें राजघराण्यांचें अंतःपुर असावें. पलिकडे कांहीं भिक्षु एकमेकांत बोलत असून एक आ वासून आश्चर्यचाकित मुद्रेनें ऐकत आहे. दुसरा एक रडत बसला आहे एक भिक्षा मागत उभा आहे. त्याच्चें मागे डोक्यास टक्कल पडलेला एक भिक्षु दुःख करीत आहे. भिंतीच्या एका कोनाड्यांत दोन पाण्याच्या सुरया ठेवल्या आहेत असे चित्रलेखन दिसते.

## तिसऱ्या कोठडीच्या दरवाजावर

६. तीन तीन छत्र्यांखालीं चार बुद्धांची रांग तसेंच त्या रांगेवर दुसरी सात बुद्धांची रांग चित्रित केली असून तीन छत्र्यांखालीं—

## एक संस्कृत लेख

कोरलेला आहे चवथ्या कोठडीच्या दरवाज्यापलिकडे सिंहासनावर बसलेला बुद्ध काढला आहे. या सिंहाचीं ठेवण व आंगलट असिरीयातील बैलांच्या आंगलटीसारखी आहे आणि बुद्धानें आपले पाय नागराजानें हातीं घेतलेल्या कमळावर ठेवले आहेत.

## राजपुत्रांची सैनिकी मिरवणुक

आंतील उपगृह व कोठडीचा दरवाजा यांचेमध्यें एक विशाल देखावा सैनिकी मिरवणुकीचा दिसतो. पांच हत्ती त्याचेवर स्वार झालेले निराळे राजे लवाजमे वस्त्र भूषणें घातलेल्या नोकरांसह वाद्यें व तुताऱ्या वाजत असलेल्या मिरवणुकींसह येत आहेत. लांब निळया वाकड्या तलवारी घेतलेले कित्येक सैनिक या मिरवणुकींत असून एका अश्वारूढ राजपुत्राचे डोक्यावर छत्री धरली आहे. सैनिकी संचलन जवळच चालू असून सैनिकांच्या हातांत धनुष्यबाण भाले, ढाली तलवारी दिसत आहेत. आणि उजवे बाजूस हातीं पंखे व भांडी घेतलेल्या स्त्रियांचाही घोळका चालला आहे.

## सभेपुढें प्रवचन

७. सिंहासनस्थ बुद्ध एका मोठया सभेपुढें प्रवचन देत असून प्रत्यक्ष स्वर्गातील देव बुद्धाचें प्रवचन ऐकावयास बसलें आहेत. तिसऱ्या व चवथ्या दरवाजांच्या मध्यें शाक्य मुनी बालवयांत असतांना त्यांचा शिक्षक (असित) त्यास शिकवित आहे. शाक्य मुनीचें हाती एक लाकडी फळा पाटीसारखा असून शाक्य मुनी भोवती आणखी तीन मुलगे असेच बसले आहेत. त्याच दालनांत पोपट मैनेचा पिंजरा टांगला असून एका खुंटीस एक तंतुवाद्य अडकाविलें आहे. डावे बाजुस गुरु असित यांनीं शाक्य मुनीस आपले हातांत धरलें असून त्यांचा दुसरा एक शिष्य पुढें उभा आहे.

## बुद्धाचें नेम मारणें

शेवटच्या दरवाजाखाली शाक्य मुनीं म्हणजे राजपुत्र बुद्ध जेव्हां पंधरा वर्षे वयाचा होता तेव्हां तो शाक्य कुळातील कित्येक तरुणांबरोबर धनुष्यबाण व इतर शस्त्रांचें शिक्षण घेत असे; व त्यांत तो पटाईत झाला होता. धनुष्यबाणाचें अचुक नेम मारण्यांचे शिक्षण त्यानें हस्तगत केले होते. एकदां त्याने मारलेले बाण लक्षवेध करुन आग्नेय दिशेकडे जाऊन जमिनीत रुतले. ज्या ठिकाणी रुतले त्या ठिकाणीं पाण्याचा झरा उत्पन्न झाला!

## बुद्धाचा गृहत्याग

वैराग्य पक्कें बाणल्यानंतर त्या विरक्तीच्या भरांत आपल्या नुक-त्याच प्रसूत झालेल्या स्त्रीस व लहानग्या मुलांस शेवटचें पाहुन बुद्धानें राजवाडा सोडला. त्या त्याच्या स्त्रीच्या निजावयाच्या खोलीचा देखावा शेवटी चित्रित्र केला आहे.

---

# लेणें क्रमांक सतरा

लेणें १७

ह्या लेण्याला राशिचक्र लेणें असें म्हणतात. त्यांतील प्रमुख प्रेक्षणीय स्थळें पुढीलप्रमाणें आहेत. हें सर्व लेणें लाइटचे सहाय्यानें पहावें.

## पडवींतील वर्तुळाकार रंगकाम

प्रथमत; पडवीच्या डावें बाजूस असलेलें एक वर्तुळाकार राशि-चक्रासारखे रंगकाम दिसतें त्यांत अखिल जगताचें चित्रच काढल्यासारखें दिसत आहे. त्यांत आठ विभाग असून ह्या विभागांतून मनुष्य प्राणी इतक्या विविध उद्योगांत गुंतलेलें दाखविले आहेत कीं, मानवी जीवनाच्या

विविध अंगोपांगांचे प्रदर्शनच खास म्हटलें तर, किंवा ज्या ज्या नीति-चक्रावर बसून मानवी प्राणी गरगर फिरत आहे, त्याचेच चित्र म्हटलें तर अतिशयोक्ति होणार नाहीं. ह्या विभागापैकीं एकांत मनुष्यप्राणी एकटाच, दुसऱ्यांत माणसाबरोबर पशू, तिसऱ्यांत भांडी, ताटें, हत्यारें आहेत आणि इतर भागांतून इमारती, रस्ते इत्यादि दाखविलें आहेत. ह्या चक्राच्या वरच्या काठाचे सोळा विभाग पाडले असून हें चक्र मनगटावर पोंच्या व दंडभूषणें ह्यांनीं सजविलेल्या दोन लांब अशा हिरव्या रंगाच्या हातांनीं उचलून धरलें आहे. या चक्राचा जवळ जवळ $\frac{3}{4}$ भाग उडून गेला असून वरचा डावा कोपरा व किनारीपैकीं वरील अर्धवर्तुळाकार किनार शाबूत आहे. या भागास कोणी " संसारचक्र " असेही म्हणतात.

## पाण्याचा हौद

या चक्राचे बाहेर डावे बाजूस एक पाण्याचा हौद असून त्याचेवर एक लेख आहे. तो अस्पष्ट झाला आहे, दोहोंच्या मध्यें एक तीन दालनी नक्षीकाम होते. त्यांत एका शोभिवंत कमानीखाली शाक्यमुनी बसले असून वर देवदूत, समोर धर्मचक्र, हरिण व सिंह, दोन्ही बाजूस कमळावर एक एक बुद्धमूर्ति, खाली भक्तगण उभे, असा देखावा होता. तो आतां नष्ट झाला आहे. उजवे बाजूस बैठ्या बुद्धाकृतीच्या कित्येक रांगा कोरल्या असून या लेण्याच्या दर्शनी भागांतून एका जिन्यानें खाली उतरतां येतें. आणि असें दिसतें कीं, खाली नदीच्या प्रवाहापर्यंत जाण्यास पायऱ्या होत्या.

पुढच्या पडवीला सहा अष्टकोनी खांब होते. त्यांचा फक्त बुंधा अष्टकोनी शिल्लक आहे. वरील सर्व भाग नवीन दगडी चौकोनी बांधला आहे. मध्यभागाचा विशाल दरवाजा आणि त्याच्या दोन बाजूला दोन दरवाजांवर चित्रांत रंगविलेल्या बुद्धांची एक रांगच रांग बसविली आहे. आकाशगामिनी अप्सरा गंधर्व मधल्या विशाल दरवाजाचें दोन बाजूस असलेल्या दोन बाजूचे दरवाजावरील ढगानें व्याप्त अशा आकाशांतून एक गंधर्वराजा आपल्या अप्सरांसह आकाशांतून उडत आहे. दोघी अप्सरा त्याचें डाव्या बाजूनें चालल्या आहेत. स्वतः गंधर्वराज गात आहेत व एक

## आकाशगामी अप्सरा व गंधर्व



लेणं १७, पान ६५

मुख्य दरवाजावरील बुद्धपंचक




लेणे १७, पान ६४

बुद्ध व जोगी



लेणें १७, पान ७८

दर्शनी कमान



लेख १९, पान ८६

## आकाशगामिनी अप्सरा व गंधर्व

अप्सरा मुरली वाजवीत चालली आहे. एक खांद्यावर कांहींतरी तबल्यासारखे वाद्य टाकून उड्डाण करीत आहे. आणि उजव्या बाजूस एकजण आपल्या हातानें कांहीं एक तंतुवाद्य वाजवीत सुराची साथ करीत असावा असें दिसते. या एकंदर देखाव्यांत आकाशांतील ढगांच्या निळया रंगानें अप्रतिम शोभा आणली आहे. तीन दरवाजांखेरीज आणखी दोन खिडक्या उजेडाकरितां कोरल्या आहेत. दिवाणखान्याचा आकार ६४ × ६५ फुटाचा असून १३ फूट उंचीचा आहे. ह्या दिवाणखान्याचें छत २० अष्टकोनीं खांबावर आधारून ठेवलें आहे. खांबांचा कांहीं भाग षोडश कोनीं असून आंतील बुद्धमंदिर १८ × २० फुटांचे आहे. त्यांतून बुद्धमूर्ति समोर २ आकृति उभ्या कोरल्या असून एक भंगलेली व दुसरीचे हातांत भिक्षापात्र असलेली अशी आहे पडवीच्या दोन कोठड्यांखेरीज आणखी १६ कोठड्या आहेत. बाजूंस एक भोंक असून त्यांतून हौदातलें पाणी काढण्याचा मार्ग ठेविला आहे. आणि पडवी बाहेरील डाव्या बाजूस एक लेख असून त्यांत खानदेशांतील अश्मक राजे धृतराष्ट्र, त्याचा मुलगा हरिसाम्ब, त्याचा पुत्र क्षितिपाल सौरसाम्ब तसेंच उपेंद्रगुप्त व त्याचा मुलगा स्कच या सर्वांची नांवें दिली आहेत. कल्पना आहे कीं, हें सहाव्या शतकांतले स्थानिक राजे असावेत.

त्याच भिंतीवर डावें बाजूस एक मनुष्य दोन बैल नेत आहे आणि एक स्त्री आपल्या डोक्यावरील फळीवर कांहीं पदार्थ घेऊन चालली आहे. दोन तांबुस कातडीचें पुरुष जवळच असून एकाचे खांद्यावर त्यानें सोटा घेतला आहे. एक भिक्षा मागत असलेला गोसावी पाण्याचें भांडे जवळ घेऊन, पायाशीं प्रेत असलेला, एका गुहेशीं बसलेला आहे. ह्याखालीं 'मणिभद्र' असे नांव बैठकीखालीं लिहिले आहे व कोणी एक पोपटी कातडीचा राजा व त्याचे सेवक चितारलें आहेत. उजवें बाजूस एक भिक्षु पाण्याचें भांडे एका घडवंचीवर ठेऊन जमलेल्या लोकांशीं बोलत आहे. वरच्या भिंतीजवळ

## एक नारिंगी रंगाचा सर्प !

एका मोठ्या प्रशस्त आवारासच विळखा देऊन बसला आहे. आणि त्या आवारांत मोठमोठ्या इमारती, झाडे, कित्येक लोक चहुंकडे आढळतात.

## अवलोकितेश्वराचा शांतिपाठ !

मागील चित्राखालीं अवलोकितेश्वरांनी एक हात उताणा पुढें धरला असून डाव्या हातांत बदामी आकाराची एक बाटली घेतली आहे. त्यांचे दोहोंबाजूस दीर्घ वर्तुळाकार चित्रविभाग रंगविले असून चित्रें साधारण स्पष्ट दिसतात. वरच्या चित्रांत अग्नि पेटविला असून त्यांतून एक आकृति उत्पन्न होऊन पळत पळत अवलोकितेश्वराकडे जात आहे. त्याचे पुढें धरणी, काली अथवा मृत्यु आपले बळी घ्यावयाकरितां धावत आहेत ! त्याचेवर एका मोठ्या नागाचें चित्र असून कोणीतरी त्याचेपासून आपली सुटका करून घेत आहे अशी आकृति दिसते. कांहीं अंतरापलीकडे एक सिंह व एक मदोन्मत्त हत्ती चितारलेला दिसतो.

पडवीच्या अगदीं डाव्या टोकास मागील भिंतीवरील चित्रें प्रेक्षणीय आहेत. एक तरुण राजा आपले राणीस उजवें बाजूस घेऊन बसला आहे. एक स्त्री पांढरे, निळें जाकिट व मौल्यवान् मोत्यांचा हार घालून बसली आहे. एका स्त्रीचें हातांत एक ताट आहे. एक ताम्रवर्णी मनुष्य कांहीं गोष्ट सांगत आहे. राजपुत्रासमोर हातांत काठी घेतलेला हिरव्या रंगाचा मनुष्य दिसतो. दारीं ७ भिक्षुक आलेले आहेत. एकाचे हातांत काठी आहे आणि तो म्हातारा आहे. ह्या चित्राचे वर, बाहेरच्या पडवींत डाव्या बाजूच्या वरच्या कोपऱ्यांत एका आसनावर पांच पुरुष बसलें असून त्यापैकी एक ( ताम्रवर्णाचा ) घरमालक असावा. बाकीचे भिक्षुक आहेत. प्रत्येका समोर एक एक ताट व चार चार वाटया ठेवलेल्या आहेत. एका लहान वाटींत फुलें ठेविलीं आहेत. डाव्या बाजूस एकावर एक परड्या ठेवल्या असून त्यांत फुलें आहेत. दोन स्त्रिया ताम्हणांतून फुलें घेऊन तीं अर्पण करीत आहेत.

दोन नोकर सदरहूं भिक्षुकांस वाढीत आहेत. डाव्या बाजूच्या दोन भिक्षूं पैकीं एक जण एक डोळ्याचा आहे. तिसरा ताम्रवर्णाचा परंतु एकडोळ्या भिकारी, दोन भिकारणी, एकीच्या कमरेवर मूल आहे, असे सर्व भिक्षा मागत आहेत. उजवें बाजूस दोन घोडेस्वार असून एकाचा घोडा फिक्कट गुलाबी रंगाचा आहे. दुसरा घोडेस्वार घोड्यावर चढत आहे.

## एक उत्कृष्ठ देखावा !

खिडकीचेवर एका राजवाड्यांत तपकिरी रंगाचा राजा बसला आहे व आपल्या राणीला सरबत प्यावयांस देंत आहे. एक इराणी नोकर ज्याचा पोषाख हिरवा दिसतो, हातांत मद्यानें भरलेली सुरई घेऊन आंत येत आहे आणि एक खुजा जवळच एक पीकदाणी धरून उभा आहे. राजाचें शेजारीं सुद्धां दुसरी एक पीकदाणी चितारली असून एक नोकर हातांतील ताटांत कांही खाद्यपदार्थ ठेवून पुढें आणीत आहे. हा देखावा ह्यांतील भाव विशेष आणि सभोंवतालील देखावे नयनमनोहर व चित्ताकर्षक आहेत.

ह्या राजवाड्याच्या दोहोंबाजूस ताडाची झाडें असून राजवाड्यांतून एक उच्चवर्णीय कुलीन स्त्री बाहेर जात आहे असें दिसते. एक दासी तिचे डोक्यावर छत्री धरीत आहे व दुसरी ताम्रवर्णी दासी तिचें हात धरून चालली आहे. तिचा नखशिखांत पोषाख पांढऱ्या निळ्या रंगाचा स्पष्ट दिसत असून त्यांचेमागे एक धनुष्य घेतलेला रक्षक हातांत कांहीं बोजड गाठोडें घेऊन चालत आहे. ह्या बाईचे मागे फुलें घेऊन चाललेल्या कांहीं स्त्रिया :व त्यांचे मागें वरील देखाव्यांतील तरुण राजा डोक्यावर एका सेवकानें छत्री धरलेली आहे असा, चालत आहे. पुढें एक केळीचें झाड चितारलेलें दिसतें.

## अनेक मिश्र देखावे

खिडकीचे उजवे बाजूस एका पर्वताचा देखावा आहे. त्यापुढें एका राजाचें भव्य चित्र खरडले गेले असले तरी त्याचा फारच सुंदर व मौल्य-

वान शिरटोप दिसतो. एक अशोक वृक्ष, एक चित्रविचित्र बदक, ज्याची चोंच निळी, छातीचा भाग निळा, शेपटी हिरवी आणि पंख पांढरे शुभ्र असा काढला असून, पुढें एक झुळ झुळ वाहणारा झरा दाखविला आहे. पुढेंच पहावें तर एका अशोक वृक्षाची फुलें नुकतीच फुलत असून एक वानर उड्या मारीत येत आहे. पुढें एक किन्नर युगुल

## माणसाचें धड पण पक्ष्याचें पाय व शेपट्या !

असें काढलें असून एकाच्या हातीं झांजा व दुसऱ्याचें हातांत कांहीं निराळेंच वाद्य असें तें वाजवीत आहेत. डावे बाजूच्या नीलवर्ण मेघामध्यें एक यक्ष पुत्र डोक्यावर टोपली घेऊन धांवतो आहे. पुढें तीन अप्सरा कोणाच्या हातीं झांज, कोणाच्या हातीं बांसरी, एकीचें हातांत वीणा तर दुसरीचे हातांत तलवार आणि सर्वांचे शिरोभागीं मुगुट अशा चालविल्या आहेत ! !

## डोंगरी भिल्लांची जोडी !

त्याचेच पुढें चितारली असून, अगदी टोकांत एका कातळावर दोन गुह्यक बसले असून एकमेकांशी थट्टा करीत आहेत असा भाव उठावदारपणें चितारला आहे.

## आठ बुद्ध चित्रें !

दरवाजाचें कडेवर आठ बुद्ध एका रांगेंत बसविले असून सातव्या शाक्यमुनींचे डोक्यावर पिंपळवृक्ष चितारला आहे. आठव्याचे डोक्यावर एक भला मोठा मुगुट काढला आहे, दरवाजाच्या गणेशपट्टीवर आठ विभाग केले असून प्रत्येक विभागांत

## दारु पिणारीं स्त्री-पुरुष जोडपीं ! !

बसलीं असून तीं एकमेकांस दारु पिण्याचा आग्रह करीत आहेत. ह्यांतील स्त्रिया पुरुषांपेक्षां अधिक तांबूस वर्णाच्या दिसतात; ह्याच

दरवाजाच्या उत्तर बाजूस कांहीं यक्ष पुत्र व त्यांचे खाली एक भिक्षुक भिक्षा मागत आहेत. पलीकडे पर्वताचा देखावा तसेंच एक देवदूत व दोन यक्षपुत्र आणि त्याचे खालीं दोन किन्नर, तसेच दोन निळीं बदकें आणि ह्या देखाव्याचें खाली एक भिल्ल व एक धनुर्धारी, तसेंच आणखी कांहीं व्यक्तींचीं डोकीं दिसतात.

## बिंबीसार राजाची गोष्ट

उजवीकडच्या दोन खिडक्यांवर मगधाचा राजा बिंबीसार हा आपल्या राजवाड्यांत लोडाशीं टेकून बसला आहे. त्याच्या उजव्या बाजूस त्याच्या राण्या व दासी उपस्थित आहेत. डावें बाजूस त्याचा दिवाण किंवा कोणी भिकारी असावा आणि खाली जमिनीवर तीन स्त्रिया एक मनुष्य, उजवे बाजूला दरवाजा व द्वारपाल असा दरबारचा देखावा दाखविला आहे. घोड्यांचा तबेला जवळच चित्रित केला असून त्यांत तीन घोडे व एक हत्ती तबेल्याबाहेर बघत आहेत असें दाखविलें आहे. खिडक्यांच्या वरील आच्छादना खालून कांहीं स्त्रिया आपली डोकीं बाहेर काढून बघत आहेत असे दाखविले आहे. खालील रस्त्याकडून दोन घोडे राजवाड्याकडे जात आहेत आणि त्या दोघांमध्यें एक धूसर रंगाचा हत्ती राजवाड्यांतून ..न एका भिक्षेकऱ्याला आपल्या सोंडेनें धरीत आहे. पुढें

## शाक्यमुनीच्या पायां पडत असलेला हत्ती !!

चित्रित केला आहे. शाक्यमुनीजवळ त्याचा शिष्य आनंद असून दोघांचे हातीं भिक्षापात्र आहे. कित्येक पुरुष ह्या देखाव्याकडे टक लावून पहात असून शाक्यमुनीच्या मागे असलेले दोघे जण हत्तीच्या भयानें दूर पळत आहेत.

बुद्धचरित्रांतील ज्या घटनेंस उद्देशून हें चित्र काढले आहे ती मोठी मनोरंजक आहे. शाक्यमुनींना वैराग्य प्राप्त झाल्यावर त्यांनीं घर सोडलें व उपदेश घेण्याकरितां ते पुष्कळ साधूंकडे गेले. त्यांचें समाधान कोणत्याहि साधूच्या उपदेशानें झालें नाहीं. त्यावेळीं मगधाचा राजा बिंबिसार

ह्या असून राजगृह ही त्याची राजधानी होती. राजधानी जवळच्या एका टेकडीवर बुद्धानें आपल्या तपःश्चर्येचा एक आश्रम बांधला व त्यांत तो राहूं लागला. ह्या राजधानीच्या सभोंवती पांच टेकड्या होत्या. त्यापैकीं बुद्ध राहिलेल्या टेकडीचें नांव पांडव टेकडी असें होतें.

बुद्ध व त्यांचा शिष्य आनंदा शहरांत भिक्षा मागून तेथे रहात. बुद्धासारखा सुंदर तरुण गोसाव्याच्या वेषांत निरिच्छपणें रहातो ह्याबद्दल राजा बिंबिसारला फार कौतुक वाटलें. पुढे बिंबिसारालाही, बुद्धाचा उपदेश घेऊन त्याला आपला गुरु करावा असे वाटले.

राजगृह ह्या राजधानीभोंवती ज्या टेकड्या होत्या त्या टेकड्यांची नांवें पूर्वीची वेगवेगळी असत. अलिकडची नांवें वैभ्रगिरि, विपुलगिरि, रत्नागिरि उदयगिरि आणि सोनगिरि अशी आहेत. राजा बिंबिसारकडे बुद्ध भिक्षा मागण्यास आला असतांना जो प्रसंग घडला, तो वरील देखाव्यांत चित्रित केला आहे. ह्याच देखाव्यांत एक मत्त झालेला, ज्याला पाहून लोक भयानें पळत आहेत असा हत्ती बुद्धदर्शन झाल्याबरोबर शांत होऊन बुद्धाचे पायां पडला. ही बुद्ध चरित्रांतील घटना चितारली आहे. भगवान् बुद्धाचा चुलत भाऊ देवदत्त यानें बुद्धास मारण्याकरितां त्याचे अंगावर मदोन्मत्त हत्ती सोडला. परंतु बुद्धाच्या समीप आल्यानंतर तो शांत होऊन बुद्धाचे पाया पडला! पातञ्जल सूत्रांतील—"अहिंसा प्रतिष्ठायाम् तत्सन्निधौ वैरत्यागः।" या सूत्राचे हे प्रत्यक्ष उदाहरण होय. बुद्धाच्या अहिंसा तत्त्वाचा हा विजय नव्हे काय?

## वैहार टेंकडीवर राजसिंहासनें.

टांकाच्या भिंतीवर वैहार टेकडीचें चित्रदर्शन घडतें येथें शाक्यमुनि आणि कित्येक राजे सिंहासनावर बसले आहेत. मेघमण्डलांत कित्येक जटाधारी साधु दिसत आहेत. शेवटच्या खिडकीजवळ चितारलेला. मंजुश्री अथवा मंजुघोषा नांवाचा एक ऐतिहासिक पुरुष देवत्व पावून नेपाळी व तिबेटी लोकांत फार पूज्यत्वास पावलेला असा अद्यापही मानला जातो. ह्यानें

नेपाळच्या खोऱ्यांतील पाणी काढून दिले व तो सुपीक केला. शिवाय लोकांस सुसंस्कृत केलें, म्हणून तिकडे त्याचा फार मान आहे. ह्या मंजुघोषाचें चित्र येथे चितारले असून त्याचेचजवळ मच्छिंद्रनाथाचें चित्र काढलें आहे. नेपाळांत अद्यापही मिरवणुकांमधून मच्छिंद्रनाथाचा रथ ओढला जात असतो. पडवीच्या उजव्या बाजूच्या भिंतीवर असलेलें दोन मोर चांगले दिसतात.

## छताची नक्कल युरोपांत नेली !

ह्या लेण्याचें दर्शनी पडवीचें छत इतकें महत्त्वाचें आहे कीं, मेजर जिल या नावाच्या एका युरोपियनानें त्याची नक्कल करून तीं युरोपांत नेली. केन्सिंगटनच्या इंडियन म्यूझियममध्यें ती ठेवली आहे. परदेशच्या चित्रकलाभिज्ञांना अजिंठ्यांतील चित्रकलेविषयीं जें आश्चर्य व कौतुक वाटलें त्याची कीर्ति तिकडे चहुंकडे पसरून गेल्या १०० वर्षांत अनेक युरोपस्थ व परदेशस्थ कलाकार अजिंठ्यांत येऊन आपल्या डोळ्यांचें पारणें फेडून गेलें आहेत. पडवीच्या छतासारखीच ह्या लेण्याच्या अंतर्भागांतील ओऱ्याची छतें बहुतेक शाबूत आहेत. परंतु धुरानें त्यांचें रंगकाम बरेंच खराब झाले असून चित्रांचें फक्त रुपरेषालेखन समजतें. ह्या मधल्या छतांत अनेक वर्तुलाकार आकृति, एक मध्यावलंबी चित्रित केल्या असून त्या सहस्रावधि नमुन्यांच्या वेलबुट्ट्यांनीं प्रेक्षणीय करून, त्यांतून मधून मधून कोंबड्यांच्या व बोकडांच्या झुंजी चित्रित करून त्या मनोहर केल्या आहेत. आंतील खांबसुद्धां रंगविले असून त्यावर सिंहाच्या व तऱ्हे-तऱ्हेच्या प्राण्यांच्या आकृति चमत्कृतिजनक काढलेल्या दिसतात.

## एक प्रेक्षणीय चित्र

पुढच्या ओरीच्या डाव्या टोकास एका राजवाड्यांत मुगुटधारी राजा बसला आहे. उजव्या हातानें म्यानांतील तलवार उपशीत आहे. राजाच्या मागें एक दासी चौरी ढाळणारी उभी आहे. पुढें एक ब्राह्मण डाव्या खांद्यावर पांढरे शुभ्र उपरणें टाकून आला आहे. त्याच्या डोक्याचा

गरगरित गोटा, कानांतील लहान सुंकलें, दाभणकाठीं मिशा असा काढला असून त्यानें आपलें डावें कोपर राजाच्या गादीवर ठेवून व जरा वाकून एक हात राजाच्या दाढीस लावला आहे व कांहीं दया याचना करीत आहे ह्या भिक्षुकाची नखें लांब लांब वाढलेली आणि त्याचे मागें एक काळा नोकर निग्रोसारखा काढला असून त्याचे पाठीवर एक गांठोडें, कानांत लांब कर्णभूषणें आणि डाव्या हातांत एक जादूची कांडीच जणूं काय, कमरेपर्यंत अजिबात उघडा, मात्र कमरेखालीं चिटाचा एक माण्डचोळणा असें कुशल चित्र काढले आहे! डावें बाजूस एक सरदार आला असून त्याचा सेवक नजराणा घेऊन उभा आहे. चवरी ढाळणारी सेविका, एक राजस्त्री अशीं चित्रें आणि पलीकडच्या पटांगणांत हत्तींची झुंज, ती झुंज वरच्या खिडकींतून सहा स्त्रिया पहात आहेत. त्या स्त्रियांपैकीं एक दुःखांत असून खालीं बोटानें दाखवित आहे.

## तांबड्या शाईंत लिहिलेला लेख !

जवळच असून त्या लेखाखालीं शंकरासारखे तीन डोळें असलेला एक मनुष्य दाखविला आहे! कोठडीच्या उजवें बाजूस दरवाजाच्या उंचीच्या बेतानें एक चित्रखंड चितारलें आहे. त्यांत नेहमींप्रमाणें एक राजा, दासी चवरी ढाळीत असलेली, उजवें बाजूस चार पुरुष बसले असून त्यांतील एकाचें हातीं निळें कमलपुष्प असून बाकीचे ताम्रवर्णी आहेत. एकाच्या पायांत पायमोजे असून तो राजाशीं बोलत आहे. इतक्यांत एक दासी फुलें घेऊन येत असून तिच्या पलीकडे एका आसनावर बसलेल्या दोन हंसी आणि दुसऱ्या सात हंसी जवळच चित्रित केलेल्या आहेत. जरा खालीं पाहिलें तर, एका माणसाचे हातांत पुन्हां दोन हंसी; जवळच्याच पर्वताच्या देखाव्यांत सर्व झाडझुडपांस फुलांचा बहर आलेला, एक तलाव कमळांनीं भरलेला व त्यांत हंसी पोहत असलेला, असा अत्यंत नयनमनोहर वनश्रींचा देखावा चित्रित केलेला आहे. भिंताड्या खांबावर बुद्धचित्र रंगविलें असून त्यांचा तांबडा झगा, डोक्यासभोंवतीं प्रकाशवर्तुळ आणि दोन लोकेश्वर छत्र धरीत आहेत असें दाखविलें आहे. पुढें पहिल्या कोठडीच्या पलीकडे एका

विस्तीर्ण आसनावर मोठा मुगुट घातलेली एक स्त्री बसली असून अशाच दुसऱ्या एक दोन स्त्रिया शेजारीं आहेत. खालचे भागांत कमळांचें एक तळें दाखविलें असून त्याचे सभोंवती स्त्री-पुरुष उभे आहेत असें दिसतें.

## राजा व भिकारी

ह्या पुढील चित्रांत एक दरवाजा उघडून एक स्त्री आंत येत आहे. एक राजा आपल्या दोन मुलांना घेऊन चालला आहे व एकाचा हात त्यानें धरला आहे. जवळच्या दोन नोकरांपैकीं एकाचे हातांत कांहीं वाटोळी वस्तु ढाल किंवा पंखा असावा उजवे बाजूस दोन माणसें बोलत असून त्यापैकीं एक ब्राह्मणासारखा दिसतो. पलीकडे दोन घोडे असून कांखेंत झोळी घेतलेला एक भिकारी चितारला आहे.

## विचित्र म्हातारा !

तिसऱ्या व चौथ्या कोठडीच्या दरवाजामध्यें चित्रांची एक रांगच रांग असून त्यांत एक टक्कल पडलेला म्हातारा, त्याचे दोन दांत भलतेच पुढें आलेलें दिसत आहेत असा, एक चौकोनी छत्री हातांत घेऊन भिक्षा मागत मागत त्या चित्रपंक्तींत चार ठिकाणीं आलेला दिसतो. तिसऱ्या कोठडीच्या डाव्या बाजूकडून तो म्हातारा आंत येतो, आणि एका सहकुटुंब बसलेल्या श्रीमंत मनुष्याशीं तो कांहीं बोलत आहे असें दिसते; आणि ती दोघेंही त्यास न्हाहाळून बघत आहेत असें दिसत आहे. खालीं पाहिलें म्हणजे तोच भिकारी कांखेत झोळी व पाठीवर तुंबा घेऊन एका राजासमोर उभा राहिला आहे. राजाजवळची एक मुलगी या म्हाताऱ्याकडे चौकस बुद्धीनें पहात आहे. जरा खालीं पाहिल्यावर ह्याच म्हाताऱ्याला कोणी पाण्याची घागर देत आहे असे दिसतें! उजव्या बाजूस एका राजवाड्यांत हिऱ्या-मोत्यांचा उंची पोपाख करून एक राजा बसला आहे. एक सेवक चवरी ढाळीत आहे. दुसरा एक नोकर भांडें घेऊन पुढें आला आहे. इतक्यांत हा म्हातारा भिक्षा मागण्याकरितां हळूच पुढें येत आहे! राजाचे उजवे बाजूस एक कुलीन स्त्री बसली असून राजाचें लोडास टेंकून एक मूल

बसलें आहे आणि खालीं एक उंची दागिने घातलेला मनुष्य तसेंच आणखी एक तिसराच असें बसले आहेत. ह्या चित्रांच्या रांगेत अनेक ठिकाणीं तोच म्हातारा त्याच्या निरनिराळ्या हावभावांसह दाखविण्यांत चित्र-काराचें अनुपम कौशल्य दिसून येतें.

मागच्या ओरीचे टोंकास घोडे भरधांव फेंकीत असलेलें कित्येक स्वार, कांहींजवळ धनुष्यबाण असलेलें दाखविले आहेत. त्याच्या खालच्या बाजूस कोठडीच्या डाव्या दरवाजाकडे एक रानटी मनुष्य ज्याचे केंस टोकांवर ताठ उभे राहिले आहेत असा, एका निजलेल्या वानराच्या डोक्यांत मोठा दगड उचलून घालीत आहे. त्याचे डावें बाजूस हाच भिल्ल दुसऱ्या एका माकडास पकडण्याच्या बेतांत असून तें माकड इकडे तिकडे बघत बसलें आहे. ह्या चित्रांतील निजलेल्या माकडाचें खालीं दुसरें एक माकड काढले असून तें एका माणसापुढे हात पसरीत आहे. तसेंच तिकडून दुसराच एक माकड येत असून त्याच्यामागून एक मनुष्य येत आहे. ह्या चित्रांत माकडाचे स्वभाव विशेष व चेष्टा चेहऱ्यावरून दर्शविण्यांत चित्रकाराचें कौशल्य दिसते.

पहिल्या कोठडीच्या दरवाजापासून एका भिंतीवर एक मोठा चित्र-खंड दिसतो. त्यांत एक कोणीतरी मोठा मनुष्य स्त्रीसह बसला असून त्याचे डावे बाजूस एक हिरव्या कातडीची दासी; तिच्या केसांत एक बिजवरा अडकविलेला दिसतो. ती कांहींतरी तांतडीनें सांगत आहे असा आविर्भाव आहे. दुसरी एक दासी समोरून येत असून तिनें आपले हात भीतीनें व आश्चर्यानें वर केले आहेत. तिचे मागें एक हिरव्या रंगाची बाई आणि तिचेच मागोमाग एक मनुष्य आणखी एका बाईसह आला असून त्या बाईचे हातांत मगरीचे तोंडासारखी दोन वाद्यें आहेत. डावें बाजूस एक तांबुस रंगाचा टक्कल पडलेला मनुष्य दिसत असून तो मागे वळून घाबऱ्या घाबऱ्या पहात आहे त्याचे समोर एक बाई हात जोडून उभी असून उजवीकडे पहात आहे आणि त्याच्याही डावें बाजूस दोन पुरुष असून एकाच्या हातीं गदा आहे.

ह्या चित्राखालीं डाव्या बाजूस एक राजवाडा, त्यांत दोन दासींसह एक राजा बसलेला, समोर बसलेल्या दोघींसह तो कांहीं बोलत आहे

असें दिसते. दरवाजांतून एक घोडा बाहेर जातो आहे असें दिसते. त्याचें मागें दुसरा एक घोडेस्वार आहे. वरचे बाजूस एक हत्ती राजवाड्यांतून बाहेर पडत असून त्याचे माहुताचे हातांत अंकुश आहे. आणि एकीकडे चार शिपाई ढाल तलवारी हातांत घेऊन चालले आहेत. पुढचे दोन एका बाजूस वळत आहेत आणि हत्तीवर बसलेला राजा त्यांना पुढें भेटतो असें दाखविले आहे.

## शिकारीस निघणारा राजा व त्याची शिकार

पहिल्या व दुसऱ्या कोठडीचे दरवाजामध्यें एक मोठा आकर्षक देखावा चितारला आहे. त्यांतील पहिल्या भागांत, राजा आपल्या राजवाड्यांत सिंहासनावर बसलेला आहे- चौरी ढाळणारी हिरवी दासी, दुसरी एक ताम्रवर्णी व तिसरी अशा तीन दासी जवळ आहेत. राजासमोरील एका पीठावर कोणी एक विद्वान बसला आहे त्याचें डावे खांद्यावर एक उपरणें असून अंगावर कोणतेही दागिनें नाहींत. त्याचे मागें ब्राह्मण भिक्षुकाप्रमाणें पोषाख केलेलें दहा लोक आहेत. त्यांचे समोर दोन पुरुष असून एकानें पांढरा शुभ्र पोषाख केला आहे आणि दुसरा राजाचा शरीर संरक्षक मागें वळून राजाशीं कांहीं बोलत आहे भिक्षुकांच्या वरचे बाजूस तबेल्याचे खिडकींतून कित्येक घोडे पहात आहेत. खालीं दुसऱ्या दालनांत एक मनुष्य दुसऱ्याच्या कमरपट्टयांस हात लावून पकडीत आहे व तो तिसऱ्या एकास पकडून खालीं पाडीत आहे, चौथा एक दुसऱ्यावर उलटला असून असून डावें बाजूस आणखी तिघांची झटापट चालली आहे. त्याचेखालीं एक मोठी शिपायांची तुकडी आहे. राजछत्र डोक्यावर असलेला राजा घोड्यावर बसून बाहेर येत आहे. त्याचा प्रधान त्याचे मागें घोड्यावर बसलेला आहे. हातीं भाला घेतलेले बारा शिपाई आघाडीस चालले आहेत दुसऱ्या दोघांजवळ ढाल-तलवारी आहेत. बरोबर क हीं कुत्रीहि दिसतात.

डावें बाजूस टेकड्या व मोठें दाट जंगल लागते. जगलांतील हरणें शिकाऱ्या समोरून पळत आहेत. दोन वाघ आपल्या झुडुपांतून निद्रिस्त दिसतात. एका हरिणाचें मागें लागून राजा बराच पुढें गेला आहे. डावें भागीं एक मनुष्य आपलीं शस्त्रें बाजूस ठेऊन निजला असून एक सिंह व वाघ

त्याचे पाय चाटीत आहेत. जरा पुढें एक मनुष्य कमरेला तलवार लटकावून बसला आहे. त्याचा घोडा जवळच आहे. एकीकडे एक सिंह समोरून येत आहे. वरच्या बाजूस घोडे, हत्तीं, भालाईत स्वार खुद्द राजा अशी सर्व शिकारीची स्वारी जोरानें उजवीकडे चालली असून राजवाड्याच्या शिखरावर मोठमोठी निशाणें लावली आहेत व मागचे बाजूस एक मोठा सिंह चालला आहे. ही सर्व कथा बुद्धाच्या सिंहजातकांतील आहे.

दुसऱ्या कोठडीच्या उजवे बाजूस एका चित्रखंडांत एक राजा बसला असून त्याचे डोक्यावर दोन पुरुष पाण्याचे घडे ओतीत आहेत. उजवे बाजूस एक स्त्री हातांत तबक घेऊन त्यांतील फुले त्याला देत आहे. उजवे-बाजूच्या एका घरांत निरनिराळ्या वयाची सात माणसें दिसतात. पुढें हत्तीवर दोन मनुष्यें स्वार झाला असून दुसरा एक हत्तीवर चालला आहे. व त्याचे डोक्यावर कोणी छत्र धरलें आहे. त्याचे मागें एक घोडेस्वार चालला असून त्याचे खालीं १०–१२ शिपाई हातीं भालें, तलवारी घेऊन चालले आहेत. आणि सर्वजण मिळून एका राजावर हल्ला करीत आहेत. परंतु तो राजा नुकताच राजवाड्या बाहेर पडला असतांना त्यानें एक गदा अशी फेंकली आहे कीं, तीमुळें दोघेजण तत्काळ मृत्यु पावून खाली पडले आहेत.

## बुद्ध व सोळा जोगी

अन्तर्गृहाच्या डावें टोंकास मध्यभागीं बुद्ध प्रवचन देत आहेत. नेहमीप्रमाणें चौऱ्या ढाळणाऱ्या पऱ्या व मेघमंडलांतील पुष्पमाला घेतलेले देवदूत आहेतच. बुद्धाचे उजवे बाजूस १६ जोगी किंवा डोकी सारी उघडी असलेले शिष्य बसविले असून त्या सर्वांचे पोषाख एकसारखे आहेत. त्यापुढ तीन घोडे स्वार चित्रित केले असून त्यातील एक इराणी पोषाख केलेला डोकीवर उंची टर्किश टोपी, अंगांत एक जाकिट व पायांत विजार अशा पोषाखांत आहे. या तीन घोडेस्वारांच्या मागें एक हत्ती अंबारीसह असून त्या अंबारीत एक राजस्त्री आपली मुलें घेऊन बसली आहे. तिचे पाठीमागें कांहीं सेवक आहेत आणि बुद्धाचे चरणाशी दोन राजे आपलीं डोकीं नमवून प्रणिपात करीत आहेत.

## इराणी सरदार व राजसमूह

डावें बाजूच्या देखाव्यांत एक तरुण राजा गादीवर बसला असून पुढें एक लहानसा मुगुट घातलेला राजा आणि एक मोठा इराणी सरदार उंच टोपी, काळी पण कापलेली दाढी, लांबलचक शेंडी असा दाखविला असून त्याचेसमोर रत्नखचित पोषाख केलेला दुसरा एक राजा बसविला आहे. या सर्व घोळक्याचे मागे दोन ससेनियन्स, दोन घोडेस्वार ससेनियन पोषाखाचें, उंच टोप्या घातलेले असे दाखविले आहेत. यापुढे दोन हत्ती दाखविले असून एकावर एक बोडका मनुष्य बसला आहे व एकंदर तऱ्हा अशी दिसत आहे कीं, तो हत्ती इराणी वकिलाच्या लवाजम्यापैकीं असावा आणि त्या दुसऱ्या हत्तीवर कित्येक ससेनियन लोक बसले असून तीन पताका त्यांच्या डोक्यावरून पलीकडे नेल्या आहेत आणि तीन भाले समोर असून त्यांच्या गवसण्या अडकविल्या आहेत. हत्तींच्या पलीकडे एक सुंदर ससेनियन छत्री घेऊन चालला आहे. हा देखावा इ. स. ४४० चे सुमारास माळव्याचे राजाकडे बेहेराम गोर याचा वकील आल्यावेळचा असावा. बेहराम हा तत्कालीन इराणचा बादशहा. सिथीयनांच्या अथवा हूणांच्या टोळयापासून आपला बचाव व्हावा म्हणून माळव्याच्या अथवा कनोजच्या राजाकडे मित्रत्वाचे संबंध जोडण्याकरितां हिंदुस्थानांत आला होता. असे ऐकिवांत आहे कीं, या घराण्याशी विवाह संबंधही त्यानें जोडला होता.

डावें बाजूस मंदीराचे दरवाजाजवळ एक विशाल देही बुद्ध 'कोरला' असून त्याचें हातांत भिक्षापात्र दिलें आहे आणि एक जपानी चेहऱ्याची बाई आपला मुलगा पुढें ढकलीत असून बुद्धाचे भिक्षापात्रांत भिक्षा वाढण्यास त्या मुलांस सांगत आहे.

त्याचे जवळील अन्तर्गृहाचे उजवें टोंकांस बुद्धाच्या उभ्या व बैठ्या अनेक आकृति रंगविल्या आहेत. खालचे बाजूचा बहुतेक भाग नष्ट झाला आहे तथापि जो शिल्लक आहे त्यांत कांहीं दिगम्बर जैन भिक्षुक नागवे उभे आहेत व तोंडावरील माशा निवारण करण्याकरितां चवऱ्या लावल्या

आहेत. बहुतेकांनीं आपल्या डोक्याचे गोटे केले आहेत व ज्यांनीं केंस राखले आहेत ते वस्त्रधारी आहेत.

अन्तर्गृहाच्या भिंताड्या व दोन मधल्या खांबावरील आकृति आतिशय नक्षीकामाच्या आहेत, व डावें बाजूचें भिंताड्यावर

## आश्चर्यजनक चेहरा !

असा रंगविला आहे कीं, त्याचे अंगांत मोठा थोरला झगा आणि जेथें कर्णभूषण घालावयाचें तेथें एक उंदीर लोंबता ठेवलेला, गळ्यांत पदकाच्या ठिकाणीं खेंकडा बांधलेला आणि पोटावर एक साप लोंबता काढला असून त्या सापाचें तोंड व शेंपटी दोन्ही कानाचे टोंकापर्यंत पोंचविली आहेत !

अन्तर्गृहाचे उजवें बाजूच्या रंगकामांत कित्येक लहान लहान पशू इकडून तिकडे बागडते ठेवले आहेत. मध्येंच तीन घुमटाचा राजवाडा, हरतऱ्हेच्या शिल्पकामाने भरलेला दाखविला आहे. पुढें कांहीं घोडेस्वार, कांहीं पायदळ, एक मोठा कुत्रा आणि कांहीं आकृतीच्या पलीकडे दरवाजाजवळ एक पाण्याचें मोठें डबकें दाखविलें असून एक मनुष्य हरणांवर बसून चालला आहे, त्याच्या ओझ्याखालीं ते हरिण वांकून गेले असून तें बे–बें करीत ओरडत आहे आणि त्याचेच पलीकडे दुसरें एक डबकें, मासे आणि पक्षी यानीं भरलें आहे.

## हत्तीची शिकार

कोठड्यांच्या मागें एका मोठ्या चित्रांत हत्तीच्या शिकारीकरितां राजा घोड्यावरून बाहेर पडत आहे. दोन शिपाई हातांत तलवारी व भाले घेऊन चालत आहेत. एका मोठ्या पांढऱ्या हत्तीच्या मागें तें लागले असून ३ शिकारी भाले घेऊन उजवें बाजूनें जंगलाकडे धावत आहेत. आणि पुढें दोन हत्तींनीं पाहिल्या हत्तीस पायानें धरले असून तो डावें बाजूस वळत आहे आणि मागे राजा लागला आहे, असा शिकारीचा रम्य देखावा चितारला आहे. पुढें तो हत्ती धरून राजवाड्यांत आणल्यावर

पुढचा देखावा शेजारीच चितारला आहे. या देखाव्यांत राजा सिंहासनावर बसला असून दरवाजांत द्वारपाल आहेत, बाहेरच्या बाजूस तो हत्ती आहे त्याला दुसरें दोन हत्ती माणसाळवीत आहेत, नंतर त्याला हत्ती शाळेच्या कोठडींत घातले आहे, दरवाजांत पुढें कोठबा ठेवला आहे. जवळचे मोठे भांडे दोन माणसें ओढीत ओढीत हत्तीकडे नेत आहेत. दुसरा एक मनुष्य गवताची व कोंवळ्या पाल्यांची ओझीं हत्तीकडे नेत आहे.

## साधूपुढें प्रेत आणलें

दुसऱ्या कोठडीच्या दरवाजाबाहेर एक घोडेस्वार जंगलांत असलेल्या साधूकडे जात आहे. खालचें बाजूस हा घोडेस्वार साधूपुढें गुडघें टेंकून बसला आहे व एक मनुष्य पांढऱ्या वस्त्रांत एक प्रेत गुंडाळून साधुकडे आणीत आहे, आणि खालच्या टेकडीवर साधूच्या वेषांत असलेला एक गृहस्थ आपल्या खांद्यावरून एक कावड वाहून नेत असून त्या कावडीच्या एका पारड्यांत एक स्त्री व दुसऱ्या पारड्यांत एक पुरुष असे बसविले आहेत.

मागच्या ओरींत एक जंगलाचा देखावा चितारला असून त्यांत माकड व बैलाचें प्रेम चित्रित केलें आहे, बैलाचें पाठीवर माकड बसविलें असून माकडानें बैलाचें डोळें घट्ट धरून ठेवले आहेत !

भिंताड्या खांबावर एक ताम्रवर्णी स्त्री-राक्षस ढगांतून धांवत असून तिनें आपल्या खांद्यावर एका मनुष्यास घेऊन त्याचें गुडगे धरले आहेत, आणि दुसरी एक अशीच स्त्री-राक्षस, रंग पांढरा, घारे डोळे व मोकळे केंस अशी दाखविली आहे.

चौथ्या कोठडीचे दरवाजाजवळ एक मोठा राजप्रासाद दिसतो. त्याचे तीन मोठाले भाग असून एका डावीकडच्या भागांत एक मौल्यवान पोषाखाची स्त्री खाली बसली आहे. दुसऱ्या दोन उभ्या आहेत. मधल्या दालनांत एक तांबुस वर्णाची स्त्री-राक्षस हातांत कट्यार घेऊन उभी असून पुढे एक शुभ्र वर्णाची बाई मांडीवर मूल घेऊन बसली आहे आणि तिच्या दोन्ही बाजूस दोन हिरव्या रंगाच्या दासी बसल्या आहेत.

मागील चित्रांत ज्या चार स्त्रिया दाखविल्या आहेत त्या ह्याच होत. तिसऱ्या दालनात एक पांढरा राक्षस पेल्यांतून कांहीं पीत आहे. आणि एक ताम्रवर्णी स्त्री–राक्षस केंस पाठीवर मोकळे सोडून हातांत कांहीतरी घेऊन चालली आहे तें बहुतकरून मांस असावे त्यांतला कांहीं भाग गळत आहे. डावें बाजूस दोन भयंकर पांढऱ्या राक्षसिणी आहेत. त्या दोघींनीं आपल्या पंजांत एक भांडें धरलें असून त्या एका टेंकडीवरून दोघींचे केंस एकत्र मोकळे सुटलेले टाकून अधांतरी वर उडत आहेत. उजवें बाजूस मात्र एक मनुष्य उसळी मारुन बाहेर आला असून तिला मारीत आहे. ह्या देखाव्यांत खाली व कांहीं पक्षी असून कांहीं त्या माणसावर पडत आहेत आणि एक लांबचा पक्षी छपरावर बसला असून दुसरा एक जमिनीवर टोंच मारून कांहीं तरी उचलून खात आहे. एक मनुष्य शिडी लावून त्या इमारतीच्या छपरावर चढत आहे.

## राजवाड्यांत मोकळे सिंहासन

पडलें असून त्याचें उजवें बाजूस एक पोषाख केलेली बाई बसली आहे व पलीकडे तसाच एक श्रीमंत मनुष्य दुःखांत बसला आहे. मागें ५–७ माणसें बसली असून हातांत काठी घेऊन एक द्वारपाल उभा आहे आणि दुसऱ्याचें हातीं ढाल-तलवार दिसते. दरवाजाचे उजवें बाजूस पुष्कळ रत्नखचित पोषाखाचा मनुष्य बसला असून पहिल्याचे मागें शिपाई उभे आहेत. आणि त्यांचें हातीं लांब लांब तलवारी व ढाली आहेत. मधल्या-जवळ एक लांब नेपाळी शस्त्र दिसते. या शिपायाचे मागें दोन घोडे असून एक ताम्रवर्णी मनुष्य त्यांना धरून उभा आहे. याखालीं दोन व्यक्ति काढल्या असून त्यांचे समोरील आकृति आपल्या डाव्या बाजूस असलेल्या राक्षसाकडे आपले बोट दाखवित आहे आणि एक शिपाई हातांत तलवार घेऊन त्या बाजूला पहात आहे. गळ्यांत मोत्यांचा हार घातलेला मनुष्य जवळच असून तो डावीकडे पहात असून उजवे बाजूस तीन शिपाई नेपाळी तलवारी व चित्रविचित्र ढाली हातीं घेऊन उभे आहेत.

## राजवाड्यावर निशाण !

या पुढील चित्रांत एक राजवाडा दाखविला असून त्यावर निशाण फडकत आहे. त्या निशाणाचें विभाग आकाशांत वायुलहरीवर नाचतांना दिसतात. उजवें बाजूस राजा हत्तीवर बसला असून महात हत्तींच्या मानेवर बसला आहे व ते उजवीकडे चालले आहेत. राजापुढें कांहीं शिपाई लांब लांब भाले घेऊन चालले असून समोर राजवाड्यांतील मंडळीही चालली आहेत. या चित्रापैकीं पुढचा भाग कोणीतरी कापून नेला असल्यामुळें चित्रांची हानि झाली आहे. खालचा देखावा चित्रांतील राजाकडे आलेल्या कोणत्या तरी दरबारी-शिष्टांचा असावा.

या विशाल चित्राच्या खालच्या भागांत एका राजाची स्वारी आपल्या पांढऱ्या शुभ्र हत्तीवर बसून राजमुगुट घालून, छत्रचामरांसह येत आहे आणि भाले व पताका ह्यानीं त्याचे डोक्यावर मेहेरपी करून आच्छादन टाकलेले आहे. डावें बाजूस धूसर रंगाचे व तांबड्या रंगाचे हत्ती असून प्रत्येक हत्तीस्वाराजवळचा बाणाचा भाता हत्तीच्या कुशीवर बांधून लादलेला असा आहे. तलवारी घेऊन ६, ६ शिपाई दोन्ही बाजूंनीं चालले आहेत.

## गलबतांतून घोडेस्वार व हत्ती

लढाईंत गुंतलेले घोडेस्वार व हत्ती लढाईकरितां आले असून नुकतीच लढाईस सुरवात झाली आहे आणि किनाऱ्यावर लढाईची लांडगेतोड चालली आहे. लांब केसाचे व गोऱ्या कातडीचे शत्रू भाल्यानें हल्ले करीत आहेत. स्त्री–राक्षसिणीपैकीं कांहींना आपला पराभव होत आहे असे वाटून त्या शरण येत आहेत. अर्थात् हल्ला करणाऱ्या राजाचा विजय झाला असून चित्राचे एके भागांत मनोरेवजा टेंकड्या काढल्या असून त्यांतील एके ठिकाणीं राजास सिंहासनावर बसाविले आहे. दोन भटजी त्याचे डोक्यावर राज्याभिषेकाचें पाणी शिंपडत आहेत. चौऱ्या ढाळत आहेत

झांजा व ढोलकी वाजत आहेत, या सर्व चित्राचा मथितार्थ सिलोन बेटांत विजय राजाची स्वारी झाली व तेथें त्यास जो राज्याभिषेक झाला त्याचे चित्रदर्शन करविण्याचा आहे.

## दरवाजावर एक शुभ्रवर्णी राक्षसीण

पाय ताणून बसली आहे. तिचे हातांत कांहीं भांडें आहे. तिचेच जवळ दुसरी एक बसली आहे. शेजारीं एक ताम्रवर्णी मनुष्य असून त्याच्या आंतड्याचा कांहीं भाग तिनें फाडला, तीं तो खात आहे. उजवे बाजूस अशाच दोन राक्षसिणी हातांत सुरे घेऊन एकीनें एका माणसाची गच्ची पकडली आहे, आणि त्याच्या पोटांत आपल्या हातांतील सुरा भोंसकींत आहे. आणखी एक पांचवी तशीच सुरी घेऊन एका माणसाचे प्रेतावर बसली असून तिनें त्याची छाती फाडली आहे आणि डाव्या हातनें रक्ताचा पेला भरून काढून तीं पीत आहे. उजवे बाजूस एक घुमटाकार घर असून एक मनुष्य व त्याची बायको बसली आहे. पुरुषाचें हातांत एक पेला आहे. ह्याखालीं कांहीं भाग पडला आहे, परंतु त्याचे खालीं दोन सुस्वरुप स्त्रियांचे चेहरे दिसतात.

## समुद्रांत गलबतें

खालच्या एका चित्रांत समुद्रामध्यें दोन गलबतें दाखविलीं असून प्रत्येक गलबतास ३, ३ डोलकाठ्या आहेत. मधून मधून मोठेमोठे पोवळ्यांचे खडक दिसतात. डावें बाजूचे गलबतासमोर दोन भलेमोठे मासे काढले आहेत, उजव्या गलबतावरच्या एका डोलकाठीवर एक मोठा त्रिशूळ उभा केला आहे. त्या गलबतापलीकडे एका मनुष्यानें हातांत दोर धरला असून तो गलबतावर चढत आहे. जवळच समुद्रांतील एका अस्वलाचें डोकें दिसतें. उजवे बाजूला गलबतावरील खलाशी आपल्या हातानें व वल्ह्याच्या साहाय्यानें गलबत मागें पुढें ढकलीत आहेत. या गलबताच्या देखाव्याचें उजवें बाजूस एक निस्तेज शरीराचा मोठा मनुष्य आपल्या तरुण बायकोजवळ बसला आहे. त्याने आपल्या पाठ व गुडघ्यासंभोंवती

आधाराकरितां एक उपरणें गुंडाळलें आहे. बायको एका प्याल्यांतून त्याला कांहीं तरी देत आहे. पलीकडच्या दालनांत तेंच जोडपें बसलें असून स्त्रीनें पुरुषाचे खांद्यावरून आपला हात टाकला आहे. खालच्या भागांत एक राक्षसीण वराहमुखी, पण इतर सर्वांगानें सुंदर व उत्तम पोषाखाची एका पलंगावर निजली आहे. तिच्या पायाशीं एक मनुष्य बसला आहे. पलीकडे एक दासी पाण्याचें भांडे व कांहीं डबी घेऊन उभी आहे व ती, डबी नेत आहे. पण वरील मनुष्यानें तिनें डबी नेऊ नये म्हणून तिचा हात धरला आहे. पलंगासमोर दुसरी एक बाई बसली आहे आणि हिरवी कांचोळी व चिटाचा झगा असा पेहेराव करून एका झोपाळयावर ती झोके घेत आहे.

वरच्या भागांत एक कुलीन स्त्री व तिच्या दोन दासी एकीचे हातांत नक्षीची डबी व वेणीफणीचे सामान घेतलेले ताट दाखविले आहे.

पुढच्या ओरीचा वरचा भाग व त्याचे छत ह्यावेवर असलेल्या चित्रांत एक राजा आपल्या लवाजम्यासह पर्वतावरून खालीं येत आहे. राजे हत्तीवर बसले आहेत व स्वतः हत्तीस हांकलीत आहेत. हिरव्या रंगाचा एक सेवक छत्री धरीत असून त्याचे हातीं तलवार व जांबिया आहेत. राजाच्या दोन्ही बाजूस हत्तीवर बसून कोणी सरदार चालले आहेत आणि या स्वारीच्या मागे पुढे विविध प्रकारची निशाणें घेऊन पायदळ चाललें आहे. मेघमण्डलांत स्वर्गदूत नगारे वाजवीत आहेत. दूर अंतरावर घोडेस्वार अग्रभागीं झाले असून त्यापैकीं एक पडघम वाजवीत आहे व दुसरा कांहीं जाहीर घोषणा करीत आहे. राजाच्या जवळ ढाल–तलवार घेतलेला एक आणि भाला व ढाल घेतलेला एक असे संरक्षक आहेत. एका टोंकाला एक लहानशीं टेकडीं असून तिचेवर कांहीं आकृत्या आहेत. उजवे बाजूला एका तंबूत बरेंच भिक्षेकरी आंत येत आहेत. आणि ते सर्व एक लांकडी उच्चासन केलेल्या ठिकाणी जात आहेत ते भिक्षा मागण्याकरितां आलेले दिसतात त्यांना भिक्षा वाढली जात असून काळया कटोऱ्यांतून एक भिकारी पाणी पीत आहे असे दिसते.

## शिबि राजाची कथा

खालच्या चित्रांत शिबि राजाची कथा चित्रित करतांना चित्र-कलेचा उत्कर्ष कलाकारानें आपल्या कौशल्यानें दाखविला आहे. एका अर्धस्तंभावर एका वृक्षाखालीं दोघे राजपुत्र राजमुगुट घालून बसले आहेत त्या दोहोंपैकीं शिबिराजा डावीकडचा होय. मागें टेकडी असून खालचे बाजूस कमल पुष्पांनीं भरलेला एक तलाव दाखविला आहे. शिबिराजा ज्या सिंहासनावर बसला आहे त्यावर त्याचें नांव कोरले आहे. दोहोंबाजूस दोन सरदार बसले असून त्यापैकीं एक हात जोडून कांहींतरी वार्ता सांगत आहे. तिसरा एक घाबऱ्या घाबऱ्या वर पहात आहे. एक ताट हातीं घेतलेला मनुष्य, त्याचे पलीकडे हत्ती, मागील अंगणांत दोन सेवक आणि पुढच्या भागांत राजपुत्राचा एक ताम्रवर्णी नोकर व त्याचे मागे राणीहि कदाचित् असावी असें अनुमान निघतें. ह्या राजपुत्राचे वर एक मोठा मुगुट घातलेला व्यक्ति आकाशमार्गे धांवून येत आहे. तिचें खालीं इन्द्र असें म्हटलें आहे. पुढें शिबिराजा सिंहासनावर गादीला टेंकून बसला आहे. त्यानें एक डोळा आपल्या एका हातानें झाकून घेतला असून चित्राखालीं शिबिराजा असे लिहिलेही आहे. उजवें बाजूस एक स्त्री बसली आहे. तिनें आपला एक हात छातीस लावलेला आहे व डावे बाजूस दुःखानें पहात असून “ असें करू नका ” असें सांगत आहे. पलीकडच्या बाजूस तर एका स्त्रीनें डोळयांस पदर लावला असून जणुं ती रडत आहे. डावें बाजूस एक मनुष्य श्रीमंत पोषाखांत बसला आहे. तो शिबिराजाचा शिवक नांवाचा सेवक असावा. त्याच्या कपाळावर एक कपाळपट्टी आहे. मागें एक बैल व घोडा असून त्याचे पलीकडे इन्द्र भिक्षेकऱ्याच्या रुपानें आला आहे व राजाजवळ कांहीं मागत आहे.

या चित्रखंडांतील सर्व आकृति पायांपासून डोक्यापर्यंत पोषाखांत आहेत. येथें एक मोठा मनुष्य व त्याचा नोंकर घोड्यावर बसून हातांत तिरकमठे घेऊन शिकारीस जात आहेत. त्याची व दुसऱ्या एका शिकाऱ्याची भेट झाली आहे. उजवें बाजूस धांवत असलेल्या हरिणांकडे बोट

दाखवून तो कांहींतरी सांगत आहे, पलीकडील गुहेंत वाघ अथवा सिंह कोणीतरी बसला आहे असा देखावा ध्वनित केला आहे. एक शिकार करणारा राजा उंचशा पांढऱ्या घोड्यावर बसला असून बाण-भाते, तलवारी–तिरकमठे घेतलेलें कांही नोकर, वगैरे शिकारी टोळी चित्रित केली आहे. खिडक्यावरून चित्रकामांचे कांहीं तुकडे आहेत. एक धनुर्धारी, पाठीमागे बाणांचा भाता ठेऊन बाण सोडत आहे, जवळच बुद्धावशेष मंदीर काढले आहे, त्याच्या जवळच्या झाडांवर कांहीं पक्षी बसले असून खालीं हरणें आहेत, उजवे बाजूस दूर अंतरावर एक राजा–राणी व त्याचे कांहीं सेवक, डावे बाजूस एक निर्धन भिक्षुक एका चौरंगावर बसलेला, बाहेरचा भिकारी गुडघे टेकून पायऱ्यांशी बसला असून बोलत आहे. पलीकडे राजा व सेवक दुसऱ्या एका घराच्या दरवाजाजवळ जात आहेत, त्या घरांत कांहीं कबरीं हरणे असून पलीकडे स्वैपाकगृह आहे व त्या कबऱ्या हरणाची शिकार शिजवून कशी खावी याविषयीं बोलणें चालू आहे.

एका टेंकडीवर एक घोडेस्वार व दुसरी कांहीं आकृति दिसते. कांहीं माकडें मजा करीत आहेत. पलीलडे कित्येक हरिणें व त्यांचीं बच्चीं बागडत आहेत.

प्रवेश दरवाजाच्या आंतल्याभागास जो देखावा आहे त्यांत एक राजा आपलीं सर्व भूषणें काढून टाकून एका लांब पलंगावर बसला आहे त्याचे पलीकडे त्याचीं तरुण स्त्री बसली आहे. व तिला त्यानें आधार दिला आहे. दुसरी एक दासी राजाशीं बोलत आहे आणि तिसरी राणीचें पाय चेपीत आहे व कांहीं चोळीत आहे. जवळ पंखे घेऊन दासी उभ्या आहेत. पलीकडून एक पांढऱ्या पोषाखाचा मनुष्य टोंपलींत कांहीं आणीत आहे, इत्यादि देखाखा दिसतो.

एक कमळांचे तळें या चित्रखंडांत दाखविलें असून त्या तळयांत हत्ती शिरून मोडतोड करीत आहे पलीकडे दाट झाडी असलेला उंच पर्वत असून एक स्त्री–पुरुष जोडपें हा पर्वत चढत आहे पुरुषाजवळ तिरकमठा व तलवार आहे. स्त्रीचा पोषाख मोठा शृंगारयुक्त असून तिनें आपला हात पुरुषाच्या खांद्यावर ठेविला आहे. त्यांचेसमोर पुढें माकड, एक फार

मोठा हत्ती, चौंऱ्या ढाळणारे, तलवारी-तिरकमठें घेतलेले शिपाई असें दाखविले आहेत. एक पुरुष हत्तीकडे न्याहाळून पहात असून दुसरा त्याला नमस्कार करीत आहे असें दिसते. आणि दुसरें कांहीं हत्ती काढले असून खिडकीचेवर दोन पांढऱ्याशुभ्र आकृति आहेत.

ओरीच्या डाव्या टोकास बुद्धासमोर एक हत्ती गुडघा टेकून बसला आहे आणखी ३--४ डावे उजवे बाजूस आहेत. पर्वत-दरीचा देखावा आहे. या ठिकाणचे खांब हरतऱ्हेच्या देखाव्यानें भरलेले आहेत.

# लेणें क्रमांक अठरा

**✤✤✤ लेणें १८**

हे लेणें म्हणजे एक केवळ देवडीच्या स्वरुपाचे आहे. कदाचित् त्याचे मागे लेणें कोरण्याचा हेतु असावा.

## पाण्याचा हौद

या लेण्याखालीं एक पाण्याचा हौद असून जणूं काय त्याचे वर हे लेणे आच्छादन आहे.

# लेणें क्रमांक एकोणीस

**✤✤✤ लेणें १७**

हें तिसरें चैत्य लेणें. २४' × ४६' आगाराचे व २४' उंचीचे आहे. यांत अत्यंत परिश्रमपुर्वक खोदकाम व शिल्पकाम केले आहे. आंतील गाभाऱ्यास ११' उंचीचे १५ खांब आहेत. या खांबांचा पाया, बुधांत चौरस वर अष्टकोनी पट्टा आणि त्याचेवर सर्व काम वर्तुळाकार असा कोरला आहे. प्रत्येक खांबावर विविध प्रकारची नक्षीं कोरली आहें.

पुष्पदलांचे आकार, वेलीफुलांच्या वेलबुट्टी, मध्यभागी बुद्ध मुर्ति, जागोजाग कांहीं हत्ती; बकरे, घोडेस्वार आणि उडत्या आकृति दाखविल्या आहेत. दर्शनी कमान तर फारच सुंदर आहे. मधल्या दालनांतून बुद्ध मुर्ति कांहीं आसनस्थ व कांहीं उभ्या कोरल्या असून मधले छत ८।' उंचीवर घेतले आहे. अर्धवर्तुळाकार आधार, मधून मधून, बुद्धाचे मुखवटे असें अप्रतिम कोरीव काम दिसते.

## एक संधि चैत्य

यांतील चैत्य एक संधि कोरला असून ह्या खालीं बुंधात पाय ठेवण्याकरिता एक चौथरा, व एका कमानीत शाक्य मुनींचा उभा पुतळा बसविला आहे चैत्याच्या घुमटावर शाक्य मुनींची प्रतिमा आहेच. आणि त्यावर तीन दगडी छत्र्या बसविल्या आहेत. त्यांचा अर्थ कांहीं खुणेचा असावा. एक स्वर्ग, दुसरी मृत्यू, तिसरी चिरस्वातंत्र्य, अशा कल्पनांच्या त्या असाव्यात.

## ओऱ्यांचे वरील रंगीत छत

या छतावरील रंगीत वेलबुट्टयांत बुद्धाकृती व चैत्य मधुन, मधुन रंगविले होते. भिंतीवरील बुद्धाची चित्रें प्रत्येक ठिंकाणी भक्तगण व सेवकांसही रंगविलीं होतीं, उभ्या बुंद्धांचीं सर्व चित्रें प्रकाश वर्तुळानें युक्त अशीं होतीं. परंतु आतां बहुतेक रंगकाम उडून गेले आहे. फक्त थोडासा भाग दिसतो.

या लेण्यांत जाण्यांस एकच दरवाजा असून आंतला सर्वच भाग विशेषतः दर्शनी भागसुद्धां सुरक्षींत आहे ही नवलाची गोष्ट होय. दर्शनी भाग व द्वारमंडप अप्रतीम शिल्पकामानें परिपूर्ण असून बाहेरचें बाजूस मस्तकांवर सात फणा असलेले सर्प चिन्ह कोरलेला नाग राजाचा पुतळा बसविला आहे. त्याची राणीही जवळ बसलेली असून तिचे डोक्यावर एक नाग छत्र आहे. इतकेंच नव्हे तर चवरी ढळणाऱ्या दासीचे डोक्यावरही नाग छत्र दिसतें.

बाहेरचे बाजूस भिक्षुंची विश्रांतीची जागा १०' × ८' च्या दोन खोल्याची आहे. त्यांचे खांबाचे मथळ्यामधून प्रत्येक कोपऱ्यावर आंब्याचे द्राक्षांचे व सिताफळांचें घड लागलेले कोरले आहेत.

## बुद्धाचें भिक्षा मागणें

मुख्य दरवाजाचें उजवें बाजूस बाहेर हाती भिक्षापात्र असलेले बुद्ध भिक्षा मागत आहेत आणि एक स्त्री आपल्या मुलांस पुढें ढकलीत असून त्याच्या हातून भिक्षा वाढवित आहे असा देखावा कोरलेला आहे. हाच देखावा क्र. १७ च्या लेण्यांत रंगविला आहे.

द्वार मंडपाचे डावे बाजूस कुबेराची प्रतिमा काढली असून उजवे बाजूसही कुबेराचीच आकृती असावी. कमानीच्या शिल्पकामांत कित्येक बैठे, कित्येक उभे बुद्ध जागोजाग बसविले आहेत. दर्शनी भागाची फार मोठी कमान मधून, मधून भंगली असून कमानी पुढें ३०' × ३३' विस्तीर्ण आंगण कोरले आहे. ओऱ्याचे छतावर मात्र कित्येक बुद्ध मुर्ति रंगविल्या असून मधून, मधून चैत्य चित्रे व वेलबुट्टीचे केलेले रंगकाम प्रेक्षणीय परंतु तें आतां बरेचसें फिकट झालें आहे.

या लेण्याची एकंदर कारागिरी नं. १ च्या लेण्याशी इतकी मिळती आहे कीं नं. १ चे व हे नं. १९ चे लेणे एकांच वेळी सुमारे ६ व्या शतकांत कोरले असावे.

---

# लेणें क्रमांक वीस

\+ + + लेणें २०

हे एक लहानसें विहार लेणें असून त्याचे पडवीचा एक पुढचा खांब व दोन भिंताडी खांब वनस्पतींच्या हिरवळींचे देखावे कोरलेले असे आहेत. पडवींतील डाव्या बाजूचा खांब नवीन बांधून काढला आहे. आंतील दिवाणखाना २८' × २५' चा चौरस उंची १२।।' घेतली आहे.

आंत खांब नाहींत. भिंतीवरून बुद्धाच्या मुर्ति व सेवकगण कोरले आहेत. बाजूच्या भिंतीवर एक नाग परिचारक, हाती पंखा घेतलेली बाई असें किरकोळ कोरीव काम आहे. परंतु हें सर्व मोठ्या प्रमाणावर नष्ट होत चाललें आहे. उजवे भागांत कासवावर उभा असलेला सेवक, एका कोनाड्यांत बुद्ध व त्याचें सेवक कोरलेले दिसतात.

## मच्छिंद्रनाथांचा पुतळा

यांतील एक पुतळा मच्छिंद्रनाथ या नांवाने भिल्लांस माहीत होता. त्यांस तांबड्या रंगाने त्यांनी वाढविला असें दिसतें. या मच्छिंद्रनाथाभोंवती दोन मोठें इंद्र उभे केले असून त्यांचे डोक्यांवर भले मोठे मुकुट व हाती चौऱ्या आहेत. आसनाचें समोर दोन हरीण, मध्ये एक चक्र घेऊन खेळत आहेत भिंतीवरची चित्रें पडून गेली असून दरवाजावरील दाखविलेली वेलबुट्टी घटोत्कच लेण्यासारखी दिसते.

---

# लेणें क्रमांक एकवीस

लेणें २१

या लेण्यांची पुढची पडवी पडून गेली आहे. परंतु दोन बाजुंचे भिंतीतील अर्धस्तंभ नक्षीचें कोरीव कामांनीं भरलेले असून एकंदर कौशल्याची कल्पना येते. पडवीच्या दोन्ही बाजूस एक एक भजन मंदीर कोरले असून आंतील दिवाणखाना ५१' × ५१' एवढा विस्तीर्ण आहे. मध्यभागीं लहान लहान प्रार्थना मंदीरे कोरली असून त्यामधुन आणखी एका आंतरगृहांत जातां येणे. प्रत्येक बाजूच्या भिंतीत चार चार कोठड्या आहेत. दिवाणखान्यांचें छतास बारा खांबाचा आधार घेतला असून आंतील बुद्धिमुर्ति आसनस्थ बसुन कांहीं शिकवीत आहे. यांतील दोन खांब अजीबात नवीन बांधून काढले असून बहुतेक सर्व खांबांस दुरुस्ती केलेली आहे.

## हजार वर्षांपुर्वीचे ताजे रंग

आंतील दिवाणखान्यांच्या छतांतील रंगीत व चित्र कामाचें मोठ-तुकडे अजून स्पष्ठ दिसतात. आणि त्यांतील निळे रंग तर हजार वर्षां-पुर्वि असें होते तसेंच अगदीं ताजे दिसतात. या लेण्यांत अनेक आकृतींचें रेखा लेखन अप्रतीम व सर्वोत्कृष्ट असें झांढळते. आकृतिच्या कानाको-पऱ्यांतून पांढऱ्या व पिंगट रंगाच्या फुलांच्या वेलबुट्ट्या काढल्या आहेत. पुष्कळ ठिकाणी रंगाच्या खपल्या पडून किंवा ते फिकट होऊन रंगकामाचें नमुनेंच काम अवशिष्ट राहिलें आहेत.

---

## लेणें क्रमांक बावीस २२

हे एक लहानसें लेणें सहाव्या, सातव्या शतकात कोरले असावे असा अंदाज आहे. आकार १६' × ९' आहे. चार लहान लहान कोठड्या एक सुंदर दरवाजा एक लहानशीं पडवीं एवढेंच पहाता येते. या लेण्यातील प्रार्थनेचा दिवाणखाना एकदमच लागतो. कमळावर पाय ठेवलेलीं शाक्य मुनींची मुर्ति तिच्या आसना समोर एक चक्र, दोन लहान लहान हरणें व दोहों बाजूस भक्त गण आहेत. डावे बाजुस ज्ञानी बुद्धापैकी चवथा बुद्ध अमिताभचा बोधित्सव ज्याचे नांव पद्मपाणी आहे तो चवरी ढाळीत आहे. उजवे बाजूस कुरळे केसांचा एक सेवक बहुत करुन तो इंद्र असावा आणि एका लेखाखालीं कमळावर बसलेल्या शाक्य मुनींचा कोरीव ध्यानस्थ पुतळा खोदला आहे.

## बोधि वृक्षाखालीं ध्यानस्थ बुद्ध !

मागचें भिंतीत खालचे बाजूस तीन बुद्ध मूर्ति असून सात बोधी वृक्षाखालीं सात बुद्धमूर्ती ध्यानस्थ बसलेल्या चितारलेल्या आहेत. त्यांची नांवे रंगविली आहेत ती अशी ( १ ) विपाशीं ( २ ) शिखी ( ३ ) विश्वभु ( ४ ) कनकमुनीं ( ५ ) काश्यप ( ६ ) शाक्यमुनी ( ७ ) मैत्रेय या शिवाय एक नांव गळले असून तें चालू युगांतील पहिला बुद्ध ज्यास म्हणतात त्याचें

म्हणजे " क्रकुसंघ अथवा ककुसंघ याचें असावे. बुद्ध लोकांची समजूत अशी आहे कीं, प्रत्येक कल्पाचे शेवटीं जलप्रलय होतो व पुन्हां त्याची पुनःसृष्टी होते. पाठीमागल्या कल्पांत विपार्शी, शिखी, विश्वभू हे बुद्ध होऊन गेले. आणि चालू युगांत क्रकुसंघ, काश्यप, शाक्यमुनी अथवा गौतम यांचे अवतार आतांपर्यंत झाले असून शाक्यमुनिनंतर पांच हजार वर्षानंतर, मैत्रेयाचा अवतार व्हावयाचा आहे. या सर्व अवतारांच्या नांवाखालीं खालील शब्द रंगाविले आहेत. " शाक्य भिक्षुचीही धर्मादाय देणगी.....हिचे पुण्य माता पितरांना व सर्व प्राणि जाताला वाहिले आहे... ..सौंदर्य, सुखसमृद्धि, सद्गुण ओजस्वी इंद्रियें, ज्ञानाचे संवर्धन करणारी, नेत्रांना सुखद, ( होवो ) "

## लेणें क्रमांक तेवीस

हे बारा खांबी विहार लेणें ५१' × ५१' आकाराचे १४' उंचीचे व ४ खांबी व दोन भिंताडे खांब पडवीचे आहे. पडवीच्या दोन्ही बाजूस भजन मंदिरे आहेत. खांबांची वरची टोकें कोरुन त्यांच्या मथळ्यावर चार खुजे चार कोपऱ्यांत उचलून धरीत आहे.

## लेणें क्रमांक चोवीस

हें लेणें अपुरेंच टाकलें आहे. याचा आकार मात्र ७३ फूट रुंद ७५ फूट खोलीपर्यंत कातळांत खोदांत नेलेला, २० खांबी दिवाणखाना धरलेला, इतका विशाल आहे. पडवीच्या खांबापैकीं जो एकच खांब उभा आहे, त्यावरील कोरीव काम पुष्कळ परिश्रमाचे आहे.

## लेणें क्रमांक पंचवीस

कातळांत उंच जागीं हें एक लहान लेणें कोरलें असून आंतील दिवाणखाना २६' × २६' चा आहे. यास तीन दरवाजे असून आंतील भागास कोठडी किंवा मंदीर नाही. पडवीच्या डाव्या टोकांस एक उपगृह असून आंत कोठड्या आहेत, या लेण्याखालीं बुद्धाकृती कोरलेली आहे.

## लेणें क्रमांक सव्वीस

या लेण्याचें खोदकाम सामान्य प्रतीचें असलें तरी तें इतके असंख्य व इतके परिश्रमपूर्वक खोदलें आहे कीं, आश्चर्य वाटतें. अदमास आहे कीं, ख्रिस्ती शकाच्या सहाव्या शतकांतलें हें काम असावें.

दर्शनी पडवी फार विशाल चार स्तंभांची होती. तिचें सर्व खांब पडले असून बुंधे फक्त सध्यां दिसतात. या पडवीच्या प्रत्येक टोकांस एक दुखांबी खोली पूर्वी होती. पडवीचे बाहेरील पटांगण विस्तृत पसरलें असून उजवे बाजूस एकावर एक दोन मजले कोरीव काम व त्यामध्यें अवलोकितेश्वरांचा शांतिपाठ चालला आहे, आणि उजवें बाजूस शाक्यमुनी आशिर्वाद देत जाहेत, अशा भावनेचें कोरलें आहे.

तसेंच क्र. २५ च्या लेण्यांमधून वर सज्जांत जाण्याचा मार्ग ठेवला होता. पडवी पडल्यामुळें तो मार्ग नाहींसा झाला. भव्य कमानीच्या खालीं २॥। फूट उंचीचा उंबरठा चढविला असून एक दगडी भिंत कोरली आहे, व तिच्यावर अनेक लहान लहान बुद्धाकृति बसविल्या आहेत. बाहेरील कमान १४ फूट उंचीची असून आंतील कमान सुमारें ९ फूट आकाराची आहे. लेण्याचा सर्व दर्शनी भाग, त्याची विशाल कमान, दोहों बाजूंच्या पुढें आलेल्या भिंती यांच्या मधील दालनांचे निरनिराळे विभाग केले असून बुद्धाकृति कोरल्या आहेत.

## धनपति कुबेराचे बैठे पुतळे !

कमानीच्या प्रत्येक बाजूस कुबेराचे बैठें पुतळे कोरलें असून त्यापलीकडे एकांत अशा कोनाड्यांत बुद्ध देवाचा उभा पुतळा कोरला आहे. या मजल्याच्या टोकांस असलेल्या भिंतीचें भागांस प्रत्येक भागी बुद्धाचें पुतळे उभे कोरले असून

## या पुतळ्यांची उंची प्रत्येकीं सोळाफूट !!

आहे. डावीकडील पुतळयांखालीं एक लेख कोरला आहे कीं,

"ही भिक्षु भदंत गुणाकर शाक्य याची देणगी होय." हा लेख " देय धर्मोऽयं शाक्य भिक्षोः । भदंत गुणाकरस्य, यदत्र पुण्यं तद् भवतु मातापितरम् पूर्वांगमम् कित्व सर्वसत्वेभ्यः अनुत्तरज्ञानावाप्तये । "

याचा अर्थ असा कीं, " ही धर्मार्थ देणगी शाक्य कुलोत्पन्न भिक्षु, भदन्त गुणाकर याची असून हिचे पुण्य मातापितरांस आणि कुलांतील इतरांस व इतर सर्व प्राणिमात्रांस मिळो, उच्चतम ज्ञानाच्या प्राप्तीकरितां." याखेरीज तत्कालीन अश्मक राजांचें दिवाण भावविरजा व त्याचा मुलगा देवराजा यांनीं लेख कोरविला आहे. त्यांचें मराठी भाषांतर पुढीलप्रमाणें—

" या जगताच्या हिताकरिता अत्यंत उत्सुक आणि जो सत्कार्यकर्ता सुख जाणणारा श्रेष्ठतम असा मुनींन्द्र, जो सद्गुणांचें माहेरघर, तीनही स्थितींनीं जो अविनाशी आणि ज्याचें वैभव म्हणजे दयेचा प्रकाश हेंच..."

" ज्यानें जन्ममरणाचें फेरे चुकविले, अमरत्व प्राप्त करून घेतलें, चिरंतन सुखाची व शांतीची ज्याला प्राप्ती झाली त्याच्या कीर्तीचा विस्तार शब्दवर्ण्य नाहीं."

" अशा तथागताला प्रत्येकानें पराकाष्ठेच्या भक्तिभावानें विनम्र होऊन रहावें.

" देवांनाही दुःखानें न सोडल्यामुळें त्यांच्याही वैभवांत उणीवा आहेत. शंकराला शापानें आपलें तिन्ही डोळे उघडावें लागून तो भीतिग्रस्त होतो. कृष्णाला सुद्धां शापामुळें मृत्यूवर विजय मिळवितां आला नाहीं. म्हणून सुगत ( हें बुद्धाचें नांव आहे ) हा भयरहित होऊन सर्वोत्कर्ष पावला. आपल्या आयुष्यांतील कर्तव्यें उत्तम पार पाडून शाक्यमुनींनें पर्वतांतील निवासस्थान तयार करविलें."

" श्रीमंत असून ऐहिक व पारलौकिक सुखाची ज्यांना अपेक्षा आहे. त्यांनीं सत्कृत्यें करावी हेंच त्यांना शोभण्यासारखें आहे. असें म्हणतात कीं, सत्कृत्याची कीर्ति जोपर्यंत जगांत टिकेल तोपर्यंत त्याचा आत्मा स्वर्गीय सुखाचा उपभोग घेईल. म्हणून कीर्ति मागें राहील अशीं कामें पर्वतांत चन्द्रसूर्यांचें अस्तित्व असेंपर्यंत टिकतील अशी कोरून ठेवावी."

" अश्मक ( कान्हदेश ) राजाचें सन्माननीय व पूज्य प्रधान भावविरजा ज्यांचा सज्जनपणा जन्मोंजन्मीं अनुभवास आला. सुर, असुर यांच्या व आचार्यांच्या तत्वज्ञानांत......जे आचार्य समंत भद्राचें एकनिष्ठ अनुयायी म्हणून प्रसिद्ध आहेत, त्यांच्या कीर्तीसाठीं तसेंच त्यांचा पुत्र बुद्धिमान,

देवविराज यानें आपल्या वडिलांचें वैभव कायम ठेवण्यासाठीं तसेंच आपल्या मातापितरांचें पारलौकिक हित साधण्यासाठीं ही सुगताची वसति ( लेणें ) खोदविली आणि ज्या धर्मदत्त आणि ब्रह्मबंधु यांनीं ही माझी गुहा पुरी केली त्यांनाही पुण्य मिळो. तसेंच ह्या जगतांतील सर्वांस मिळो. "ज्यानें तत्व-ज्ञानाचा अभ्यास करून आपल्या तारुण्यांत सर्व कुटुंब सभोंवती असतांना वैराग्य स्वीकारलें व भिक्षु झाला, ज्याच्या तपश्चर्येची व्रतें पुष्कळ, ज्याचें अंतःकरण शुद्ध आणि जो या जगतांतील लोकांच्या शाश्वत सुखाकरितां मार्गदर्शक झाला...(सात अक्षरें गळली)...ही गुहा योग्यांच्या मुख्यानें वस्ती केलेली आपल्या वडिलांच्या कीर्तिकरितां निर्मिली आणि सर्व सुगतांच्या चिरंतन सुखाकरितां नवाद्रीब्धाचार्य यानें बांधली."

## आंतील सभामंडप

आंतील सभामंडपाचा आकार ६८'×३६'चा चौरस व ३१ फूट उंचीचा घेतला आहे. सभोंवतालीं ओऱ्या काढल्या असून गर्भागारांत २६ खांब आहेत. स्तूपाचें समोरची लांबी ३२ फुटांपेक्षां जास्त असून स्तूपाचें मागील खांब अष्टकोनी आहेत.

## बुद्ध निर्वाण !!

डाव्या भिंतीचें लहान दरवाजा शेजारीं बुद्धाच्या मृत्यूचा देखावा कोरला आहे. बुद्ध एका बाकावर उत्तरेकडे तोंड करून निद्रिस्त आहे असा.

## २३ फूट ४ इंच लांबीचा आडवा बुद्ध पुतळा !

कोरला आहे. निर्वाण कथा अशी आहे कीं–

गोरखपूर नजिकच्या कुसीनार या शहराचें उत्तरेस हिरण्यवती अथवा गंडक या नदीच्या कांठीं दोन साल वृक्षांचें मध्यें आडवें पडून बुद्धानें निर्वाणात प्रवेश केला. बुद्ध हा अतिसारानें आजारी झाला असतां कुसिनार येथें जावयास निघाला. शेवटच्या १२ मैलांत इतका अशक्त झाला होता कीं, त्याला पंचवीस वेळां विश्रान्ती घ्यावी लागली.

## साल वृक्षाच्या दाट झाडींत

आल्यानंतर तो म्हणाला कीं. मी आतां थकलों. मला पडावेंसे वाटतें. दोन साल वृक्षांच्या मध्यें उत्तरेस डोकें करुन एक खाट ठेवली. तिच्यावर बुद्धदेव जे निजले ते पुन्हां उठलेंच नाहींत! हा त्यांच्या खाटेवर पडल्याचा देखावा या २३ फूट ४ इंच लांबीच्या विशाल पुतळ्याचें सभोवती कोरून बौद्ध शिल्पकारानें आपल्या कौशल्याची पराकाष्ठा केली आहे. बुद्ध निर्वाणाच्या या प्रसंगाचें करुणरसपर वर्णन मनावर परिणाम करतें. बुद्धाच्या निर्वाणानंतर त्याच ठिकाणीं त्याचा शेवटचा शिष्य सुभद्र यानें बुद्ध धर्माचा स्वीकार केला,

निर्वाणांत प्रवेश केलेल्या जगन्मान्य बुद्धाला नमस्कार करण्याकरितां लक्षावधि प्रजा सतत सात दिवसपर्यंत सारखी येतजात होती. याच ठिकाणीं वज्रपाणी बोधीसत्वानें शोकानें आपला सुवर्ण दंड फेंकून दिला आणि बुद्ध शरीराचें अवशेष याच साल वृक्षाच्या झाडींत आठ राजांनीं वांटून घेतले.

बुद्ध निर्वाणाच्या या पुतळ्याचेवर कित्येक चमत्कारिक आकृती कोरल्या असून–निर्वाण संययीं पुष्पवृष्टी करणाऱ्या कदाचित् कांहीं देवदूतांच्या त्या आकृती असाव्यात, त्यांचें मध्येंच आपले ३–३ अनुचर घेऊन ऐरावतावर बसून आलेला इन्द्र दिसतो. पुढें कांहीं शिष्य दुःख करीत असलेले कोरले आहेत.

या लेण्यांतील यांपुढील सर्वोत्कृष्ट देखावा म्हणजे **मार** नांवाच्या राक्षसानें राजपुत्र बुद्धाचा जो छळ केला आणि त्याच्या मनःशांतीची जी भयंकर कसोटी पाहिली त्याचा अवर्णनीय देखावा कोरला आहे. विरागी व शांत गंभीर अशा बुद्धावर माराच्या छळाचा किंचितही परीणाम झाला नाहीं; व पराभव पावून तो लपून बसला.

## माराच्या मुलींचें प्रयत्न

" मार लपून बसल्यानंतर त्याच्या तीन मुली–ताना, रंगा, रती ह्या बापाचा शोध करून त्याच्याकडे आल्या. त्यांनीं बापास आश्वासन दिलें कीं, आम्ही आमच्या करामतीनें शाक्यमुनींस जिंकतो. असें म्हणून त्यांनी

सहाशें सुंदर आप्सरांची रूपें धारण केलीं आणि शाक्यमुनींजवळ येऊन अनेक तऱ्हेच्या हावभावांनी, मृदु भाषणांनीं त्याला भुलविण्याचा प्रयत्न केला. परंतु, शाक्यमुनि निश्चल राहिल्यामुळें त्यानें किंचितही डोळे उघडून त्यांचेकडे न पाहिल्यामुळें त्या शेवटीं पळून गेल्या."

माराच्या प्रलोभनाची व छळाची ही कथा या देखाव्यांत कोरून चित्रिंतही केली होती. परंतु चित्राचें काम पुष्कळसें नष्ट झालें आहे.

## या लेण्यांतील विशेष

आपण या लेण्यांत शिरलों म्हणजे उजव्या बाजूच्या कोपऱ्यांत भिंतींतील एका दगडावर खोदकाम करणेंपूर्वींची आकृतीची बाह्यरेषा ( Out-line ) कोरलेली दिसते पूर्वींचें शिल्पकार किती सशास्त्र पद्धतीनें आकृति खोदण्याचें काम करींत असत तें यावरून स्पष्ट होतें.

## जादूचा मुलगा !

या लेण्याचें आंतील खांबांवर, उदा० उजवे बाजूच्या समोरच्या कोपऱ्याचें खांबावर व इतरही कांहीं ठिकाणीं, एका बसक्या, ढेरपोट्या, टपोऱ्या डोळयांच्या मुलाचें चित्र काढलें आहे. या चित्राची खुबी अशी आहे कीं, समोरून, उजव्या अथवा डाव्या अशा तींनही बाजूंनीं पाहिलें असतां तो मुलगा आपणांकडेच पाहात आहे, असें दिसतें व त्याचें सबंध शरीर. पोट, बेंबी वगैरे आपण समोरूनच पहात आहों, असें वाटतें.


या चित्रांतील सर्व खुबी डोळें चितारण्यांत आहे.

## कोरीव कामांतील भावनिदर्शन

विशेषतः या लेण्यांत व इतर बहुतेक ठिकाणीं दगडाच्या कोरीव कामांत हंसरा भाव, रडका भाव तसेंच हस्तपादादिकांची निरनिराळी ठेवण दाखवून त्या त्या आकृतींचें मनोगत उठावदार रीतींनें स्पष्ट करण्याची खुबी शिल्पकारास कशी साधली आहे, तें लक्ष लावून पाहाण्यासारखें आहे.

लेणें क्र. २७, २८, २९ यांत कांहीं विशेष शिल्प चित्रकाम पहाण्यासारखें नसून लेण्यांच्या प्रथमारंभी निवासाकरितां तीं कोरली आहेत.

उभे बुद्ध दर्शन-चैत्य




लेणे १९, पान ८७

आई व मुलगा [बुद्धांस भिक्षा वाढतात]



स्तुपातील पायसोडलेला बुद्ध देव



लेणें २६, पान ९४

दर्शनी कमानीचा पूर्व कोपरा—द. वा. जोशी



लेणें १९, पान ८७

REFBK 0011423

REFBK-0011423